दै. पुढारी ५/०१/२५ पान ९



टी. सी. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

# वक्तृत्व स्पर्धेत टी. सी. महाविद्यालय प्रथम

**बारामती :** ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती व इनोव्हेशन ॲक्टिव्हिटी सेंटर, बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५१ वे बारामती तालुका विज्ञान प्रदर्शनात तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या 'वायरलेस अप्लायन्सेस विझारर्डी' या प्रकल्पास प्रथम क्रमांक मिळाला. या प्रकल्पाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. अकरावी विज्ञान शाखेतील सरस्वती खलाटे व मुबारक बारामतीवाला या दोघांनी हा प्रकल्प सादर केला. त्यांना प्रा. मुग्धा टांकसाळे यांनी मार्गदर्शन केले. या प्रदर्शनात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये अकरावी वाणिज्य शाखेतील सूरज शिंदे याने प्रथम क्रमांक मिळवला. त्याला प्रा. स्मिता मंगुडकर यांनी मार्गदर्शन केले. या स्पर्धेसाठी प्रा.श्रीरंग शेळके, प्रा.शोभा कोंडे-देशमुख, प्रा.अनिता पाटील यांचे सहकार्य लाभले. उपप्राचार्या प्रा.वैशाली माळी, प्रा.गोरखनाथ मोरे, प्रा.संजय शेंडे यांनी मार्गदर्शन केले. विजयी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर,सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.

पुढारी ५/०१/२५ पान ९



टी. सी. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

# वक्तृत्व स्पर्धेत टी. सी. महाविद्यालय प्रथम

**बारामती :** ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती व इनोव्हेशन ॲक्टिव्हिटी सेंटर, बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५१ वे बारामती तालुका विज्ञान प्रदर्शनात तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या 'वायरलेस अप्लायन्सेस विझारडी' या प्रकल्पास प्रथम क्रमांक मिळाला. या प्रकल्पाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे. अकरावी विज्ञान शाखेतील सरस्वती खलाटे व मुबारक बारामतीवाला या दोघांनी हा प्रकल्प सादर केला. त्यांना प्रा. मुग्धा टांकसाळे यांनी मार्गदर्शन केले. या प्रदर्शनात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये अकरावी वाणिज्य शाखेतील सूरज शिंदे याने प्रथम क्रमांक मिळवला. त्याला प्रा. स्मिता मंगुडकर यांनी मार्गदर्शन केले. या स्पर्धेसाठी प्रा.श्रीरंग शेळके, प्रा.शोभा कोंडे-देशमुख, प्रा.अनिता पाटील यांचे सहकार्य लाभले. उपप्राचार्या प्रा.वैशाली माळी, प्रा.गोरखनाथ मोरे, प्रा.संजय शेंडे यांनी मार्गदर्शन केले. विजयी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर,सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.

प्रभात २/७/२५ पान ५

दै. पुढारी ०५/०७/२०२४ पान 2

# पद्य रूपातील श्रीमद भगवत् गीता पाठांतरास सोपी

## जवाहर शाह वाघोलीकर यांचे मत; माजी प्राचार्य रामचंद्र पाटील यांच्या ग्रंथाचे प्रकाशन

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य रामचंद्र पाटील यांचा श्रीमद भगवत् गीता ग्रंथ हा पद्य रूपातील असल्याने तो पाठांतरास सोपा असल्याचे मत अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांनी व्यक्त केले.



**श्रीमद भगवत् गीता ग्रंथाचे प्रकाशन करताना मान्यवर.**

ग्रंथाचा प्रकाशन सोहळा संस्थेच्या सभागृहात जवाहर शाह वाघोलीकर व सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांच्या हस्ते पार पडला. जवाहर शाह वाघोलीकर यांनी गेल्या २५ वर्षांत संस्था व महाविद्यालयाची नेत्रदीपक प्रगती केली. त्यांच्या कार्यकाळात संस्थेने अनेक शिखरे पादाक्रांत केली. अनेकांपर्यंत शिक्षण पोहोचण्यासाठी सतत कार्यरत असणाऱ्या कर्मयोगी जवाहर शाह यांना हा ग्रंथ अर्पण करीत असल्याबद्दल विशेष आनंद होत आहे, असे प्रा. रामचंद्र पाटील यांनी सांगितले. संस्थेच्या प्रगतीमध्ये जवाहर शाह व त्यांना वेळोवेळी साथ देणाऱ्या मिलिंद शाह व अन्य विश्वस्त यांच्या प्रयत्नांमुळे संस्था भरभराटीस आल्याचे मत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, माजी वाणिज्य विभागप्रमुख डॉ. नारायण नारे, प्रा. प्रकाश मेहेर, माजी विभागप्रमुख संरक्षणशास्त्र विभाग प्रा. डॉ. प्रकाश पाटील, माजी विभागप्रमुख राज्यशास्त्र प्रा. अविनाश सावळकर, अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. आर. डब्ल्यू. जोशी, प्रा. प्रकाश इंगवले, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ. सचिन गाडेकर, आय.क्यू.ए.सी. को-ऑर्डीनेटर डॉ. योगिनी मुळे, डॉ. अरुण मगर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा हे उपस्थित होते.

दै. पुढारी ०५/०७/२०२४ पान 2

# पद्य रूपातील श्रीमद भगवत् गीता पाठांतरास सोपी

## जवाहर शाह वाघोलीकर यांचे मत; माजी प्राचार्य रामचंद्र पाटील यांच्या ग्रंथाचे प्रकाशन

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य रामचंद्र पाटील यांचा श्रीमद भगवत् गीता ग्रंथ हा पद्य रूपातील असल्याने तो पाठांतरास सोपा असल्याचे मत अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांनी व्यक्त केले.



श्रीमद भगवत् गीता ग्रंथाचे प्रकाशन करताना मान्यवर.

ग्रंथाचा प्रकाशन सोहळा संस्थेच्या सभागृहात जवाहर शाह वाघोलीकर व सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांच्या हस्ते पार पडला. जवाहर शाह वाघोलीकर यांनी गेल्या २५ वर्षांत संस्था व महाविद्यालयाची नेत्रदीपक प्रगती केली. त्यांच्या कार्यकाळात संस्थेने अनेक शिखरे पादाक्रांत केली. अनेकांपर्यंत शिक्षण पोहोचण्यासाठी सतत कार्यरत असणाऱ्या कर्मयोगी जवाहर शाह यांना हा ग्रंथ अर्पण करीत असल्याबद्दल विशेष आनंद होत आहे, असे प्रा. रामचंद्र पाटील यांनी सांगितले. संस्थेच्या प्रगतीमध्ये जवाहर शाह व त्यांना वेळोवेळी साथ देणाऱ्या मिलिंद शाह व अन्य विश्वस्त यांच्या प्रयत्नांमुळे संस्था भरभराटीस आल्याचे मत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, माजी वाणिज्य विभागप्रमुख डॉ. नारायण नारे, प्रा. प्रकाश मेहेर, माजी विभागप्रमुख संरक्षणशास्त्र विभाग प्रा. डॉ. प्रकाश पाटील, माजी विभागप्रमुख राज्यशास्त्र प्रा. अविनाश सावळकर, अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. आर. डब्ल्यू. जोशी, प्रा. प्रकाश इंगवले, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ. सचिन गाडेकर, आय.क्यू.ए.सी. को-ऑर्डिनेटर डॉ. योगिनी मुळे, डॉ. अरुण मगर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा हे उपस्थित होते.



**बारामती :** प्रा. रामचंद्र पाटील यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करताना 'अनेकांत'चे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सोबत सचिव मिलिंद वाघोलीकर आणि इतर मान्यवर.

# रामचंद्र पाटील यांच्या ग्रंथाचे प्रकाशन

**बारामती, ता. ६ :** "माजी प्राचार्य रामचंद्र पाटील यांच्या ओवीरूप भगवद्गीता ग्रंथ विद्यार्थी व अभ्यासकांना मार्गदर्शक ठरेल," असे प्रतिपादन अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर यांनी केले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य रामचंद्र पाटील यांच्या ओवीरूप श्रीमद्भगवद्गीता या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा जवाहर वाघोलीकर यांच्या हस्ते व सचिव मिलिंद वाघोलीकर यांच्या उपस्थितीत झाला. त्या प्रसंगी ते बोलत होते. य
ग्रंथामध्ये श्लोकांना ओवीरूप दि
असून, पद्यरूप दिल्यामुळे पाठांतरा
सोपे होईल, हा ग्रंथ जवाहर वाघोलीक
यांना अर्पण केला असल्याचे लेख
पाटील यांनी सांगितले. या प्रसंगी प्राचा
डॉ. अविनाश जगताप, डॉ. नाराय
नारे, प्रकाश मेहेर, डॉ. प्रकाश पाटील
अविनाश सावळकर, आर. डब्ल
जोशी, प्रकाश इंगवले, उपप्राचार्य ड
अशोक काळंगे, डॉ. सचिन गाडेक
डॉ. योगिनी मुळे, डॉ. अरुण मग
रजिस्ट्रार अभिनंदन शहा उपस्थित हो

# बारामतीच्या भक्तीला थाळीफेकमध्ये सुवर्ण



भक्ती गावडे

बारामती : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी भक्ती गावडेने ४५.१० मीटर थाळीफेक करत राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने चंद्रपूर विभागाअंतर्गत विसापूर बल्लारशाह येथे झालेल्या राष्ट्रीय मैदानी स्पर्धेत भक्तीने यशाला गवसणी घातली आहे. भक्तीने १९ वर्षे वयोगटातून शालेय राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदकाचा वेध घेतला. तमिळनाडूमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय खेलो इंडिया युथ गेम्स मैदानी स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. डॉ. गौतम जाधव, अशोक देवकर यांनी तिला मार्गदर्शन केले.

# 'टीसी'च्या भक्ती गावडेला राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक

बारामती : येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील भक्ती गावडे हिने राष्ट्रीय थाळीफेक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. देशात तिने पहिला क्रमांक मिळविला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय चंद्रपूर यांनी शालेय राष्ट्रीय मैदानी स्पर्धांचे आयोजन तालुका क्रीडा संकुल विसापूर



बल्लारशाह या ठिकाणी करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये भक्ती गावडे हिची महाराष्ट्र राज्याच्या संघात शालेय राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झालेली होती. भक्ती हिने राज्यस्तरावर ४५.१० मीटर थाळीफेक करून राष्ट्रीय पातळीवर प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच तिची शालेय राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी थाळीफेक या क्रीडा प्रकारासाठी महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाली होती. ६७ व्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतातील वेगवेगळी २८ राज्य सहभागी झाली होते. थाळीफेक या प्रकारात या अ गटातून २५ खेळाडू व 'ब' गटातून २५ खेळाडू असे एकूण ५० खेळाडू सहभागी होते. 'ब' गटातून भक्तीने फायनलमध्ये प्रवेश करण्याकरिता ३९.५० मीटर थ्रो मारून 'ब' गटात पहिली आली.

अंतिम स्पर्धेत भक्तीने ४५-१० मीटर थ्रो मारून १९ वर्षे वयोगटातून शालेय राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले आहे. असोसिएशनच्या राज्यस्तर स्पर्धेतून देखील भक्ती हिची तामिळनाडू या ठिकाणी होणा-या राष्ट्रीय खेलो इंडिया युथ गेम्स मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिद्द, चिकाटी, सरावातील सातत्य यामुळे भक्तीने यश संपादन केले आहे. या खेळाडूस डॉ.गौतम जाधव व प्रा.अशोक देवकर यांचे मार्गदर्शन लाभले. भक्तीने मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले आहे.



**टी. सी. महाविद्यालयात डॉ. महादेव रोकडे यांचा सत्कार करताना डॉ. सीमा नाईक-गोसावी व इतर.**

# पुस्तक कोणाचेही हस्तक नसते

## डॉ. महादेव रोकडे यांचे मत

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

पुस्तक हे समाजाचे मस्तक असते, ते कधीही कुणाचे हस्तक नसते, असे मत खडकी (पुणे) येथील टीकाराम जगन्नाथ महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. महादेव रोकडे यांनी व्यक्त केले.

तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयात महिला सबलीकरण समितीच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त डॉ. रोकडे यांचे 'पुस्तक समाजाचे मस्तक' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते, त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी प्रा. डॉ. रोकडे म्हणाले, 'जो पुस्तकापुढे नतमस्तक होतो, समाज त्याच्यापुढे नतमस्तक होतो. जे जे विचारवंत झाले त्यापाठीमागे पुस्तकवाचनाची प्रेरणा अग्रक्रमाने होती. व्यक्तिमत्त्वविकासात ग्रंथाचे स्थान अनन्यसाधारण आहे'.

अध्यक्षीय मनोगतात कला शाखेच्या अधिष्ठाता डॉ. सीमा नाईक-गोसावी म्हणाल्या, 'सावित्रीबाई फुले व महात्मा फुले हे समाजशिक्षक होते. खऱ्या अर्थाने हे दाम्पत्य समाजाचे पुस्तकच होते. प्रतिकूल परिस्थितीत समाजाला दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले. माणसाला माणूसपण देणारा शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही.'

प्रा. गोरखनाथ मोरे व समिती सदस्य, कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दै. सकाळ दि. ०९/०१/२०२४ पान ३


## Anekant Education Society's
# Anekant English Medium School

CBSE Affiliation No. -1130964

T.C. College Campus, Baramati 413102. Dist - Pune.

Cell no.-8180948094. Email-anekantems@gmail.com

Jain Religious Minority Institution

## WALK-IN-INTERVIEW
**For the academic year 2024-25**

**PRT** – All Subject (Graduation/ PG & D.Ed/ B.Ed)

**TGT** – English, Mathematics, Science, Computer, Social Science (Graduation , PG & B.Ed)

**Perfoming Arts Teacher** – Music (Instrumental)

**Sport Teacher**– B.P.Ed / M.P.Ed.

**Pre-Primary Teacher**- Graduate and must be ECCED / Montessori Course Trained

- Preference will be given to 'Jain' candidates.
- Fluency in English is must for all the teaching positions, Candidates with high qualification CTET and 3 years + experience will be preferred.
- Remain Present Personally along with Application, Original and Photocopies of all Educational Certificates and Complete Bio-data with passport size photo, Adhar card, Pan Card and Experience Certificate.
- **Interview Date and Time : 12th January 2024, at 10:00 a.m.**
- **Venue: Anekant English Medium School , T.C.College Campus, Baramati, Dist-Pune-413102**

| Chairman | Principal |
|---|---|
| Anekant English Medium School | Anekant English Medium School |
| Baramati | Baramati |


सकाळ ९/१/२४ पान ३

# बारामतीच्या महाविद्यालयात कार्यशाळा

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी उपक्रम : विविध विषयांवर मार्गदर्शन

**बारामती, ता. १० : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी 'नेतृत्व आणि परिणामकारक महाविद्यालयीन प्रशासन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले.**




बारामती : चतुरचंद महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत बोलताना प्राचार्य डॉ. अविनाश जगताप.

या कार्यशाळेच्या प्रथम विशाल शहा यांनी 'ऑफिस टूल्स या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी शिक्षकेतर सेवकांना दैनंदिन कामकाज करताना उपयोगी ठराव्यात यादृष्टीने प्रगत संगणकीय तंत्रज्ञान, एम.एस. ऑफिस, वर्ड व एक्सेलमधील माहिती देत शॉर्टकीज् सांगितल्या. त्यानंतर राहुल शहा यांनी 'डिजिटल लिटरसी' या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये इंटरनेटचा उगम, प्रवास, फायदे व धोके याची माहिती त्यांनी दिली. तसेच, द्वितीय सत्रामध्ये प्रणीत वाबळे यांनी 'आध्यात्मिक आनंद' या विषयावर मार्गदर्शन केले. या वेळी त्यांनी आपल्याला जीवनात जे काही उपलब्ध आहे, त्यात समाधान मानावे, असा सल्ला दिला. पेला अर्धा रिकामा आहे, असे म्हणण्यापेक्षा तो अर्धा भरलेला आहे असे मानले तर आपल्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण होण्यास मदत होते. या ऊर्जेमुळे आपल्याला इतर चांगल्या गोष्टी आत्मासात करण्यासही महत होते, असेही सांगितले.

"प्रत्येकाने संगणकीय कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. या कौशल्यांचा वापर दैनंदिन जीवनात देखील होत असतो. त्यादृष्टीने या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेचा सर्वांना निश्चितच फायदा होईल," असे डॉ. जगताप यांनी सांगितले. या वेळी सुषमा संगई, अमोल सोलनकर यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. हनुमंत फाटक यांनी स्वागत पाहुण्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शहा यांनी आजच्या काळात सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करून स्वतःला अद्ययावत ठेवणे गरजेचे असल्याचे सांगितले. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी विकास भोसले, डॉ. कैलास मांटे, राज पांडे, काकडे यांनी परिश्रम घेतले.

सकाळ ११/०१/२०२४ पान ४

## बारामती महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन

**बारामती, ता. १० :** येथील तुळजाराम चतुरचंद वरिष्ठ महाविद्यालयाच्या महिला सबलीकरण समितीच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त प्लेनेटिअर्स नेचर क्लबच्या योगिता काळोखे यांचे 'सावित्रीबाई फुले व आजचा समाज' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. योगिनी मुळे होत्या. त्यानंतर प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व मिलिंद वाघोलीकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रतिभा जावळे यांनी केले. कल्याणी लोंढे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मुक्ता आंभेरे यांनी आभार मानले.

सकाळ ११/१/२४, ४

Tuljaram Chaturchand College Baramati ★ Library

दै पुढारी ११/०१/२५ पान ६

# टी. सी. कॉलेजचा बीव्हीजी इंडियाशी करार

११/०१/२५ पान ६

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील विविध महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना, उत्तीर्ण झाल्यानंतर लगेचच नोकरीच्या विविध संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी बीव्हीजी इंडिया लिमिटेड कंपनीने राज्यातील १२० महाविद्यालये व विद्यापीठांशी सामंजस्य करार केला. राज्यातील १००हून अधिक महाविद्यालये व विद्यापीठांशी 'प्रायोरिटी प्लेसमेंट पार्टनर' सहकार्य करार करण्यासाठी महाविद्यालयातील प्रशिक्षण व नोकरी विभागातील अधिकाऱ्यांसाठी बीव्हीजी इंडिया लिमिटेड कंपनीने पुणे येथे मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयासोबत या संस्थेने करार केला आहे.

महाविद्यालयाकडून प्लेसमेंट अधिकारी कृष्णा अशोक काळे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. विविध कौशल्यप्राप्त

**कौशल्यप्राप्त भारतीय युवकांना जगभरातून मागणी : हणमंतराव गायकवाड**




**बीव्हीजी इंडिया लि. कंपनीने टी. सी. महाविद्यालयासोबत विद्यार्थ्यांच्या नोकरीसंदर्भात करार केला.**

भारतीय युवक-युवतींना जगभरातून मागणी वाढत आहे, युवकांनी नियमित अभ्यासक्रमासोबतच जागतिक मागणीप्रमाणे छोटे-छोटे कोर्सेस करुन स्वतःला अद्ययावत ठेऊन या संधीचा फायदा घ्यावा, या प्रक्रियेमध्ये बीव्हीजी इंडिया लिमिटेड कंपनी महाविद्यालयाला आवश्यक ते सर्व सहकार्य करेल, असे प्रतिपादन यावेळी बीव्हीजी इंडिया लिमिटेड कंपनीचे अध्यक्ष हणमंतराव गायकवाड यांनी केले.

यावेळी महाराष्ट्र टीपीओचे अध्यक्ष शीतलकुमार रवांदळे, बीव्हीजीच्या ग्लोबल प्रेसिडेंट रूपल सिन्हा, संचालिका वैशाली गायकवाड उपस्थित होत्या. रूपल सिन्हा यांनी जागतिक पातळीवरील उपलब्ध संधी व युवकांमधील कौशल्याची गॅप (अंतर) याचे महत्त्व अधोरेखित केले. संचालिका वैशाली गायकवाड यांनी कंपनीच्या कार्यसंस्कृतीची ओळख उपस्थितांना देत सर्वोत्तम कंपनी बनण्याचा बीव्हीजीचा मानस आहे, असे प्रतिपादन केले.

मनुष्यबळ व्यवस्थापन प्रमुख डॉ. भावार्थ देखणे यांनी समूह कंपन्यांची विविध पदे व त्या पदांची निवड प्रक्रिया याविषयी माहिती दिली. अॅप्रेंटिस विभाग प्रमुख रवी घाटे यांनी केंद्र शासनाच्या विविध अॅप्रेंटिस योजनांची व त्यातून कॉलेजेस व उद्योगांना मिळणाऱ्या लाभाची माहिती दिली. शीतलकुमार रवांदळे यांनी बीव्हीजीच्या मोहिमेमध्ये सर्वोतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

# बारामती महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन

बारामती, ता. १० : येथील तुळजाराम चतुरचंद वरिष्ठ महाविद्यालयाच्या महिला सबलीकरण समितीच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त प्लेनेटिअर्स नेचर क्लबच्या योगिता काळोखे यांचे 'सावित्रीबाई फुले व आजचा समाज' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. योगिनी मुळे होत्या. त्यानंतर प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व मिलिंद वाघोलीकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रतिभा जावळे यांनी केले. कल्याणी लोंढे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मुक्ता आंभेरे यांनी आभार मानले.



# बारामतीच्या महाविद्यालयात कार्यशाळा

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी उपक्रम : विविध विषयांवर मार्गदर्शन

**बारामती, ता. १० : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी 'नेतृत्व आणि परिणामकारक महाविद्यालयीन प्रशासन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले.**




**बारामती :** चतुरचंद महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत बोलताना प्राचार्य डॉ. अविनाश जगताप.

या कार्यशाळेच्या प्रथम विशाल शहा यांनी 'ऑफिस टूल्स या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी शिक्षकेतर सेवकांना दैनंदिन कामकाज करताना उपयोगी ठराव्यात यादृष्टीने प्रगत संगणकीय तंत्रज्ञान, एम.एस. ऑफिस, वर्ड व एक्सेलमधील माहिती देत शॉर्टकीज् सांगितल्या. त्यानंतर राहुल शहा यांनी 'डिजिटल लिटरसी' या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये इंटरनेटचा उगम, प्रवास, फायदे व धोके याची माहिती त्यांनी दिली. तसेच, द्वितीय सत्रामध्ये प्रणीत वाबळे यांनी 'आध्यात्मिक आनंद' या विषयावर मार्गदर्शन केले. या वेळी त्यांनी आपल्याला जीवनात जे काही उपलब्ध आहे, त्यात समाधान मानावे, असा सल्ला दिला. पेला अर्धा रिकामा आहे, असे म्हणण्यापेक्षा तो अर्धा भरलेला आहे असे मानले तर आपल्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण होण्यास मदत होते. या ऊर्जेमुळे आपल्याला इतर चांगल्या गोष्टी आत्मासात करण्यासही मदत होते, असेही सांगितले.

"प्रत्येकाने संगणकीय कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. या कौशल्यांचा वापर दैनंदिन जीवनात देखील होत असतो. त्यादृष्टीने या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेचा सर्वांना निश्चितच फायदा होईल," असे डॉ. जगताप यांनी सांगितले. या वेळी सुषमा संगई, अमोल सोलनकर यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. हनुमंत फाटक यांनी स्वागत पाहुण्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शहा यांनी आजच्या काळात सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करून स्वतःला अद्ययावत ठेवणे गरजेचे असल्याचे सांगितले. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी विकास भोसले, डॉ. कैलास मांटे, राज पांडे, काकडे यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. भगवान माळी यांचा गुजरातमध्ये दोन पुरस्कारांनी गौरव



जेतुर (गुजरात) : मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना डॉ. माळी.

बारामती, ता. १२ : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. भगवान माळी यांना एपीएसआय डिस्टिंग्विश्ड सायंटिस्ट अ‍ॅवॉर्ड व मगनभाई लाईफटाइम अचिव्हमेंट अ‍ॅवॉर्ड २०२३ या दोन पुरस्कारांनी गौरविण्यात आले. मुझफ्फरनगर येथील अ‍ॅकडेमी ऑफ प्लँट सायन्सेस व अहमदाबाद येथील एन.एम. पडालिया फार्मसी कॉलेज यांच्या वतीने आयोजित केलेल्या एपीएसआय शास्त्रज्ञ बैठक व ड्रग्ज डिस्कव्हरी ॲण्ड डेव्हलपमेंट ऑफ ॲग्रो बायोटेक्नॉलॉजी या विषयावर जेतुर (गुजरात) येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेमध्ये डॉ. माळी यांना वनस्पती शास्त्रामध्ये केलेले संशोधन व योगदानाबद्दल आणि त्याचबरोबर भारत सरकारकडून त्यांना मिळालेल्या पेटंटसाठी डीआरडीओचे शास्त्रज्ञ डॉ. राजकुमार यांच्या हस्ते त्यांना 'एपीएसआय डिस्टिंग्विश्ड सायंटिस्ट अ‍ॅवॉर्ड ' व 'मगनभाई पटेल लाईफटाइम अचिव्हमेंट अ‍ॅवॉर्ड २०२३' या दोन पुरस्कारांसह सुवर्णपदकाने गौरविण्यात आले.

याबरोबरच डॉ. माळी यांच्या मार्गदर्शनाखाली विनायक भगत, दत्तात्रेय शिंदे आणि विक्रम पाटील यांनी सुद्धा या परिषदेमध्ये सादर केलेल्या संशोधनाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. डॉ. माळी यांच्या यशाबद्दल अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी त्यांचे अभिनंदन केले.

पुढारी पान ७
पुणे, शनिवार, १३ जानेवारी २०२४

# प्रसिद्ध सराफ व्यावसायिक शांतीकुमार शहा यांचे निधन

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**



येथील दिगंबर जैन समाजातील ज्येष्ठ श्रावक व प्रसिद्ध सराफ व्यावसायिक शांतीकुमार जंबुकुमार शहा (सराफ) यांचे शुक्रवारी (दि. १२) वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने बारामतीवर शोककळा पसरली. त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले, एक विवाहित मुलगी, जावई, सुना- नातवंडे, भाऊ- भावजय असा मोठा परिवार आहे.

बारामतीतील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे ते माजी अध्यक्ष . होते. बारामती नगरपालिकेचे नगरसेवक, माळेगाव साखर कारखान्याचे संचालक म्हणूनही त्यांनी कामकाज पाहिले. येथील माणिकबाई चंदुलाल शहा रक्तपेढीचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी अनेक वर्ष काम पाहिले. बारामती सराफ असोसिएशनचे मार्गदर्शक तसेच बारामती क्लबचे ते विश्वस्त होते.

अनेक सामाजिक व धार्मिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. सामाजिक क्षेत्रात त्यांचा मोठा नावलौकिक होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे विश्वासू म्हणूनही त्यांची ओळख होती. बारामतीतील जोतिचंद भाईचंद सराफ या पेढीच्या माध्यमातून ते घराघरात पोहोचलेले होते.

अशोकनगर येथील राहत्या घरापासून शनिवारी (दि. १३) त्यांची अंत्ययात्रा निघणार आहे. शांतीकुमार सराफ यांच्या निधनामुळे शनिवारी (दि. १३) तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास सुटी जाहीर केल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह-वाघोलीकर यांनी दिली.

सकाळ पान ८
पुणे जिल्हा, शनिवार, १३ जानेवारी २०२४

# शांतिकुमार शहा यांचे निधन



**बारामती, ता. १२ :** येथील दिगंबर जैन समाजातील ज्येष्ठ श्रावक शांतिकुमार जंबुकुमार शहा (सराफ) (वय ७९) यांचे निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुलगे, मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

बारामतीतील अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे ते माजी अध्यक्ष होते. बारामती नगरपालिकेचे नगरसेवक म्हणूनही त्यांनी कामकाज पाहिले. येथील माणिकबाई चंदुलाल शहा रक्तपेढीचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले. माळेगाव साखर कारखान्याचे संचालक म्हणून, तसेच बारामती सराफ असोसिएशनचेही काम त्यांनी पाहिले. बारामती क्लबचे ते विश्वस्त होते. जोतिचंद भाईचंद सराफ या पेढीच्या माध्यमातून ते घराघरांत पोहोचलेले होते. त्यांच्या निधनामुळे शनिवारी (ता. १३) तुळजाराम महाविद्यालयास सुटी जाहीर केल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर यांनी दिली.

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

शनिवार, १३ जानेवारी २०२४ लोकसत्ता WWW.LOKSATTA.COM [पुणे] १५ शहर

## शांतीकुमार शहा



**बारामती :** सराफ व्यावसायिक आणि ज्योतीचंद भाईचंद सराफ अँड सन्सचे मालक शांतीकुमार जंबूकुमार शहा (७८) यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे मुलगे, मुलगी, सुना, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. माळेगाव साखर कारखान्याचे माजी संचालक, बारामती नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष आणि अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले.

दै. सकाळ १२/०१/२४ पान ५

# राज्यातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी

## जागतिक स्तरावर बीव्हीजीच्या उपक्रमाची हणमंत गायकवाड यांच्याकडून माहिति

सकाळ १२/०१/२४ पान ५

**बारामती, ता. ११ :** आगामी काही वर्षात महाराष्ट्रातील पदवीप्राप्त दहा लाख विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर रोजगाराची संधी मिळवून देण्याची महत्त्वाकांक्षी योजना बीव्हीजीचे प्रमुख हणमंतराव गायकवाड यांनी आखली आहे. या साठी राज्यातील १७० महाविद्यालय आणि विद्यापीठांशी प्रायॉरिटी प्लेसमेंट पार्टनरशिपचा सामंजस्य करार केल्याची माहिती हणमंतराव गायकवाड यांनी दिली.

या बाबत गायकवाड म्हणाले, "जागतिक स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करून देणे हा या मागील मुख्य उद्देश आहे. सध्या आम्ही सौदी अरेबिया, कुवेत, कतार, तैवान, जपान व कोरिया या ठिकाणी काम सुरु आहे, काही ठिकाणी आगामी सहा महिन्यात काम सुरु होणार आहे. जी मुले नोकरीक्षम आहेत, अशा मुलांना तयार करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण व संधीची माहिती देण्याचे काम करीत आहोत."

### कोणाला मिळेल संधी

अकाउंट, नर्सिंग, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट यासह विविध क्षेत्रात कार्यरत विद्यार्थ्यांना संधी मिळेल. विद्यार्थी निवडताना गरजू मुलांना प्राधान्याने संधी देण्याची संकल्पना आहे. जर्मनी, सौदी अरेबिया, तैवान यासह इतरही देशांमध्ये आगामी काही वर्षात मनुष्यबळाची गरज भासणार आहे. ही संधी ओळखून हा प्रकल्प हाती घेतल्याचे हणमंतराव गायकवाड यांनी नमूद केले.

बीव्हीजीच्या माध्यमातून तांत्रिक व अतांत्रिक क्षेत्रासह सेवाक्षेत्रातील रोजगाराच्या संधी महाराष्ट्रातील मुलांना मिळवून देण्याचा उद्देश असल्याचे गायकवाड यांनी व्यक्त केले. जागतिक स्तरावर ज्या विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आहे, भाषेवर प्रभुत्व आहे, संभाषणकौशल्य असेल, विज्ञान व वाणिज्य क्षेत्रासह तांत्रिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांना यात अधिक वाव असेल. पदवीनंतर ही संधी मिळू शकते. आगामी दहा वर्षात दहा लाख विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर रोजगाराची संधी देण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असल्याचेही त्यांनी व्यक्त केले.

बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयानेही प्रायॉरिटी प्लेसमेंट पार्टनर या सहकार्य करारावर स्वाक्षरी केली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या निमित्ताने जागतिक स्तरावरील रोजगाराचे दालन खुले होणार आहे.

दै. सकाळ: दि- १३/१/२०२४. पा. नं- ८.

# डॉ. भगवान माळी यांचा गुजरामध्ये दोन पुरस्कारांनी गौरव



**जेतुर (गुजरात) :** मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारताना डॉ. माळी.

**बारामती, ता. १२ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. भगवान माळी यांना एपीएसआय डिस्टिंग्विश्ड सायंटिस्ट अॅवॉर्ड व मगनभाई लाईफटाइम अचिव्हमेंट अॅवॉर्ड २०२३ या दोन पुरस्कारांनी गौरविण्यात आले. मुझफ्फरनगर येथील अॅकॅडेमी ऑफ प्लँट सायन्सेस व अहमदाबाद येथील एन.एम. पडालिया फार्मसी कॉलेज यांच्या वतीने आयोजित केलेल्या एपीएसआय शास्त्रज्ञ बैठक व ड्रग डिस्कव्हरी एँण्ड डेव्हलपमेंट ऑफ एँग्रो बायोटेक्नॉलॉजी या विषयावर जेतुर (गुजरात) येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेमध्ये डॉ. माळी यांना वनस्पती शास्त्रामध्ये केलेले संशोधन व योगदानाबद्दल आणि त्याचबरोबर भारत सरकारकडून त्यांना मिळालेल्या पेटंटसाठी डीआरडीओचे शास्त्रज्ञ डॉ. राजकुमार यांच्या हस्ते त्यांना 'एपीएसआय डिस्टिंग्वश्ड सायंटिस्ट अॅवॉर्ड' व 'मगनभाई पटेल लाईफटाइम अचिव्हमेंट अॅवॉर्ड २०२३' या दोन पुरस्कारांसह सुवर्णपदकाने गौरविण्यात आले.

याबरोबरच डॉ. माळी यांच्या मार्गदर्शनाखाली विनायक भगत, दत्तात्रेय शिंदे आणि विक्रम पाटील यांनी सुद्धा या परिषदेमध्ये सादर केलेल्या संशोधनाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. डॉ. माळी यांच्या यशाबद्दल अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सकाळ १३/१/२४ पान ८



पान ५

सकाळ

# बारामती येथील खेळाडूंची बेसबॉल स्पर्धेमध्ये चमक



**छत्तीसगड :** राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त सीबीएसई संघातील बारामतीच्या अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलचे खेळाडू.

**बारामती, ता. १२ :** छत्तीसगड येथे झालेल्या ६७व्या शालेय राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत बारामतीच्या अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलच्या संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

स्पर्धेसाठी शाळेच्या सात विद्यार्थ्यांची निवड झाली होती. यामधील पहिला सामना गुजरात विरुद्ध बारामतीच्या खेळाडूंचा समावेश असलेल्या सीबीएसई संघाने गुजरातचा पराभव केला. चंदीगढ विरुद्धचा सामनाही सीबीएसईने जिंकत उपांत्य फेरीत प्रवेश केला. छत्तीसगडकडून मात्र सीबीएसई संघाला पराभव स्वीकारावा लागला. तृतीय क्रमांकासाठी मध्य प्रदेश सोबत सीबीएसईचा सामना झाला. त्यात त्यांनी विजय मिळवला. सीबीएसई संघात 'अनेकांत'चे पृथ्वीराज पवार, तेजस गलिंदे, योगेश वर्मा, अक्षद धुमाळ, इंद्रजित भोसले, सर्वेश सोत्रा, शिवम निशाद हे सहभागी होते. त्यांचे शाळेत स्वागत करण्यात आले.

दै. सकाळ दि. १३/१२/२०२४ पा. नं. ८

# शांतिकुमार शहा यांचे निधन



**बारामती, ता. १२ :** येथील दिगंबर जैन समाजातील ज्येष्ठ श्रावक शांतिकुमार जंबुकुमार शहा (सराफ) (वय ७९) यांचे निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुलगे, मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

बारामतीतील अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे ते माजी अध्यक्ष होते. बारामती नगरपालिकेचे नगरसेवक म्हणूनही त्यांनी कामकाज पाहिले. येथील माणिकबाई चंदुलाल शहा रक्तपेढीचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले. माळेगाव साखर कारखान्याचे संचालक म्हणून, तसेच बारामती सराफ असोसिएशनचेही काम त्यांनी पाहिले. बारामती क्लबचे ते विश्वस्त होते. जोतिचंद भाईचंद सराफ या पेढीच्या माध्यमातून ते घराघरांत पोहोचलेले होते. त्यांच्या निधनामुळे शनिवारी (ता. १३) तुळजाराम महाविद्यालयास सुटी जाहीर केल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर यांनी दिली.

सकाळ १३/१२/२४ पान ८

लोकसत्ता दि- १३/१२/२०२४ पा. नं. १५

# शांतीकुमार शहा



**बारामती :** सराफ व्यावसायिक आणि ज्योतीचंद भाईचंद सराफ अँड सन्सचे मालक शांतीकुमार जंबूकुमार शहा (७८) यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे मुलगे, मुलगी, सुना, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. माळेगाव साखर कारखान्याचे माजी संचालक, बारामती नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष आणि अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले.

लोकसत्ता १३/१२/२४ पान १५

पुढारी दि- १३/१२/२०२४ पा. नं. ७.

# प्रसिद्ध सराफ व्यावसायिक शांतीकुमार शहा यांचे निधन

१३/१२/२४ पान ७

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**



येथील दिगंबर जैन समाजातील ज्येष्ठ श्रावक व प्रसिद्ध सराफ व्यावसायिक शांतीकुमार जंबुकुमार शहा (सराफ) यांचे शुक्रवारी (दि. १२) वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने बारामतीवर शोककळा पसरली. त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले, एक विवाहित मुलगी, जावई, सुना- नातवंडे, भाऊ- भावजय असा मोठा परिवार आहे.

बारामतीतील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे ते माजी अध्यक्ष . होते. बारामती नगरपालिकेचे नगरसेवक, माळेगाव साखर कारखान्याचे संचालक म्हणूनही त्यांनी कामकाज पाहिले. येथील माणिकबाई चंदुलाल शहा रक्तपेढीचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी अनेक वर्ष काम पाहिले. बारामती सराफ असोसिएशनचे मार्गदर्शक तसेच बारामती क्लबचे ते विश्वस्त होते.

अनेक सामाजिक व धार्मिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. सामाजिक क्षेत्रात त्यांचा मोठा नावलौकिक होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे विश्वासू म्हणूनही त्यांची ओळख होती. बारामतीतील जोतिचंद भाईचंद सराफ या पेढीच्या माध्यमातून ते घराघरात पोहोचलेले होते.

अशोकनगर येथील राहत्या घरापासून शनिवारी (दि. १३) त्यांची अंत्ययात्रा निघणार आहे. शांतीकुमार सराफ यांच्या निधनामुळे शनिवारी (दि. १३) तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास सुटी जाहीर केल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह-वाघोलीकर यांनी दिली.

दै. लोकमत दि. १७।०१।२४ पान ४

# पहिल्या प्रयत्नात बारामतीचा प्रथमेश खडके बनला सीए

१७।०१।२४ पान ४

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** बारामतीचा प्रथमेश मंगेश खडके याने नोव्हेंबर २०२३ मध्ये झालेल्या परीक्षेत प्रथमेश याने पहिल्याच प्रयत्नात सीएच्या अंतिम परीक्षेत ८०० पैकी ४०० गुण मिळवले.



पुणे जिल्ह्यातील बारामती शहराची ओळख ही पुण्याप्रमाणे शिक्षणाचे माहेरघर म्हणूनच होत आहे. टी.सी. कॉलेजमध्ये बारावीमध्ये चांगले गुण प्राप्त करून बी.कॉम. पदवी शिक्षण हे गरवारे कॉलेज, पुणे येथे केले. आर्टिकलशीप चालू असताना सीएचा देखील अभ्यास सुरू केला. त्याचे वडील मंगेश मधुकर खडके हे कॉसमॉस बँकेत कार्यरत असून आई सरिता खडके या गृहिणी आहेत.

लहानपणापासूनच आजीचे योग्य संस्कार, स्वयं अभ्यासाची सवय आई-वडील व मामा ऋषिकेश गाढवे यांचे मार्गदर्शन लाभल्याचे प्रथमेशने सांगितले.

सा. ८०।०१।२४ ... पान २



# प्रथम प्रयत्नात बारामतीचा प्रथमेश खडके झाला सीए



बारामती-बारामतीचा प्रथमेश मंगेश खडके याने पहिल्या प्रयत्नात मदि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडियाच्या वतीने नोव्हेंबर २०२३ मध्ये झालेल्या परीक्षेत प्रथमेश याने पहिल्याच प्रयत्नात सीएच्या अंतिम परीक्षेत ८०० पैकी ४०० गुण मिळवले. त्याच्या या उत्तुंग यशामुळे शहरात त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

पुणे जिल्ह्यातील बारामती शहराची ओळख ही पुण्याप्रमाणेच शिक्षणाचे माहेरघर म्हणूनच होत आहे. टी.सी. कॉलेजमध्ये बारावीमध्ये चांगले गुण प्राप्त करून बी.कॉम. पदवी शिक्षण हे गरवारे कॉलेज, पुणे येथे केले. आर्टिकलशीप चालू असताना सीएचा देखील अभ्यास सुरू केला. ऑफिस आणि अभ्यास दोन्ही सोबत करत क्लासेस पूर्ण केले.

त्याचे वडील श्री. मंगेश मधुकर खडके हे कॉसमॉस बँकेत कार्यरत असून आई.सी.सी. सरिता खडके या गृहिणी आहेत.

लहानपणापासूनच आजीचे योग्य संस्कार, स्वयंअभ्यासाची सवय आई-वडील व पुण्यात टॅक्स कन्सलटंट म्हणून कार्यरत असलेले मामा श्री. हृषीकेश गाढवे यांच्या प्रेरणा व इच्छाशक्तीच्या जोरावर अभ्यासावर लक्ष केंद्रित करून भरपूर कष्ट घेऊन त्याने हे यश मिळवले म्हणून त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. त्याच्या या यशामुळे आई-वडील, मित्र-मंडळी तसेच नातेवाईकांना त्याचा सार्थ अभिमान आहे.

दै. सकाळ दि. १७।०१।२४ पान ५

# बारामतीचा प्रथमेश पहिल्याच प्रयत्नात सीए



प्रथमेश खडके

**बारामती, ता. १७ :** येथील प्रथमेश मंगेश खडके याने 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया'च्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले.

बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने पुण्यातील गरवारे महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली. अर्धवेळ नोकरी करीत त्याने सीएचा अभ्यास केला. त्याचे वडील मंगेश खडके हे बँकेत कार्यरत असून आई सरीता खडके गृहिणी आहेत. कष्ट व परिश्रम करत प्रथमेश याने हे यश संपादन केले. त्याच्या यशाचे पंचक्रोशीत मोठे कौतुक होत आहे.

सकाळ १७।०१।२४ पान ५

दै. सकाळ दि. १७/०७/२०२४ पान ८

# सुनील लोखंडे यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**बारामती, ता. १६ :** येथील टीसी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. सुनील लोखंडे यांना नुकताच राज्यस्तरीय समाज सन्मान पुरस्कार प्रदान केला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व मातंग विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या २२९व्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला गेला.

शैक्षणिक, सामाजिक, कला, क्रीडा क्षेत्रातील कार्यासाठी राज्यातून निवडक मान्यवरांना या पुरस्काराने सन्मानित केले गेले. डॉ. लोखंडे हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये सिनेट सदस्य म्हणून काम करीत आहेत. डॉ. सुनील लोखंडे यांना प्राप्त झालेल्या सन्मानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ.सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांनी त्यांचे अभिनंदन केले. सकाळ
१७।७।२४ पान ८

दै. लोकमत दि. १८/०१/२४ पान ४

epaper.lokmat.com ४
पुणे, गुरुवार, दि. १८ जानेवारी २०२४

दै. लोकमत



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील प्रा. डॉ. सुनील लोखंडे राज्यस्तरीय समाज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# प्रा. डॉ. सुनील लोखंडे यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क


बारामती : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व मातंग विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या २२९ व्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये आयोजित मान्यवरांच्या विशेष सत्कार समारंभामध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. सुनील लोखंडे यांना राज्यस्तरीय समाज सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शैक्षणिक, सामाजिक, कला, क्रीडा क्षेत्रातील कार्यासाठी राज्यातून डॉ. लोखंडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये सिनेट सदस्य म्हणून काम करीत आहेत. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून इतिहास विभागामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

डॉ.सुनील लोखंडे यांना प्राप्त झालेल्या सन्मानाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे,डॉ. सचिन गाडेकर रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांनी त्यांचा सत्कार केला. तसेच डॉ. सुनील लोखंडे यांच्या सन्मानाबद्दल अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर) संस्थेचे सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर) आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

दै. सकाळ दि. १८/०१/२४ पान ५

# बारामतीचा प्रथमेश पहिल्याच प्रयत्नात सीए



प्रथमेश खडके

बारामती, ता.१७ : येथील प्रथमेश मंगेश खडके याने 'इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया'च्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले.

बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने पुण्यातील गरवारे महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली. अर्धवेळ नोकरी करीत त्याने सीएचा अभ्यास केला. त्याचे वडील मंगेश खडके हे बँकेत कार्यरत असून आई सरीता खडके गृहिणी आहेत. कष्ट व परिश्रम करत प्रथमेश याने हे यश संपादन केले. त्याच्या यशाचे पंचक्रोशीत मोठे कौतुक होत आहे.

पुढारी

४ पुणे, शनिवार, २० जानेवारी २०२४

# सामाजिक मानसिकता बदलणे तरुणाईच्या हाती: गणेश इंगळे

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

समाजात गुन्हेगारी वाढती आहे गुन्हेगारीचे स्वरूप बदलते आहे. पोलिस विभाग गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी कायम प्रयत्नशील आहे. परंतु, तरुणाईने प्रयत्न केले तर सामाजिक मानसिकता बदलू शकते, असे मत उपविभागीय पोलिस अधिकारी गणेश इंगळे यांनी व्यक्त केले.

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये महिला सबलीकरणांतर्गत निर्भय कन्या कार्यशाळेचे आयोजन क?ण्यात आले होते, या वेळी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप अध्यक्षस्थानी होते.

प्राचार्य डॉ. जगताप यांनी विद्यार्थिनींनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बना, चांगल्या गोष्टींसाठी निर्भय बना असा संदेश दिला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी महाविद्यालयातर्फे चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी डॉ. रेवती संत यांनी महिलांचे शारीरिक आरोग्य' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पोलिस हवालदार अमृता भोईटे यांनी 'महिलांविषयी कायदे व स्वसंरक्षण' या विषयावर मार्गदर्शन केले. स्वतःचे रक्षण करण्यासाठी सक्षम व्हा, त्यासाठी प्रयत्न करा असे सांगितले. ॲड. तेजल धोपावकर यांनी 'कायदेविषयक जागृती' या



**उपविभागीय पोलिस अधिकारी गणेश इंगळे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अविनाश जगताप.**

विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मोटार वाहन निरीक्षक हर्षदा खारतोडे यांनी 'स्वसंरक्षण काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक डॉ. प्रतिभा जावळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. कल्याणी लोंढे, प्रा. रेश्मा बाबर यांनी केले. डॉ. मुक्ता आंभोरे यांनी आभार मानले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, डॉ. अशोक काळंगे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी डॉ. भगवान माळी यांचे कार्यशाळेला सहकार्य झाले.

epaper.lokmat.com
पुणे, गुरुवार, दि. १८ जानेवारी २०२४



दै. लोकमत



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील प्रा. डॉ. सुनील लोखंडे राज्यस्तरीय समाज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# प्रा. डॉ. सुनील लोखंडे यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व मातंग विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या २२९ व्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये आयोजित मान्यवरांच्या विशेष सत्कार समारंभामध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. सुनील लोखंडे यांना राज्यस्तरीय समाज सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शैक्षणिक, सामाजिक, कला, क्रीडा क्षेत्रातील कार्यासाठी राज्यांतून डॉ. लोखंडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये सिनेट सदस्य म्हणून काम करीत आहेत. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून इतिहास विभागामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

डॉ.सुनील लोखंडे यांना प्राप्त झालेल्या सन्मानाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे,डॉ. सचिन गाडेकर रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांनी त्यांचा सत्कार केला. तसेच डॉ. सुनील लोखंडे यांच्या सन्मानाबद्दल अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर) संस्थेचे सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर) आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

दै. सकाळ दि १८/०१/२४ पान

# सुनील लोखंडे यांना राज्यस्तरीय पुरस्कार

बारामती, ता. १६ : येथील टीसी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. सुनील लोखंडे यांना नुकताच राज्यस्तरीय समाज सन्मान पुरस्कार प्रदान केला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व मातंग विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या २२९व्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला गेला.

शैक्षणिक, सामाजिक, कला, क्रीडा क्षेत्रातील कार्यासाठी राज्यातून निवडक मान्यवरांना या पुरस्काराने सन्मानित केले गेले. डॉ. लोखंडे हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये सिनेट सदस्य म्हणून काम करीत आहेत. डॉ. सुनील लोखंडे यांना प्राप्त झालेल्या सन्मानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ.सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांनी त्यांचे अभिनंदन केले.

दै. लोकमत 20/1/24 पान 8

# अनेकान्त अकॅडमीच्या सौजन्याने

आयोजित

## भविष्याची सुरुवात आजपासूनच

## 10 वी बोर्ड परीक्षेला बसणारे विद्यार्थी व पालकांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन



**प्रमुख वक्त्या**

## रिचा तिवारी दिवाण

**Master Trainer NEP 2020**
**Resource Person for many CBSE trainer**
**A Mentor , Motivational speaker.**
**M.Sc. in Clinical Dietetics RDVV Jabalpur ( MP)**
**B.Ed. & M.Ed. ( Gujarat university)**
**GESE level 9 ( Trinity college London )**
**Ph.D in Education ( Gujarat university)**

## 10 वी बोर्डात उज्ज्वल यश संपादन करायचंय?

1. 10 वी बोर्ड परीक्षेचा पेपर कसा लिहावा.
2. तणावमुक्त परीक्षेची तयारी
3. 10 वी बोर्डाच्या परीक्षेत पालकांचा काय सहभाग असावा.
4. विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे दैनंदिन वेळापत्रक कसे असावे

विनाशुल्क नोंदणीसाठी खाली दिलेला QR Code चा वापर करावा.

## दि. 21 जानेवारी 2024 सकाळी 10:30 वा.

**ठिकाण : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती. जिवराज सभागृह**

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**पंजाबराव भोसले** 9579912300 | **रोहन जाधव** 9975773014

दै. लोकमत 20/1/24 पान 8

पुढारी २०/१/२५ पान ४

# सामाजिक मानसिकता बदलणे तरुणाईच्या हाती: गणेश इंगळे

२०/१/२५ ४

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

समाजात गुन्हेगारी वाढती आहे गुन्हेगारीचे स्वरूप बदलते आहे. पोलिस विभाग गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी कायम प्रयत्नशील आहे. परंतु, तरुणाईने प्रयत्न केले तर सामाजिक मानसिकता बदलू शकते, असे मत उपविभागीय पोलिस अधिकारी गणेश इंगळे यांनी व्यक्त केले.

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये महिला सबलीकरणांतर्गत निर्भय कन्या कार्यशाळेचे आयोजन क?ण्यात आले होते, या वेळी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप अध्यक्षस्थानी होते.

प्राचार्य डॉ. जगताप यांनी विद्यार्थिनींनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बना, चांगल्या गोष्टींसाठी निर्भय बना असा संदेश दिला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी महाविद्यालयातर्फे चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी डॉ. रेवती संत यांनी महिलांचे शारीरिक आरोग्य' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पोलिस हवालदार अमृता भोईटे यांनी 'महिलांविषयी कायदे व स्वसंरक्षण' या विषयावर मार्गदर्शन केले. स्वतःचे रक्षण करण्यासाठी सक्षम व्हा, त्यासाठी प्रयत्न करा असे सांगितले. ॲड. तेजल धोपावकर यांनी 'कायदेविषयक जागृती' या



**उपविभागीय पोलिस अधिकारी गणेश इंगळे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अविनाश जगताप.**

विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मोटार वाहन निरीक्षक हर्षदा खारतोडे यांनी 'स्वसंरक्षण काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक डॉ. प्रतिभा जावळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. कल्याणी लोंढे, प्रा. रेश्मा बाबर यांनी केले. डॉ. मुक्ता आंभोरे यांनी आभार मानले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, डॉ. अशोक काळंगे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी डॉ. भगवान माळी यांचे कार्यशाळेला सहकार्य झाले.

सकाळ २२/१/२५ पान ५

# बारामतीत निर्भय कन्या कार्यशाळा

**बारामती, ता. २१ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये महिला सबलीकरण अंतर्गत निर्भय कन्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन बारामतीचे उपविभागीय अधिकारी पोलिस अधिकारी गणेश इंगळे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप होते.

देशाचे भवितव्य युवकांच्या हाती आहे, त्यामुळे सर्व युवकांनी आपली मानसिकता बदलून एक उत्तम नागरिक बनण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. अशी अपेक्षा पोलिस अधिकारी गणेश इंगळे यांनी यावेळी व्यक्त केली.

याप्रसंगी डॉ. रेवती संत यांनी 'महिलांचे शारीरिक आरोग्य' या



**बारामती :** उपविभागीय अधिकारी गणेश इंगळे यांचा सत्कार करताना डॉ. अविनाश जगताप.

विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यानंतर अमृता भोईटे यांनी 'महिलांविषयी कायदे व स्वसंरक्षण',

ॲड. तेजल धोपावकर यांनी 'कायदे विषयक जागृती', तर हर्षदा खारतोडे यांनी 'स्वसंरक्षण काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत ५००हून अधिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, डॉ. अशोक काळंगे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, डॉ. भगवान माळी यांनी या उपक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला सबलीकरण प्रमुख डॉ. प्रतिभा जावळे यांनी केले. डॉ. कल्याणी लोंढे व रेश्मा बाबर यांनी सूत्रसंचालन केले; तर डॉ. मुक्ता आंभेरे यांनी कार्यक्रमाच्या शेवटी आभार मानले. सकाळ २२/१/२५ ५

दै. सकाळ 23/7/24 पान 4



बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. रिचा तिवारी-दिवाण.

# बारामतीच्या महाविद्यालयात दहावीच्या मुलांसाठी कार्यशाळा

**बारामती, ता. २२ :** दहावीच्या परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी अभ्यास करून तयारी केली पाहिजे, मनावर कोणताही दबाव न ठेवता परीक्षेला सामोरे जावे, असे प्रतिपादन अनेकान्त इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या डॉ. रिचा तिवारी-दिवाण यांनी केले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या जिवराज सभागृहात दहावीच्या विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांसाठी एक दिवसीय कार्यशाळा रविवारी (ता. २१) झाली. या कार्यशाळेस सुमारे ४५० विद्यार्थी व पालक उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी संस्थेचे सदस्य अँड बकुळ दोशी अध्यक्षस्थानी होते.

दहावी बोर्ड परिक्षेचा पेपर कसा लिहावा, तणाव मुक्त परिक्षेची तयारी, दहावी बोर्ड परिक्षेत पालकांचा काय सहभाग असावा, विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे दैनंदिन वेळापत्रक कसे असावे इ. विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच, अनेकान्त अॅकॅडमीचे पंजाबराव भोसले यांनी जेईई, नीट, सीईटी तयारी बाबत मार्गदर्शन केले. निवृत्ती बोरावके यांनी प्रास्ताविक केले. अमोल बनकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळा यशस्वितेसाठी नीता आटोळे, योगेश सोन्ना, निखिल कुमार, मनीष कुमार, प्रकाश कुमार यांनी सहकार्य केले. सकाळ 23/7/24, 4


दै. सकाळ 23/7/24 पान 5

# बारामतीत निर्भय कन्या कार्यशाळा

**बारामती, ता. २१ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये महिला सबलीकरण अंतर्गत निर्भय कन्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन बारामतीचे उपविभागीय अधिकारी पोलिस अधिकारी गणेश इंगळे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप होते.

देशाचे भवितव्य युवकांच्या हाती आहे, त्यामुळे सर्व युवकांनी आपली मानसिकता बदलून एक उत्तम नागरिक बनण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. अशी अपेक्षा पोलिस अधिकारी गणेश इंगळे यांनी यावेळी व्यक्त केली.

याप्रसंगी डॉ. रेवती संत यांनी 'महिलांचे शारीरिक आरोग्य' या



बारामती : उपविभागीय अधिकारी गणेश इंगळे यांचा सत्कार करताना डॉ. अविनाश जगताप.

विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यानंतर अमृता भोईटे यांनी 'महिलांविषयी कायदे व स्वसंरक्षण', अॅड. तेजल धोपावकर यांनी 'कायदे विषयक जागृती', तर हर्षदा खारतोडे यांनी 'स्वसंरक्षण काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत ५००हून अधिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, डॉ. अशोक काळंगे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, डॉ. भगवान माळी यांनी या उपक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला सबलीकरण प्रमुख डॉ. प्रतिभा जावळे यांनी केले. डॉ. कल्याणी लेंडे व रेश्मा बाबर यांनी सूत्रसंचालन केले; तर डॉ. मुक्ता आंभेरे यांनी कार्यक्रमाच्या शेवटी आभार मानले. सकाळ 23/7/24, 5

दै सकाळ दि. २५/०९/२०२४ पान ४

# तंत्रस्नेही बनून आपला व्यक्तिमत्त्व विकास साधावा : जगताप

## टीसी महाविद्यालयात तांत्रिक प्रकल्पांद्वारे अनेकान्त आविष्कार साजरा

**बारामती, ता. २५ :** येथील तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारा 'अनेकान्त आविष्कार' हा उपक्रम झाला.

प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी या उपक्रमाचे उद्घाटन केले. 'तंत्रस्नेही विद्यार्थी आणि आधुनिक भारत' या संकल्पनेवर आधारित असलेल्या उपक्रमातील विविध स्पर्धेत व प्रकल्प सादरीकरणात ९४५ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांनी विज्ञाननिष्ठ व कृतिशील बनून देशासाठी योगदान द्यावे, तसेच तंत्रस्नेही बनून आपला व्यक्तिमत्त्व विकास साधावा असे आवाहन प्राचार्य डॉ. जगताप यांनी या वेळी केले. कला, विज्ञान, वाणिज्य व व्यवसाय शिक्षण शाखेतील विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण ८० हून अधिक वर्किंग मॉडेल्स या प्रदर्शनात मांडली होती. प्रदर्शनाची पाहणी करून प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्या डॉ. योगिनी मुळे उपप्राचार्य, डॉ. सचिन गाडेकर उपप्राचार्या वैशाली माळी यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.



बारामती: आविष्कार स्पर्धेचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. अविनाश जगताप व इतर मान्यवर.

या कार्यक्रमात प्रश्नमंजूषा, रांगोळी, मेहंदी, काव्यवाचन, सुंदर हस्ताक्षर, पाककला, या स्पर्धांचे आयोजन केले होते. अनेकान्त आविष्कार समितीचे प्रमुख पांडुरंग ओवेकर यांनी नियोजन केले. समन्वयक गोरखनाथ मोरे, संजय शेंडे यांनी परिश्रम घेतले.

सकाळ २५/९/२४ पान ४

दै. सकाळ दि. २५/०१/२४ पान ४

# बारामतीच्या टीसी महाविद्यालयाची बेसबॉल स्पर्धेत बाजी

बारामती, ता. २५ : क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद पुणे व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या वतीने शासकीय शालेय क्रीडा स्पर्धेतील राज्यस्तरीय शालेय बेसबॉल स्पर्धेचे नुकतेच आयोजन केले होते. बारामतीच्या टीसी महाविद्यालयाने या स्पर्धेवर वर्चस्व गाजविले.

या स्पर्धेत मुंबई, कोल्हापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर व पुणे असे मुलांचे आठ व मुलींचे आठ विभागाचे असे १६ संघ सहभागी होते. तालुका क्रीडा अधिकारी महेश चावले व प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले. उपप्राचार्य डॉ.अशोक काळंगे, डॉ.सचिन गाडेकर, शारीरिक शिक्षण संचालक डॉ.गौतम जाधव, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, उपप्राचार्या वैशाली माळी, गोरखनाथ मोरे व संजय शेंडे आदी उपस्थित होते.

पुणे विभागाचे उपसंचालक अनिल चोरमले, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, महाराष्ट्र बेसबॉल संघटनेचे खजिनदार अशोक सरोदे व प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे मुले - प्रथम क्रमांक - तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, द्वितीय क्रमांक - राष्ट्रीय विद्यालय ज्युनिअर कॉलेज, चाळीसगाव, ततीय क्रमांक - राजर्षी शाहू कॉलेज, लातूर. मुली - प्रथम क्रमांक - तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, द्वितीय क्रमांक - स्वामी रामानंद विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, रामानंदनगर, सांगली, तृतीय - साने गुरुजी निवासी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, केज यांना प्राप्त झाले.

प्रास्ताविक अशोक देवकर यांनी केले. आभार डॉ.गौतम जाधव यांनी मानले.

सकाळ २५/१/२४ ४

सा० रणसिंग दि २५/०२/२४ पान - ४

# तु.च.महाविद्यालयात राज्यस्तर बेसबॉल स्पर्धा संपन्न

बारामती - क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद पुणे व अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित शासकीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२३-२४ मधील राज्यस्तर शालेय बेसबॉल स्पर्धा नुकतीच महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर संपन्न झाली. या स्पर्धेत महाराष्ट्रभर राज्यातील मुंबई, कोल्हापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर व पुणे असे मुलांचे आठ व मुलींचे आठ विभागाचे असे एकूण १६ संघ आलेले होते. स्पर्धेचा उद्घाटन समारंभ तालुका क्रीडा अधिकारी महेश चावले व प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांचे शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी महाराष्ट्रातून आलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या व आपले आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी व भविष्यातील करिअरच्या दृष्टीने खेळाकडे पाहून त्यानुसार आपला दैनंदिन सराव करावा असे आवाहन केले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ. सचिन गाडेकर, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. गौतम जाधव, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा, उपप्राचार्या प्रा. वैशाली माळी, प्रा. गोरखनाथ मोरे व प्रा. संजय शेंडे उपस्थित होते.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पुणे विभागाचे उपसंचालक अनिल चोरमले, पुणे जिल्ह्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, महाराष्ट्र बेसबॉल संघटनेचे खजिनदार अशोक सरोदे व प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांचे हस्ते प्रथम तीन क्रमांक प्राप्त संघाना चषक, प्रमाणपत्र व मेडल्स देऊन सन्मानित करण्यात आले. या मध्ये मुलांच्या गटात प्रथम क्रमांक- तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती (पुणे विभाग), द्वितीय क्रमांक राष्ट्रीय विद्यालय ज्युनिअर कॉलेज, चाळीसगाव (नाशिक विभाग), तृतीय क्रमांक राजर्षी शाहू कॉलेज, लातूर तर मुलींच्या गटात प्रथम क्रमांक तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती (पुणे विभाग), द्वितीय क्रमांक स्वामी रामानंद विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, रामानंदनगर, सांगली (कोल्हापूर विभाग), साने गुरूजी निवासी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, केज ता.केज, जी.बीड (छत्रपती संभाजीनगर विभाग) यांना प्राप्त झाले.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर) यांचे मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अशोक देवकर यांनी तर आभार डॉ. गौतम जाधव यांनी व्यक्त केले.






खासदार सुप्रिया सुळे यांचा अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांनी सत्कार केला.

# कृत्रिम बुद्धिमत्तेपेक्षा भावनिक बुद्धिमत्ता महत्त्वाची : खा. सुळे

बारामती : पुढारी वृत्तसेवा

शासन धोरणे ठरविण्याचे काम करते. परंतु विविध व्यक्तिमत्त्वाच्या मुलांना घडविणाऱ्या शिक्षकाचे काम सातत्य, शाश्वत व गुणवत्तापूर्ण विकास घडविण्याचे असते. सध्याच्या प्रगत काळामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक आव्हान आहे. असे असले तरी या जगात विद्यार्थ्यांना शिक्षणात आवड निर्माण करण्याचे काम शिक्षकच करू शकतो. कारण कृत्रिम बुद्धिमत्तेपेक्षा भावनिक बुद्धिमत्ता महत्त्वाची आहे. या दोन्ही गोष्टींचा मिलाफ शिक्षकच घडवू शकतात, असे प्रतिपादन खासदार सुप्रिया सुळे यांनी केले.

प्रजासत्ताकदिनी आयोजित समारंभात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात खा. सुळे यांनी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, अप्रतिम अशा अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील युवा पिढी घडविणारे उत्तम शिक्षकाची परंपरा या महाविद्यालयाने जपल्याचे त्या म्हणाल्या. यावेळी खासदार सुळे यांचा अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांनी सत्कार केला. नियामक मंडळ सदस्य सत्यजित शहा पंदारकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त याप्रसंगी उपस्थित होते. लेफ्ट. डॉ. विवेक बळे यांच्यासह एनसीसीमध्ये प्रावीण्य मिळविल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक, डॉ. एम. ए. लाहोरी, अनेकान्त इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी, उपप्राचार्य, अधिष्ठाता, प्राध्यापक, रजिस्ट्रार आदी उपस्थित होते.

दै. सकाळ दि. २८/७/२४ पान ५

# बारामती येथील 'बिझनेस फेअर'मध्ये ४० स्टॉल

**बारामती, ता. २७ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या इनक्युबेशन ॲण्ड इनोव्हेशन सेल व बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन विभागांतर्गत 'बिझनेस फेअर'चे उद्घाटन शरयू फाउंडेशनच्या अध्यक्षा शर्मिला पवार यांच्या हस्ते झाले. या फेअरमध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे ४० स्टॉल्स उभारले होते. यामध्ये सेंद्रिय शेतीशी निगडित खते, नैसर्गिक सौंदर्य प्रसाधने, कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून तयार केलेले फोटो फ्रेम्स, पर्यटन सेवा, रिचार्जेबल इलेक्ट्रॉनिक बल्ब अशा



बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'बिझनेस फेअर'च्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर.

विविध वस्तू व उपकरणांचा समावेश होता.

या वेळी बारामती औद्योगिक विकास संघटनेचे अध्यक्ष धनंजय जामदार, संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सदस्य विकास लेंगरेकर, चंद्रवदन मुंबईकर उद्योजक महादेव गायकवाड, अनंत अवचट, विजय झांबरे, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ. योगिनी मुळे, डॉ. सचिन गाडेकर, अधिष्ठाता डॉ. सीमा नाईक गोसावी, डॉ. निरंजन शहा, डॉ. विकास काकडे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन दीपाली अनपट-चव्हाण, महेश फुले, कृष्णा काळे, प्रा. सेजल अहिवळे, वर्षा तावरे, सानिका दोशी, उज्वला गाडे यांनी केले. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी उपस्थितांचे स्वागत केले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

दै. सकाळ दि. २८/१/२४ पान ५

# तंत्रज्ञान स्वीकारताना भावनिक बुद्धिमत्ता राखा : सुळे

बारामती, ता. २७ : "विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात शिक्षकांचा सिंहाचा वाटा असतो. कृत्रीम बुद्धिमत्ता स्वीकारताना भावनिक बुद्धिमत्ताही कायम राखणे हे आगामी काळातील एक आव्हान असेल," असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले.


बारामती : सुप्रिया सुळे यांचा सत्कार करताना जवाहर वाघोलीकर.

प्रजासत्ताक दिनानिमित्त तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास त्यांनी भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्याप्रसंगी सुळे बोलत होत्या. त्या म्हणाल्या, "आर्टिफिशियल इंटेलिजन्स कालांतराने आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग होणार आहे, मात्र या तंत्रज्ञानासोबतच भावनिक नाते संबंध कायम राहतील याचीही काळजी सर्वांनी घ्या' जवाहर वाघोलीकर यांनी सुळे यांचा सत्कार केला. या प्रसंगी सत्यजित पंदारकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. गुजरातच्या शिबिरात नेत्रदीपक कामगिरी केलेले लेफ्टनंट डॉ. विवेक बळे यांचा या प्रसंगी सन्मान केला. तसेच एनसीसीत प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार केला.याप्रसंगी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, एम्सचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी-दिवाण आदी उपस्थित होते.

दै. लोकमत दि. २७/०१/२४ पान ५



खासदार सुळे यांचा अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांनी सत्कार केला.

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : शासन धोरणे ठरविण्याचे काम करते. परंतु, विविध व्यक्तिमत्त्वाच्या मुलांना घडविणाऱ्या शिक्षकांचे काम सातत्य, शाश्वत व गुणवत्तापूर्ण विकास घडविण्याचे असते. सध्याच्या प्रगत काळामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक आव्हान आहे. असे असले तरी या जगात विद्यार्थ्यांना शिक्षणात आवड निर्माण करण्याचे काम शिक्षकच करू शकतो कारण कृत्रिम बुद्धिमत्तेपेक्षा भावनिक बुद्धिमत्ता महत्त्वाची आहे. या दोन्ही गोष्टींचा मिलाफ शिक्षकच घडवू शकतात, असे प्रतिपादन खासदार सुप्रिया सुळे यांनी केले.

प्रजासत्ताकदिनी आयोजित समारंभात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात सुळे यांनी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, 'भारतीयांसाठी २६ जानेवारी हा दिवस महत्त्वाचा असून ज्यांनी देशासाठी संघर्ष केला, आपल्या प्राणांची आहुती दिली त्यांचे याप्रसंगी स्मरण करण्याचा हा दिवस आहे. अप्रतिम अशा अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील युवा पिढी घडविणाऱ्या उत्तम शिक्षकांची परंपरा या महाविद्यालयाने जपल्याचे त्या म्हणाल्या. यावेळी खासदार सुळे यांचा अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांनी सत्कार केला. संस्था नियामक मंडळ सदस्य सत्यजित शाह पंदारकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांचा सत्कार

लेफ्टनंट डॉ. विवेक बळे यांसह एनसीसीमध्ये प्रावीण्य मिळविल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक डॉ. एम.ए. लाहोरी, अनेकान्त इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी, उपप्राचार्य, अधिष्ठाता, प्राध्यापक, रजिस्ट्रार उपस्थित होते.

पुणे, रविवार, २८ जानेवारी २०२४ पान ५ सकाळ

# बारामती येथील 'बिझनेस फेअर'मध्ये ४० स्टॉल

**बारामती, ता. २७ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या इनक्युबेशन ॲण्ड इनोव्हेशन सेल व बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन विभागांतर्गत 'बिझनेस फेअर'चे उद्‌घाटन शरयू फाउंडेशनच्या अध्यक्षा शर्मिला पवार यांच्या हस्ते झाले. या फेअरमध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे ४० स्टॉल्स उभारले होते. यामध्ये सेंद्रिय शेतीशी निगडित खते, नैसर्गिक सौंदर्य प्रसाधने, कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून तयार केलेले फोटो फ्रेम्स, पर्यटन सेवा, रिचार्जेबल इलेक्ट्रॉनिक बल्ब अशा विविध वस्तू व उपकरणांचा समावेश होता.



**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'बिझनेस फेअर'च्या उद्‌घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर.

या वेळी बारामती औद्योगिक विकास संघटनेचे अध्यक्ष धनंजय जामदार, संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सदस्य विकास लेंगरेकर, चंद्रवदन मुंबईकर उद्योजक महादेव गायकवाड, अनंत अवचट, विजय झांबरे, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ. योगिनी मुळे, डॉ. सचिन गाडेकर, अधिष्ठाता डॉ. सीमा नाईक गोसावी, डॉ. निरंजन शहा, डॉ. विकास काकडे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन दीपाली अनपट-चव्हाण, महेश फुले, कृष्णा काळे, प्रा. सेजल अहिवळे, वर्षा तावरे, सानिका दोशी, उज्वला गाडे यांनी केले. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी उपस्थितांचे स्वागत केले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

दै-सकाळ दि-२८/१/२०२४ पा.नं-५.

# तंत्रज्ञान स्वीकारताना भावनिक बुद्धिमत्ता राखा : सुळे

**बारामती, ता. २७ :** "विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात शिक्षकांचा सिंहाचा वाटा असतो. कृत्रीम बुद्धिमत्ता स्वीकारताना भावनिक बुद्धिमत्ताही कायम राखणे हे आगामी काळातील एक आव्हान असेल," असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास त्यांनी भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्याप्रसंगी सुळे बोलत होत्या. त्या म्हणाल्या, "आर्टिफिशियल इंटेलिजन्स कालांतराने आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग होणार आहे, मात्र या तंत्रज्ञानासोबतच भावनिक नाते संबंध कायम राहतील याचीही काळजी सर्वांनी घ्या' जवाहर वाघोलीकर यांनी सुळे यांचा सत्कार केला. या प्रसंगी सत्यजित पंदारकर यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. गुजरातच्या शिबिरात नेत्रदीपक कामगिरी केलेले लेफ्टनंट डॉ. विवेक बळे यांचा या प्रसंगी सन्मान केला. तसेच एनसीसीत प्रावीण्य प्राप्त विद्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार केला.याप्रसंगी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, एम्सचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी-दिवाण आदी उपस्थित होते.



**बारामती :** सुप्रिया सुळे यांचा सत्कार करताना जवाहर वाघोलीकर.



खासदार सुळे यांचा अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांनी सत्कार केला.

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** शासन धोरणे ठरविण्याचे काम करते. परंतु, विविध व्यक्तिमत्त्वाच्या मुलांना घडविणाऱ्या शिक्षकांचे काम सातत्य, शाश्वत व गुणवत्तापूर्ण विकास घडविण्याचे असते. सध्याच्या प्रगत काळामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता हे एक आव्हान आहे. असे असले तरी या जगात विद्यार्थ्यांना शिक्षणात आवड निर्माण करण्याचे काम शिक्षकच करू शकतो कारण कृत्रिम बुद्धिमत्तेपेक्षा भावनिक बुद्धिमत्ता महत्त्वाची आहे. या दोन्ही गोष्टींचा मिलाफ शिक्षकच घडवू शकतात, असे प्रतिपादन खासदार सुप्रिया सुळे यांनी केले.

प्रजासत्ताकदिनी आयोजित समारंभात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात सुळे यांनी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, 'भारतीयांसाठी २६ जानेवारी हा दिवस महत्त्वाचा असून ज्यांनी देशासाठी संघर्ष केला, आपल्या प्राणांची आहुती दिली त्यांचे याप्रसंगी स्मरण करण्याचा हा दिवस आहे. अप्रतिम अशा अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील युवा पिढी घडविणाऱ्या उत्तम शिक्षकांची परंपरा या महाविद्यालयाने जपल्याचे त्या म्हणाल्या. यावेळी खासदार सुळे यांचा अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांनी सत्कार केला. संस्था नियामक मंडळ सदस्य सत्यजित शाह पंदारकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांचा सत्कार

लेफ्टनंट डॉ. विवेक बळे यांसह एनसीसीमध्ये प्रावीण्य मिळविल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक डॉ. एम.ए. लाहोरी, अनेकान्त इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी, उपप्राचार्य, अधिष्ठाता, प्राध्यापक, रजिस्ट्रार उपस्थित होते.

# श्री.आनंद साळवे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा गुणवंत शिक्षकेतर सेवक (वर्ग ४) पुरस्कार जाहीर



बारामती-तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील श्री.आनंद साळवे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने (पुणे जिल्हा वर्ग ४) करिता देण्यात येणारा गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार २०२४ जाहीर झाला आहे. १० फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी होणा-या कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण होणार आहे. रुपये ११ हजार, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. श्री. साळवे हे गेल्या २० वर्षांपासून प्रयोगशाळा परिचर म्हणून कार्यरत आहेत. २०१२-१३ या वर्षासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी सहकारी ग्राहक भांडारचे उपाध्यक्ष म्हणून काम केले तर २०१३-१७ या कालावधीमध्ये त्यांनी खजिनदार म्हणून काम केले. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर), संस्थेचे विश्वस्त, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ.योगीनी मुळे, डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार श्री.अभिनंदन शहा, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी श्री.आनंद साळवे यांचे अभिनंदन केले आहे

# अनेकान्त आविष्कार उत्साहात

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील तुळजाराम चतुरचंद (टीसी) कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारा 'अनेकान्त आविष्कार' हा उपक्रम नुकताच उत्साहात पार पडला.

प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी या उपक्रमाचे उद्घाटन केले. 'तंत्रस्नेही विद्यार्थी आणि आधुनिक भारत' या संकल्पनेवर आधारित असलेल्या उपक्रमातील विविध स्पर्धेत व प्रकल्प सादरीकरणात ९४५ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी विज्ञाननिष्ठ व कृतिशील बनून देशासाठी योगदान द्यावे, तसेच तंत्रस्नेही बनून आपला व्यक्तिमत्त्व विकास साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. जगताप यांनी यावेळी केले.



अनेकान्त आविष्कारचे उद्घाटन करताना मान्यवर.

कला, विज्ञान, वाणिज्य व व्यवसाय शिक्षण शाखेतील विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण ८० पेक्षा अधिक वर्किंग मॉडेल्स या प्रदर्शनात मांडली होती. प्रदर्शनाची पाहणी करताना प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्या डॉ. योगिनी मुळे, उपप्राचार्य, डॉ. सचिन गाडेकर, उपप्राचार्या वैशाली माळी यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक करून प्रेरणा दिली. यावेळी प्रश्नमंजुषा, रांगोळी, मेहंदी, काव्यवाचन, सुंदर हस्ताक्षर, पाककला, कराओके इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचा सांस्कृतिक कलाविष्कार सादर करून रसिक-प्रेक्षकांची मने जिंकली.

संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर) यांनी या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. अनेकान्त आविष्कार समितीचे प्रमुख पांडुरंग ओवेकर यांनी नियोजन केले. समन्वयक गोरखनाथ मोरे, संजय शेंडे व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

२ पुणे, गुरुवार, १ फेब्रुवारी २०२४

**सक्सेस**



बिझनेस फेअरचे उद्घाटन करताना मान्यवर.

## टी. सी. महाविद्यालयात 'बिझनेस फेअर'

**बारामती :** अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या इन्क्युबेशन ॲण्ड इनोव्हेशन सेल व बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन विभागाच्या अंतर्गत बिझनेस फेअरचे उद्घाटन शरयू फॉउंडेशनच्या अध्यक्षा शर्मिला पवार यांच्या हस्ते झाले. बारामती औद्योगिक विकास संघटनेचे अध्यक्ष धनंजय जामदार, अनेकान्तचे अध्यक्ष जवाहर शाह-वाघोलीकर, सदस्य विकास शहा लेंगरेकर, चंद्रवदन शहा- मुंबईकर, महादेव गायकवाड, अनंत अवचट, विजय झांबरे आदींची यावेळी उपस्थिती होती. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ. योगिनी मुळे, डॉ. सचिन गाडेकर, अधिष्ठाता डॉ. सीमा नाईक गोसावी, डॉ. निरंजन शहा, डॉ. विकास काकडे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. दीपाली अनपट-चव्हाण, प्रा. महेश फुले, कृष्णा काळे, प्रा. सेजल अहिवळे, प्रा. वर्षा तावरे , प्रा. सानिका दोशी , प्रा. उज्वला गाडे यांनी केले. स्वागत व सत्कार प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी केले, तर उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी आभार मानले.

सा. रवि किरण ०१/०२/२०२४ पान ३



# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये बिझनेस फेअरचे उद्घाटन



बारामती - तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामतीचे इन्क्युबेशन ऍण्ड इनोव्हेशन सेल व बिझनेस ऍडमिनिस्ट्रेशन विभागाच्या अंतर्गत बिझनेस फेअरचे उद्घाटन शरयू फौंडेशनच्या अध्यक्षा मा.सौ. शर्मिलाताई पवार यांच्या शुभहस्ते आणि बारामती औद्योगिक विकास संघटनेचे अध्यक्ष मा.धनंजय जामदार तसेच संस्थेचे अध्यक्ष मा.जवाहरभाई शाह (वाघोलीकर), सदस्य मा. विकासभाई शहा (लेंगरेकर), मा. चंद्रवदन शहा (मुंबईकर) यांच्या उपस्थितीत पार पडला.

याप्रसंगी शर्मिलाताई पवार यांनी विद्यार्थ्यांना अशा उपक्रमामध्ये सहभाग घेतल्याबद्दल अभिनंदन करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. विद्यार्थ्यांच्य व्यावसायिक कलागुणांना वाव देण्यासाठी या बिझनेस फेअरचे आयोजन केले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वेगवेगळ्या वस्तूंचे ४० स्टॉल्स उभारले होते. यामध्ये सेंद्रिय शेतीशी निगडीत खते, नैसर्गिक सौंदर्य प्रसाधने, कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून तयार केलेले फोटो फ्रेम्स, पर्यटन सेवा, रिचाजेंबल इलेक्ट्रॉनिक बल्ब्ज असे विविध स्टॉल्स मांडण्यात आले होते.

या कार्यक्रमास प्रसिद्ध उद्योजक मा.महादेव गायकवाड, मा. अनंत अवचट, मा. विजय झांबरे इ. उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, डॉ. योगिनी मुळे, डॉ. सचिन गाडेकर, अधिष्ठाता डॉ. सीमा नाईक गोसावी, डॉ. निरंजन शहा, डॉ. विकास काकडे, रजिस्ट्रार अभिनंदन शहा उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. दीपाली अनपट चव्हाण, प्रा. महेश फुले, श्री. कृष्णा काळे, प्रा. सेजल अहिवळे, प्रा.वर्षा तावरे, प्रा. सानिका दोशी, प्रा.उज्वला गाडे यांनी यशस्वीरित्या केले. स्वागत व सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी केले. महाविद्यालयचे उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

दैनिक पुढारी

पुणे, शुक्रवार, २३ फेब्रुवारी २०२४



Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College of Arts, Science & Commerce

Baramati, Dist. Pune-413 102

**Jain Religious Minority Institutio**

Autonomus

**NAAC A+ (CGPA 3.55)**

Phone : 02112-222405 website : www.tccollege.org

## REQUIRED (Sr. College, Grantable Full Time)

Applications are invited from eligible candidates for the following posts of Assistant Professor in Senior College Grant in aid **Grantable Full Time Post.**

| Sr. No. | Subject | No. of Post/s | |
|---|---|---|---|
| 1 | Defence Studies | 01 | All Post's are Open |
| 2 | Statistics | 01 | |
| 3 | Electronics | 01 | |
| 4 | Microbiology | 01 | |
| 5 | Zoology | 01 | |
| | **Total Post's** | **05** | |

* Essential Qualification – As per Rules of UGC, Govt. of Maharashtra and Savitribai Phule Pune University, Pune.
* The posts are subject to availability of actual workload.
* Apply online on **www.recruitment.tccollege.org** website filling all Mandatory Fields. A Printout taken or a separate hand written or Typed Application also should be send to The Principal, Tuljaram Chaturchand College, Baramati P.B. No. 51, Baramati – 413 102, Dist. Pune, with all necessary documents attached, within 30 days from the date of Publication.

**Principal**
**Tuljaram Chaturchand College**
**Baramati**

**Secretary**
**Anekant Education Society**
**Baramati**

सपु६/२१



Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College of Arts, Science & Commerce

Baramati, Dist. Pune-413 102

**Jain Religious Minority Institutio**

Autonomus

**NAAC A+ (CGPA 3.55)**

Phone : 02112-222405 website : www.tccollege.org

## REQUIRED (Sr. College, Grantable Full Time)

Applications are invited from eligible candidates for the following posts of Assistant Professor in Senior College Grant in aid **Grantable Full Time Post.**

| Sr. No. | Subject | No. of Post/s | |
|---|---|---|---|
| 1 | Defence Studies | 01 | All Post's are Open |
| 2 | Statistics | 01 | |
| 3 | Electronics | 01 | |
| 4 | Microbiology | 01 | |
| 5 | Zoology | 01 | |
| | **Total Post's** | **05** | |

* Essential Qualification – As per Rules of UGC, Govt. of Maharashtra and Savitribai Phule Pune University, Pune.
* The posts are subject to availability of actual workload.
* Apply online on **www.recruitment.tccollege.org** website filling all Mandatory Fields. A Printout taken or a separate hand written or Typed Application also should be send to The Principal, Tuljaram Chaturchand College, Baramati P.B. No. 51, Baramati – 413 102, Dist. Pune, with all necessary documents attached, within 30 days from the date of Publication.

**Principal**
**Tuljaram Chaturchand College**
**Baramati**

**Secretary**
**Anekant Education Society**
**Baramati**

WWW.INDIANEXPRESS.COM
THE INDIAN EXPRESS, MONDAY, FEBRUARY 26, 2024 3

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College,

of Arts, Science & Commerce, Baramati. Dist. Pune-413102

Jain Religious Minority Institution

Autonomous

NAAC A+ (CGPA 3.55),

Phone – 02112-222405

website- www.tccollege.org

## REQUIRED (Sr. College, Grantable Full time)

Applications are invited from eligible candidates for the following posts of Assistant Professor in Senior College Grant- in- aid Grantable Full Time Post.

| Sr.No. | Subject | No. of Post/s | |
|---|---|---|---|
| 1 | Defence Studies | 01 | All Post's are Open |
| 2 | Statistics | 01 | |
| 3 | Electronics | 01 | |
| 4 | Microbiology | 01 | |
| 5 | Zoology | 01 | |
| | Total Post's | 05 | |

* Essential Qualification – As per Rules of UGC, Govt. of Maharashtra and Savitribai Phule Pune University, Pune.
* The posts are subject to availability of actual workload.
* Apply online on **www.recruitment.tccollege.org** website filling all Mandatory Fields. A Printout taken or a separate hand written or Typed Application also should be send to The Principal, Tuljaram Chaturchand College, Baramati P.B. No. 51, Baramati – 413 102 Dist. Pune, with all necessary documents attached, within 30 days from the date of Publication.

Principal
Tuljaram Chaturchand College,
Baramati

Secretary
Anekant Education Society
Baramati

PUNE

क्र. इंडियन एक्सप्रेस २६/२/२४ पान ३

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College,

of Arts, Science & Commerce, Baramati. Dist. Pune-413102

**Jain Religious Minority Institution**

**Autonomous**

**NAAC A+ (CGPA 3.55),**

Phone – 02112-222405

**website- www.tccollege.org**

## REQUIRED (Sr. College, Grantable Full time)

Applications are invited from eligible candidates for the following posts of Assistant Professor in Senior College Grant- in- aid **Grantable Full Time Post.**

| Sr.No. | Subject | No. of Post/s | |
|---|---|---|---|
| 1 | Defence Studies | 01 | All Post's are Open |
| 2 | Statistics | 01 | |
| 3 | Electronics | 01 | |
| 4 | Microbiology | 01 | |
| 5 | Zoology | 01 | |
| | Total Post's | 05 | |

* Essential Qualification – As per Rules of UGC, Govt. of Maharashtra and Savitribai Phule Pune University, Pune.

* The posts are subject to availability of actual workload.

* Apply online on **www.recruitment.tccollege.org** website filling all Mandatory Fields. A Printout taken or a separate hand written or Typed Application also should be send to The Principal, Tuljaram Chaturchand College, Baramati P.B. No. 51, Baramati – 413 102 Dist. Pune, with all necessary documents attached, within 30 days from the date of Publication.

Principal
Tuljaram Chaturchand College,
Baramati

Secretary
Anekant Education Society
Baramati

LOKSATTA.COM

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College,

of Arts, Science & Commerce, Baramati. Dist. Pune-413102

**Jain Religious Minority Institution**

**Autonomous**

**NAAC A+ (CGPA 3.55),**

Phone – 02112-222405 **website- www.tccollege.org**

## REQUIRED (Sr. College, Grantable Full time)

Applications are invited from eligible candidates for the following posts of Assistant Professor in Senior College Grant- in- aid **Grantable Full Time Post.**

| Sr.No. | Subject | No. of Post/s | |
|---|---|---|---|
| 1 | Defence Studies | 01 | All Post's are Open |
| 2 | Statistics | 01 | |
| 3 | Electronics | 01 | |
| 4 | Microbiology | 01 | |
| 5 | Zoology | 01 | |
| | Total Post's | 05 | |

* Essential Qualificati...

# नवीन शैक्षणिक धोरणाकडे सकारात्मकतेने पाहा

## डॉ. धनराज माने यांचे प्रतिपादन

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरणाकडे सकारात्मकतेने पाहणे गरजेचे असल्याचे मत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संचालक डॉ. धनराज माने यांनी व्यक्त केले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये डॉ. माने यांनी नवीन शैक्षणिक धोरणासंबंधी प्राध्यापकांसोबत सभा घेतली, त्या वेळी ते बोलत होते.

डॉ. माने म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करताना शासनाने दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करावे. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार आनंददायी शिक्षणाचे वेगवेगळे पर्याय नवीन शैक्षणिक धोरण २०२० मुळे उपलब्ध झाले आहेत. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने महाविद्यालय नेहमीच काम करीत आहे. येथील कामाची परपंरा उत्तम असून, प्राध्यापक क्षमताशील आहेत. महाविद्यालयात अत्याधुनिक सोयीसुविधा, उत्कृष्ट इमारती, मुलींचे-मुलांचे वसतिगृह, प्रयोगशाळा आहेत. संस्थेचे अद्ययावत अनेकान्त इन्स्टिट्यूट मॅनेजमेंट स्टडीज व अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूल देखील आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना याचा फायदा होत असल्याचे त्यांनी सांगितले.



**डॉ. धनराज माने यांचा सत्कार करताना मिलिंद शाह-वाघोलीकर आणि प्राध्यापकवर्ग.**

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर) यांनी डॉ. माने यांचा सत्कार केला. उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे यांनी स्वागत केले. डॉ. योगिनी मुळे यांनी आभार मानले.



**डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी यांचा सत्कार करताना उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे व इतर.**

## 'प्रत्येक कथा ही स्वतंत्र अनुभूती असते'

**बारामती :** कोणत्याही कथेची परिणामकारकता ही दमदार कथाबीज व बहुआयामी अनुभवविश्वाच्या व्यापकतेवर अवलंबून असते. तसेच प्रत्येक कथा ही स्वतंत्र अनुभूती असते, असे मत प्रसिद्ध लेखिका डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी यांनी व्यक्त केले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये उद्योजकता विकास केंद्र व मराठी विभाग आयोजित एकदिवसीय कथालेखन कार्यशाळेत त्या बोलत होत्या. उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे अध्यक्षस्थानी होते.त्या म्हणाल्या, एका ओळीत सांगता येणारे कथाबीज, रचनातंत्र ही कथेची वैशिष्ट्ये आहेत. कथेच्या निर्मितीप्रक्रियेत कथावीज, कल्पकता, संवाद, सत्याभास, व्यापक अनुभवविश्व, गूढता आदी घटक महत्त्वाचे असून कथेची कलाटणी ही महत्त्वाची गोष्ट आहे. डॉ. काळंगे यांनी कलेची साधना करणे आवश्यक आहे; लेखन हा केवळ मराठी शाखेचा विषय नाही, तर इतर शाखेच्या विद्यार्थ्यांनीही साहित्यनिर्मितीत योगदान दिले पाहिजे, असे मत व्यक्त केले. उद्योजकता विकास केंद्रप्रमुख डॉ. विकास काकडे यांनी केंद्राच्या माध्यमातून आयोजित केलेल्या विविध कार्यशाळांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. युवा महोत्सवाअंतर्गत मराठी विभागातर्फे आयोजित काव्यवाचन स्पर्धेतील विजेते सोमनाथ कदम व स्वप्नील गांजारी यांना, तर संवादलेखन स्पर्धेतील विजेते वैष्णवी बोराटे व वैष्णवी शिंदे यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

पुणे, सोमवार, २६ फेब्रुवारी २०२४





टी. सी. महाविद्यालयात अभिनेते विवेक पांडकर यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अविनाश जगताप.

# टी. सी. महाविद्यालयात नाट्यप्रशिक्षण कार्यशाळा

बारामती : "नाटकातील अभिनयाला संगीताची जोड असली पाहिजे. त्यासाठी नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगमंचव्यवस्था, केशभूषा, वेशभूषा यांचा आधार महत्त्वाचा असतो. नाटक चांगले होण्यासाठी दिग्दर्शक व कुशल व्यवस्थापकाची आवश्यकता असते. या सर्वांचा समतोल असेल तरच नाटक यशस्वी होऊ शकते," असे विचार प्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक विवेक पांडकर यांनी मांडले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय मराठी विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या नाट्यप्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेसाठी दिग्दर्शक ॲड. प्रिया गुजर-महाडिक उपस्थित होत्या. पांडकर व गुजर-महाडिक यांनी अभिनयाचे प्रात्यक्षिक, कायिक, वाचिक व मुद्राभिनय यांचे सादरीकरण केले. त्याला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयात सुरू केलेल्या कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमाचा फायदा विद्यार्थ्यांना नक्कीच होईल, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले. मराठी विभागातील प्राध्यापकांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

ग्रंथालय प्रत
पुढारी २६।२।२४ पान ३



टी. सी. महाविद्यालयात अभिनेते विवेक पांडकर यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अविनाश जगताप.

# टी. सी. महाविद्यालयात नाट्यप्रशिक्षण कार्यशाळा

**बारामती :** "नाटकातील अभिनयाला संगीताची जोड असली पाहिजे. त्यासाठी नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगमंचव्यवस्था, केशभूषा, वेशभूषा यांचा आधार महत्त्वाचा असतो. नाटक चांगले होण्यासाठी दिग्दर्शक व कुशल व्यवस्थापकाची आवश्यकता असते. या सर्वांचा समतोल असेल तरच नाटक यशस्वी होऊ शकते," असे विचार प्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक विवेक पांडकर यांनी मांडले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय मराठी विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या नाट्यप्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यशाळेसाठी दिग्दर्शक ॲड. प्रिया गुजर-महाडिक उपस्थित होत्या. पांडकर व गुजर-महाडिक यांनी अभिनयाचे प्रात्यक्षिक, कायिक, वाचिक व मुद्राभिनय यांचे सादरीकरण केले. त्याला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयात सुरू केलेल्या कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमाचा फायदा विद्यार्थ्यांना नक्कीच होईल, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले. मराठी विभागातील प्राध्यापकांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पुढारी २६।२।२४ ३

दै. सकाळ दि. 04/03/2024 पान 5

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती**

कला, विज्ञान व वाणिज्य

स्वायत्त

Phone : (02112) 222405

**'अनेकान्त नियतकालिका छपाई निविदा'**

सन २०२३-२४ च्या वार्षिकांकच्या ऑफसेट छपाईच्या सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

अंकाचा तपशील :

वरिष्ठ महाविद्यालय : अंक ३०००, पाने अनुक्रमे १७२, रंगीत फोटो पाने २८+४. कोरे निविदा फॉर्म शुल्क रु. १००/- रोखीने

कनिष्ठ महाविद्यालय : अंक २५००, पाने अनुक्रमे १२०, रंगीत फोटो पाने २०+४. कोरे निविदा फॉर्म शुल्क रु. ५०/- रोखीने.

दोन्ही निविदा स्वीकारणेची अंतिम तारीख १५-०३-२०२४ कार्यालयीन वेळ सायं. ५.०० वाजेपर्यंत,

निविदा स्वीकारणे किंवा नाकारणेचा अधिकार महाविद्यालयाने राखून ठेवला आहे.

प्राचार्य-तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

सचिव- अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

[illegible] दि. 04/03/2024 पान 3

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती**

कला, विज्ञान व वाणिज्य

## स्टेशनरी व सॅनिटेशन निविदा

सन २०२३-२४ या वर्षाकरीता ऑफिस स्टेशनरी व सॅनिटेशन साहित्य खरेदीकरीता सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. छापील निविदा महाविद्यालयाच्या स्टोअर विभागामध्ये रू. २५०/- रोखीने उपलब्ध आहे. निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख दि. १५/०३/२०२४ पर्यंत राहील. निविदा स्विकारणे किंवा नाकारणेचा अधिकार महाविद्यालयाने राखून ठेवला आहे. वेळोवेळी मागणीप्रमाणे १ वर्ष स्टेशनरी व सॅनिटेशनचा पुरवठा करावा लागेल.

**प्राचार्य**
तुळजाराम चतुरचंद
महाविद्यालय, बारामती

**सचिव**
अनेकान्त एज्युकेशन
सोसायटी, बारामती

# बेसबॉल स्पर्धेत 'कालिकत युनिव्हर्सिटी' प्रथम

## टी. सी. कॉलेजच्या क्रीडांगणावर रंगल्या मुलींच्या स्पर्धा




अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मुलींच्या बेसबॉल स्पर्धेमध्ये 'कालिकत युनिव्हर्सिटी'ला गौरविताना मान्यवर.

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती आणि असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मुलींच्या बेसबॉल स्पर्धेमध्ये कालिकत युनिव्हर्सिटी केरळचा संघ चॅम्पियन ठरला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर दि. २३ ते २७ मार्चदरम्यान ही स्पर्धा पार पडली. यामध्ये भारतभरातून एकूण ३५ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले होते. या संघामधून सर्वोत्कृष्ट खेळणारे पहिले चार संघ निवडण्यात आले. त्या चारमधून गुणांनुसार प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ असे पारितोषिके देण्यात आले.

तृतीय पारितोषिक महात्मा गांधी युनिव्हर्सिटी कोट्टायमने पटकाविला, तर चौथ्या क्रमांकाचे पारितोषिक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडला मिळाले. वैयक्तिक पारितोषिकांमध्ये सर्वोत्तम पिचर हे पारितोषिक कालिकत युनिव्हर्सिटीच्या अमृत एम. व्ही.ला मिळाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मेघाराणीने सर्वोत्तम कॅचर हे पारितोषिक पटकाविले. सर्वोत्तम हिटर महात्मा गांधी विद्यापीठाच्या एलिना हिला मिळाले. स्पर्धेच्या सर्वोत्तम खेळाडूचा मान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या ज्योती पवारला मिळाला. या स्पर्धेचे उद्घाटन दि. २४ मार्च रोजी कुलगुरू डॉ. रमेश गोसावी यांच्या हस्ते झाले. पारितोषिक वितरण कार्यक्रम जीवराज सभागृहात पार पडला. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बोर्ड ऑफ स्पोर्ट अँड फिजिकल एज्युकेशनचे माजी डायरेक्टर डॉ. दीपक माने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षपद अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव मिलिंद शहा वाघोलीकर यांनी भूषविले. राष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धांचे आयोजन करण्याकरिता अनेकान्त व टी. सी. महाविद्यालय विद्यापीठाला नेहमीच मदत करत असल्याबद्दल विद्यापीठाकडून कौतुक करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात वाघोलीकर यांनी बेसबॉल टूर्नामेंटमध्ये सहभागी झालेल्या सर्व खेळाडू मुलींचे कौतुक केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी डॉ. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर आदींनी परिश्रम घेतले. डॉ. सचिन गाडेकर यांनी आभार मानले.

पुढारी २७/३/२५ पान ५

---

सकाळ २६/३/२५ पु. पान. ५

# बारामतीत मुलींच्या बेसबॉल स्पर्धा सुरू

**बारामती, ता. २५ :** "मुलींच्या बेसबॉल स्पर्धा महिला सशक्तीकरणाच्या मोहिमेचा एक टप्पा असून या पुढेही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून मुलींच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन दिले जाईल," अशी ग्वाही कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी दिली.

येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बेसबॉल (मुलींच्या) स्पर्धेला रविवारी (ता. २४) सुरुवात झाली. देशभरातून ४८ विद्यापीठ संघ या स्पर्धेसाठी मैदानात उतरले आहेत. स्पर्धेचे उद्घाटन करताना गोसावी बोलत होते. असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी आणि सावित्रीबाई फुले पुणे यांच्या मान्यतेने स्पर्धा आयोजित केली असून स्पर्धेसाठी ६०० खेळाडू, संघ व्यवस्थापक, क्रीडा अधिकारी मार्गदर्शक, पंच शारीरिक शिक्षण संचालक सहभागी झाले आहेत.



**बारामती :** कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांचा सत्कार करताना डॉ. जयप्रकाश शहा व इतर मान्यवर.

अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे सदस्य डॉ. जयप्रकाश शहा, सिनेट सदस्य डॉ. देविदास वायदंडे, ॲकॅडमिक कौन्सिल चे सदस्य डॉ. सुनील लोखंडे, माजी उपक्रीडा संचालक डॉ. दत्ता महादम, महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशन चे टेक्निकल असिस्टंट अशोक सरोदे, डॉ. ज्ञानेश काळे, सेक्शन ऑफिसर शिवाजी उतेकर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी खेळाडूंना प्रोत्साहन दिले. डॉ. दीपक माने यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी स्वागत केले, डॉ. सुशील देशमुख व स्मिता गोरे यांनी सूत्रसंचालन केले. शारीरिक शिक्षण संचालक डॉ. गौतम जाधव यांनी आभार मानले.



पंजाबमध्ये झालेल्या स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळविणारा बारामतीच्या टी. सी. महाविद्यालयाचा संघ.

# पंजाबच्या युवा सांस्कृतिक महोत्सवात 'टीसी'ची बाजी

बारामती : पुढारी वृत्तसेवा

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करीत पंजाब येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय युवा सांस्कृतिक महोत्सवात एकूण १२ राज्यांतून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

या महोत्सवात प्रत्येक राज्याने आपापल्या राज्यातील कला प्रदर्शित केली. महाराष्ट्र राज्याच्या संघाने महाराष्ट्रातील विविध लोककला, लावणी, गोंधळ, धनगर गीत, विठ्ठल वारी गीत आदींसह महाराष्ट्रातील प्रसिद्ध ढोलकी, हलगी, ढोल वाद्यवादन करून उपस्थित सर्वच राज्यांची मने जिंकली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. भीमराव तोरणे, प्रा. राजेंद्र कंडरे, सोमनाथ पांढरे, सोमनाथ कदम व त्यांच्या टीमने नेतृत्व केले.

पंजाबच्या भटिंडा जिल्ह्यातील माता सुंदरी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट या ठिकाणी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांनी अभिनंदन केले.

Tuljaram Chatur... Library ... Baramati



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे विद्यार्थी पंजाबमध्ये राष्ट्रीय युवा सांस्कृतिक महोत्सवात सहभागी झाले होते.

# युवा महोत्सवात टी.सी.महाविद्यालय प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : दि अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करत पंजाबमध्ये राष्ट्रीय युवा सांस्कृतिक महोत्सवात सहभागी झाले होते. या महोत्सवात मध्य प्रदेश, गुजरात, हरियाणा, पंजाब असे एकूण १२ राज्यांतून महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करणाऱ्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले.

प्रत्येक राज्याने आपापल्या राज्यातील कला प्रदर्शित केली. महाराष्ट्र राज्याच्या संघाने महाराष्ट्रातील विविध लोककला लावणी, गोंधळ, धनगर गीत, विठ्ठलवारी गीतांसह महाराष्ट्रातील प्रसिद्ध ढोलकी, हलगी, ढोल वाद्यवादन करून उपस्थित सर्वच राज्यांची मने जिंकली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. भीमराव तोरणे, प्रा. राजेंद्र कंडरे, सोमनाथ पांढरे, सोमनाथ कदम व त्यांच्या टीमने नेतृत्व केले. भटिंडा जिल्ह्यातील माता सुंदरी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट या ठिकाणी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांनी अभिनंदन केले.

दै. पुढारी दि 30/04/2024 पान 05

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, of

Arts, Science & Commerce, Baramati.

Dist. Pune – 413102 (M.S.)

**Jain Religious Minority Institution**

**Autonomous**

**NAAC A+ (CGPA 3.55)**

Phone – 02112-222405

website- www.tccollege.org

## REQUIRED (Sr. College, Non-Grant)

Applications are invited from eligible candidate for the following posts of Assistant Professor in Senior College Non-Grant Section for the Academic year **2024-2025.**

**UG & P.G. Section**

| Sr. No | Subject | No. of Post/s |
|---|---|---|
| 1 | Hindi | 01 |
| 2 | English | 01 |
| 3 | History | 02 |
| 4 | Economics | 02 |
| 5 | Politics | 02 |
| 6 | Sociology | 01 |
| 7 | Psychology | 01 |
| 8 | Yog Vidya | 01 |
| 9 | Geography | 02 |
| 10 | Philosophy | 01 |
| 11 | Sanskrit | 01 |
| 12 | B.Lib. & M.Lib. | 02 |
| 13 | Physical Education | 01 |
| 14 | Commerce | 09 |
| 15 | DTL | 01 |
| 16 | Mathematics | 07 |
| 17 | Statistics | 08 |
| 18 | Physics | 05 |
| 19 | Electronics | 02 |
| 20 | Chemistry (UG) | 04 |
| 21 | Organic Chemistry | 04 |
| 22 | In-Org. Chemistry | 01 |
| 23 | Analytical Chemistry | 04 |
| 24 | Physical Chemistry | 02 |
| 25 | Botany | 07 |
| 26 | Microbiology | 04 |
| 27 | Zoology | 04 |
| 28 | Computer Science | 14 |
| 29 | BBA (CA) | 10 |
| 30 | BBA | 05 |
| 31 | Food Processing | 05 |
| 32 | Journalism | 04 |
| 33 | Environment Science | 02 |
| 34 | Dairy Technology | 04 |
| 35 | Retail Management | 04 |
| 36 | E-Commerce & Digital Marketing | 02 |
| | **Total No. Of Post** | **124** |

* Essential Qualification – As per Rules of UGC, Govt. of Maharashtra and Savitribai Phule Pune University, Pune.
* Preference will be given to 'Jain Candidates.'
* The posts are subject to availability of actual workload.
* Apply online on **www.recruitment.tccollege.org** website filling all Mandatory Fields. Printout of Application should be send. by post or by hand To The Principal, Tuljaram Chaturchand College, Baramati P.B. No. 51, Baramati – 413 102 Dist. Pune, With all necessary documents attached, within 15 days from the date of Publication.

Principal
Tuljaram Chaturchand College,
Baramati Dist. Pune

Secretary
Anekant Education Society
Baramati Dist. Pune

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, of

Arts, Science & Commerce, Baramati.

Dist. Pune – 413102 (M.S.)

**Jain Religious Minority Institution**

**Autonomous**

**NAAC A+ (CGPA 3.55)**

Phone – 02112-222405 website- www.tccollege.org

## REQUIRED (Sr. College, Non-Grant)

Applications are invited from eligible candidate for the following posts of Assistant Professor in Senior College Non-Grant Section for the Academic year **2024-2025.** **UG & P.G. Section**

| Sr. No | Subject | No. of Post/s | Sr. No | Subject | No. of Post/s |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Hindi | **01** | 19 | Electronics | **02** |
| 2 | English | **01** | 20 | Chemistry (UG) | **04** |
| 3 | History | **02** | 21 | Organic Chemistry | **04** |
| 4 | Economics | **02** | 22 | In-Org. Chemistry | **01** |
| 5 | Politics | **02** | 23 | Analytical Chemistry | **04** |
| 6 | Sociology | **01** | 24 | Physical Chemistry | **02** |
| 7 | Psychology | **01** | 25 | Botany | **07** |
| 8 | Yog Vidya | **01** | 26 | Microbiology | **04** |
| 9 | Geography | **02** | 27 | Zoology | **04** |
| 10 | Philosophy | **01** | 28 | Computer Science | **14** |
| 11 | Sanskrit | **01** | 29 | BBA (CA) | **10** |
| 12 | B.Lib. & M.Lib. | **02** | 30 | BBA | **05** |
| 13 | Physical Education | **01** | 31 | Food Processing | **05** |
| 14 | Commerce | **09** | 32 | Journalism | **04** |
| 15 | DTL | **01** | 33 | Environment Science | **02** |
| 16 | Mathematics | **07** | 34 | Dairy Technology | **04** |
| 17 | Statistics | **08** | 35 | Retail Management | **04** |
| 18 | Physics | **05** | 36 | E-Commerce & Digital Marketing | **02** |
| | | | | **Total No. Of Post** | **124** |

* Essential Qualification – As per Rules of UGC, Govt. of Maharashtra and Savitribai Phule Pune University, Pune.
* Preference will be given to 'Jain Candidates.'
* The posts are subject to availability of actual workload.
* Apply online on **www.recruitment.tccollege.org** website filling all Mandator Fields. Printout of Application should be send. by post or by hand To Th Principal, Tuljaram Chaturchand College, Baramati P.B. No. 51, Baramati – 41 102 Dist. Pune, With all necessary documents attached, within 15 days from th date of Publication.

Principal
Tuljaram Chaturchand College,
Baramati Dist. Pune

Secretary
Anekant Education Societ
Baramati Dist. Pune

दै. सकाळ दि. १०/०४/२०२४ पान ०३

Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, of

## Arts, Science & Commerce, Baramati.Dist. Pune

## Jain Religious Minority Institution

## NAAC A+ (CGPA 3.55)

Phone – 02112-222405

web-site- www.tccollege.org

# REQUIRED (Jr. College, Non-Grant)

Applications are invited from eligible candidate for the following posts of Teacher in Junior College Non-Grant Section for the Academic year 2024-2025.

| Sr. | Subject | No. of Post/s FT | Sr. | Subject | No. of Post/s FT |
|---|---|---|---|---|---|
| 1 | English | 5 | 11 | Sanskrit | 1 |
| 2 | Marathi | 4 | 12 | Food Sci.Bakary | 1 |
| 3 | Mathematics | 5 | 13 | IT (Sci.) | 3 |
| 4 | Economics | 2 | 14 | IT (Comm.) | 3 |
| 5 | Psychology | 1 | 15 | Environment | 1 |
| 6 | Commerce | 4 | 16 | Phy.Edu. | 1 |
| 7 | Physics | 8 | | Total No. of Post | 53 |
| 8 | Chemistry | 8 | | Bifocal | |
| 9 | Biology | 5 | 20 | Comp. Sci. | 3 |
| 10 | Defence Studies | 1 | 21 | Electronics | 3 |
| | | | | Total No. of Post | 06 |

* Essential Qualification – As per Rules of State Govt. of Maharashtra. Post Graduate and B.Ed. , B.P.Ed., M.P.Ed.

* Preference will be given to 'Jain Candidates.'

* The posts are subject to availability of actual workload.

*** Vacancy available filled on Temporary basis subject to approved by Govt.**

* Apply online on **www.recruitment.tccollege.org** website filling all Mandatory Fields. Printout of Application should be send. by post or by hand To The Principal, Tuljaram Chaturchand College, Baramati PB. No. 51, Baramati–413 102 Dist. Pune, With all necessary documents attached, within 15 days from the date of Publication.

**Principal**
**Tuljaram Chaturchand College,**
**Baramati Dist. Pune**

**Secretary**
**Anekant Education Society**
**Baramati Dist. Pune**


# ‘अनेकान्त’चे दहावीच्या परीक्षेत यश

## सीबीएसईत सलग तिसऱ्या वर्षी शंभर टक्के निकाल

बारामती : पुढारी वृत्तसेवा

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलने सलग तिसऱ्या वर्षी दहावीच्या सीबीएसई बोर्डाच्या शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली. दहावीच्या सीबीएसई बोर्डाचा निकाल सोमवारी (दि. १३) जाहीर झाला. यामध्ये विद्यालयातील तनूश्री विनोद राऊत हिने ९७.२० टक्के गुण मिळवत प्रथम, पार्थ रवींद्र मोहिरे याने ९५.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. कांचन रवींद्र जाधव, गौसिया जमील सय्यद, ध्रुव अनिल गवारी व प्रणव सुनील गायकवाड या चौघांनी ९४.४० टक्के गुणांसह तृतीय स्थान पटकाविले.


तनुश्री राऊत


पार्थ मोहिरे


कांचन जाधव


गौसिया सय्यद


ध्रुव गवारी


प्रणव गायकवाड

विद्यालयातील ८६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातील १७ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त केले, तर ३४ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळविले. ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे २३, तर ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे ९ विद्यार्थी आहेत. ३ विद्यार्थ्यांना ५० टक्क्यांहून अधिक गुण मिळाले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह-वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह-वाघोलीकर, स्कूल कमिटीचे अध्यक्ष चंद्रवदन मुंबईकर, व्यवस्थापक धवल शाह-वाघोलीकर, प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी-दिवाण, समन्वयिका स्मिता ढवळीकर, उपप्राचार्या शीतल वायाळ, टी. सी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, एमबीए कॉलेजचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार अभिनंदन शहा, अधीक्षक विद्याधर महामुनी यांनी अभिनंदन केले.

## अवतीभवती


पार्थ मोहिरे


तनुश्री राऊत

# सी.बी.एस.ई. परीक्षेत अनेकान्त स्कूलचे यश

बारामती : नुकत्याच झालेल्या सी.बी.एस.ई. दहावीच्या परीक्षेत येथील अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलचा सलग तिसऱ्या वर्षी शंभर टक्के निकाल जाहिर झाला आहे. या परिक्षेत तनुश्री विनोद राऊत (९७.२०), पार्थ रविंद्र मोहिरे (९५.२०) तर गौसिया जमील सय्यद, कांचन रवींद्र जाधव, ध्रुव अनिल गवारी व प्रणव सुनील गायकवाड (सर्वांना ९४.४०) टक्के गुण प्राप्त करीत घवघवीत यश संपादन केले. शाळेतील ८६ विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक तर ३४ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांहून अधिक गुण संपादन केल्याची माहिती प्राचार्या रिचा तिवारी-दिवाण यांनी दिली.

संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, शाळा समितीचे अध्यक्ष चंद्रवदन मुंबईकर, व्यवस्थापक धवल वाघोलीकर, प्राचार्या रिचा तिवारी दिवाण, समन्वयिका स्मिता ढवळीकर, उपप्राचार्या शीतल वायाळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, विद्याधर महामुनी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

दै. पुढारी दि १४/०५/२०२४ पान ६

# राधिका शहा ऑस्ट्रेलियात शोधनिबंध सादर करणार

बारामती : पुढारी वृत्तसेवा



येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी राधिका मिलिंद शहा (वाघोलीकर) या ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे सप्टेंबरमध्ये आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय आयएफएसओ कॉंग्रेसमध्ये शोधनिबंध सादर करणार आहे.

या आयएफएसओ कॉंग्रेसकरिता शहा यांना निमंत्रित करण्यात आले आहे. इंटरनॅशनल फेडरेशन फॉर द सर्जरी ऑफ ओबेसिटी अँड मेटॉबॉलिक डिसऑर्डर (आयएफएसओ) यांच्या वतीने देण्यात येणारी शिष्यवृत्ती राधिका शहा यांना जाहीर झाली आहे. याकरिता जगातून निवडलेल्या दहा जणांमध्ये भारतामधून त्या एकमेव आहेत. या शिष्यवृत्तीसाठी राधिका यांनी या क्षेत्रात आजपर्यंत केलेले काम विचारात घेतले आहे.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करीत असताना जवाहर शाह वाघोलीकर म्हणाले की, समाजातील ज्येष्ठांनी ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण मिळावे, या उदात्त विचाराने प्रेरित होऊन सुरू केलेल्या या संस्था व महाविद्यालयाची महाराष्ट्रातील उत्कृष्ट महाविद्यालयांमध्ये गणना होत आहे, याचा अभिमान असल्याचे गौरवोद्‌गार अध्यक्ष शाह वाघोलीकर यांनी काढले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना संस्था सचिव मिलिंद शाह वाघोलीकर म्हणाले, संस्थेच्या जडणघडणीमध्ये तत्कालीन संस्थाचालकांचे मोठे योगदान आपण कधीही विसरू शकत नाही. संस्था कॉलेज ऑफ फार्मसी सुरू करीत असून, विविध नवनवीन प्रकल्प हाती घेणार असल्याचे सांगितले. यानंतर महाविद्यालय, कॉलेज ऑफ फार्मसी तसेच अनेकान्त अकॅडमीच्या लोगोचे अनावरण संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

तब्बल ६१ वर्षांनंतर महाविद्यालयाचे बोधचिन्ह बदलले आहे. ही बोधचिन्ह ग्राफिक डिझायनर सलोनी शाह वाघोलीकर यांनी तयार केल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी संस्था नियामक मंडळ सदस्य चंद्रवदन शाह वाघोलीकर, विकास शहा लेंगरेकर, विद्युत शहा, सत्यजित शहा, डॉ. हर्षवर्धन व्होरा, डॉ. जे. जे. शहा, डॉ. राजेंद्र मुथा, सोनिक शहा, राहुल शाह, संस्था सदस्य, अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी-दिवाण या उपस्थित होत्या. आभार उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी मानले. डॉ. विवेक बळे व डॉ. सुशील देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

## अनेकान्त' प्रकाशन

या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी राधिका शाह यांना या कार्यक्रमासाठी विशेष निमंत्रित केले होते. त्यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामाबद्दल तसेच ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे आयएफएसओ कॉंग्रेस करिता त्यांना निमंत्रित केले असून, त्यांना स्कॉलरशिप प्राप्त झाली आहे. जगभरातून १० जणांमध्ये त्या एकमेव भारतीय आहेत. याबद्दल त्यांना सन्मानित केले गेले. नियतकालिक 'अनेकान्त' चे प्रकाशन करण्यात आले.

# टी. सी महाविद्यालयाचा नावलौकीक : वाघोलीकर

**बारामती, ता. २६ :** "महाराष्ट्रातील नामवंत व दर्जेदार शिक्षण संस्था म्हणून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा नावलौकीक आहे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे महत्त्वाचे काम महाविद्यालयाच्या माध्यमातून होत आहे," असे प्रतिपादन अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर यांनी केले.



बारामती : अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन करताना मान्यवर.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा ६२ वा वर्धापनदिन सोमवारी (ता. २४) साजरा केला. त्याप्रसंगी आयोजित समारंभात ते बोलत होते. संस्थेचे सचिव मिलिंद वाघोलीकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

मिलिंद वाघोलीकर म्हणाले, संस्थेच्या जडणघडणीमध्ये तत्कालीन संस्थाचालकांचे मोठे योगदान आहे. त्यांचे योगदान आपण कधीही विसरू शकत नाही. संस्था कॉलेज ऑफ फार्मसी सुरू करीत असून विविध नवनवीन प्रकल्प हाती घेणार आहे.

टीसी महाविद्यालय, कॉलेज ऑफ फार्मसी, अनेकांत ॲकॅडमीच्या लोगोचे अनावरण जवाहर वाघोलीकर यांच्या हस्ते झाले. ६१ वर्षानंतर महाविद्यालयाने आपल्या बोधचिन्हात बदल केला आहे. ग्राफिक डिझायनर सलोनी वाघोलीकर यांनी नवीन बोधचिन्ह तयार केल्याबद्दल त्यांचा तसेच ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे आयएफएसओ काँग्रेस करिता आमंत्रित केल्याबद्दल राधिका वाघोलीकर यांचाही सन्मान केला.

महाविद्यालयाच्या अनेकांत नियतकालिकाचे याप्रसंगी प्रकाशन केले. यावेळी विशेष कामगिरी करणाऱ्या प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान केला.

यावेळी नियामक मंडळ सदस्य चंद्रगुप्त वाघोलीकर, विकास लेंगरेकर, विद्युत शहा, सत्यजित शहा, डॉ. हर्षवर्धन व्होरा, डॉ. जे. जे. शहा, डॉ. राजेंद्र मुथा, सोनिक शहा, राहुल शाह व संस्था सदस्य, एम्स चे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी दिवाण उपस्थित होते.

याप्रसंगी वर्धापन दिनाचे औचित्य साधून ओरिसा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक युवा महोत्सवामधील विजेत्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम झाला. डॉ. विवेक बळे व डॉ. सुशील देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी आभार मानले.


# 'टीसी'मध्ये नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीविषयक कार्यशाळा

**बारामती, ता. २६ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, नियोजन व विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या वतीने गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आराखडा व अंमलबजावणी या विषयावर एक दिवसीय तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले गेले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी स्वागत केले. डॉ. अविनाश जगताप यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आराखडा व अंमलबजावणीबाबतची सर्व परिपत्रके व मार्गदर्शक तत्त्वे यांचा ऊहापोह केला.

प्रथम सत्रात फर्ग्युसन महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. राधिका जाधव यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार पदवी स्तरावर असणारा अभ्यासक्रम, आराखडा याबाबत सखोल मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. सुभाष शेंडे, यांनी 'परीक्षा पद्धती आणि मूल्यमापन' यावर मार्गदर्शन केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार परिक्षा पद्धती आणि मूल्यमापनामध्ये झालेले नवीन बदल आणि त्यांचे महत्त्व उपस्थितांना अवगत करून दिले. डॉ. रवींद्र ताशिलदार यांनी प्रमुख व किरकोळ विषयांच्या निवडीबद्दल मार्गदर्शन केले.

१९३९ पुढारी
www.pudhari.com



## टी. सी. महाविद्यालयाच्या वर्धापनदिनी अनेकान्त नियतकालिकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

व वरिष्ठ महाविद्यालयाचे नियतकालिक 'अनेकांत-२०२३-२४' चे प्रकाशन करण्यात आले. या वेळी महाविद्यालय व अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड स्टडीज एमबीए, अनेकान्त इंग्लिश मीडियममधील विशेष कामगिरी करणाऱ्या प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. वर्धापनदिनाच्या कार्यक्रमास अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे नियामक मंडळ सदस्य चंद्रगुप्त शाह वाघोलीकर, विकास शहा लेंगरेकर, विद्युत शहा, सत्यजित शहा, डॉ. हर्षवर्धन व्होरा, डॉ. जे. जे. शहा, डॉ. राजेंद्र मुथा, सोनिक शहा, राहुल शाह व संस्था सदस्य, अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी दिवाण या उपस्थित होत्या. याप्रसंगी ओरिसा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक युवा महोत्सवामधील विजेत्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम झाला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानित केले गेले. सूत्रसंचालन डॉ. विवेक बळे यांनी केले. डॉ. सुशील देशमुख यांनी आभार मानले.

प्रचंड खपाचे एकमेव विश्वसनीय दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# उत्कृष्ट महाविद्यालयात टी. सी. ची गणना : वाघोलीकर

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

समाजातील ज्येष्ठांनी ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण मिळावे या उदात्त विचाराने प्रेरित होऊन अनेकान्त एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. महाराष्ट्रातील उत्कृष्ट महाविद्यालयांमध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची गणना होत आहे, याचा अभिमान असल्याचे मत संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांनी व्यक्त केले.

**टी. सी. महाविद्यालयाचा ६२ वा वर्धापनदिन उत्साहात**

गुणवत्ता आणि दर्जेदार शिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने २४ जून रोजी आपला ६२ वा वर्धापन दिन साजरा केला. महाविद्यालयाच्या जीवराज सभागृहामध्ये पार पडलेल्या कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर) होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगताप अविनाश यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. जगताप यांनी महाविद्यालयाने मिळविलेल्या भरीव यशाबद्दल व महाविद्यालयामध्ये सुरू असलेले नवनवीन उपक्रमांची माहिती दिली. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करीत असताना जवाहर शाह वाघोलीकर म्हणाले, आजपर्यंत संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी दिलेल्या योगदानामुळे आज संस्थेने विविध पातळीवर यश प्राप्त केले आहे. महाविद्यालयाने सर्व क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केली असून त्यात सर्वांचे योगदान आहे.

मिलिंद शाह-वाघोलीकर म्हणाले, संस्थेच्या जडणघडणीमध्ये तत्कालीन संस्थाचालकांचे मोठे योगदान आहे. त्यांचे योगदान आपण कधीही विसरू शकत नाही. संस्था येथून पुढेही उत्तरोत्तर प्रगती करेल याची ग्वाही दिली. यानंतर तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, कॉलेज ऑफ फार्मसी तसेच अनेकान्त ॲकेडमीच्या लोगोचे अनावरण संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. तब्बल ६१ वर्षांनंतर महाविद्यालयाचे बोधचिन्ह बदलले आहे. ही बोधचिन्हे ग्राफिक डिझायनर सलोनी शाह वाघोलीकर यांनी तयार केल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी राधिका शाह यांना निमंत्रित केले होते. त्यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामाबद्दल तसेच ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे आयएफएसओ काँग्रेसकरिता त्यांना निमंत्रित केले होते. त्यांना स्कॉलरशिप प्राप्त झाली असून, जगभरातून निवडलेल्या १० जणांमध्ये त्या एकमेव भारतीय आहेत. याबद्दल त्यांना सन्मानित केले गेले. त्याचप्रमाणे या वेळी कनिष्ठ

सकाळ दि 22/06/24 बारामती

**Anekant Education Society's**

# Anekant Early Childhood Care And Education Institute

**(Anekant English Medium School, T.C. College Campus, Baramati)**

**Phone No.:- 8180948094**

**Jain Religious Minority Institution**

## Admission opens for Diploma Course in E.C.C. Ed 2024 -25

* Certified 10 Months Course.
* Personal attention to every candidate.
* Platform for confidence building and paving the way for future job opportunities.
* Admission forms will be available from 24th June 2024 in the school office from 11:00 a.m. to 2:.00 p.m.
* Eligibility criteria: 12th Pass / Diploma / Graduate.
* For any query, Contact No:- 9021248090 & 9834512979

**Chairman,**
**Anekant English Medium School Committee, Baramati**

**Principal,**
**Anekant English Medium School, Baramati**

सकाळ 22/6/24

सकाळ 30/6/24 पान 8




**बारामती :** शपथविधीप्रसंगी विद्यार्थी, शिक्षक आणि मान्यवर.

# अनेकान्त स्कूलमध्ये विद्यार्थी परिषदेची निवड

**बारामती, ता. २९ :** येथील अनेकान्त इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये कॅप्टन आणि व्हॉईस कॅप्टन यांचा शपथविधी नुकताच पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक परिवहन विभागाच्या वाहन निरिक्षक हेमलता तावरे उपस्थित होत्या.

त्यांनी विद्यार्थ्यांना जबाबदारी व कर्तव्य याची जाणीव करून देत विद्यार्थी दशेत नेतृत्व गुण विकसित व्हावेत यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून अग्निवा दोलई व हर्षदा पोतदार यांची निवड केली. स्कूलमध्ये ॲमेझॉन, ईडन, महानंदा व सतलज असे एकूण चार हाऊस कार्यरत आहेत. या प्रत्येक हाऊसच्या कॅप्टन आणि व्हॉईस कॅप्टन या पदांसाठी निवड केली, त्यानंतर गोपनियतेची शपथ दिली. हाऊसमध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांकडून शाळेचे नियम, शिस्तीचे काटेकोरपणे पालन व्हावे. तसेच त्यांना विविध कार्यक्रम व स्पर्धा यासंबंधिची माहिती प्राप्त व्हावी, यासाठी हाऊस कॅप्टन आणि व्हाईस कॅप्टन यांची साथ विद्यार्थ्यांना होत असते. स्कूलच्या प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी-दिवाण, समन्वयिका स्मिता ढवळीकर, उपप्राचार्या शीतल वायाळ यांच्या उपस्थितीत हा शपथविधी सोहळा पार पडला. सकाळ ३०।६।२४, ८

# टीसीच्या अनेकान्त अंकास पुरस्कार

बारामती, ता. २० : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित पारितोषिक वितरण समारंभात २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या अनेकान्त वार्षिक अंकास अव्यावसायिक ग्रामीण महाविद्यालयातून द्वितीय क्रमांक क्रमांकाचे पारितोषिक प्रदान केले.



पुणे : पुरस्कार स्वीकारताना टीसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. भगवान माळी व इतर.

महाविद्यालयातील डॉ. भगवान माळी यांना उत्कृष्ट विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून सन्मानित केले. हे सत्कार विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विजय खरे आणि इतर मान्यवर यांच्या हस्ते दिले. यावेळी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, अनेकान्तचे संपादक कृष्णा कुलकर्णी, डॉ. भगवान माळी यांनी सत्कार स्वीकारले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.

# टी. सी महाविद्यालयाचा नावलौकिक : वाघोलीकर

बारामती, ता. २६ : 'महाराष्ट्रातील नामवंत व दर्जेदार शैक्षण संस्था म्हणून तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा नावलौकीक आहे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे महत्त्वाचे काम महाविद्यालयाच्या माध्यमातून होत आहे," असे प्रतिपादन अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर यांनी केले.



बारामती : अनेकांत नियतकालिकाचे प्रकाशन करताना मान्यवर.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा ६२ वा वर्धापनदिन सोमवारी (ता. २४) साजरा केला. त्याप्रसंगी आयोजित समारंभात ते बोलत होते. संस्थेचे सचिव मिलिंद वाघोलीकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

मिलिंद वाघोलीकर म्हणाले, संस्थेच्या जडणघडणीमध्ये तत्कालीन संस्थाचालकांचे मोठे योगदान आहे. त्यांचे योगदान आपण कधीही विसरू शकत नाही. संस्था कॉलेज ऑफ फार्मसी सुरू करीत असून विविध नवनवीन प्रकल्प हाती घेणार आहे.

टीसी महाविद्यालय, कॉलेज ऑफ फार्मसी, अनेकांत अॅकॅडमीच्या लोगोचे अनावरण जवाहर वाघोलीकर यांच्या हस्ते झाले. ६१ वर्षानंतर महाविद्यालयाने आपल्या बोधचिन्हात बदल केला आहे. ग्राफिक डिझायनर सलोनी वाघोलीकर यांनी नवीन बोधचिन्ह तयार केल्याबद्दल त्यांचा तसेच ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे आयएफएसओ काँग्रेस करिता आमंत्रित केल्याबद्दल राधिका वाघोलीकर यांचाही सन्मान केला.

महाविद्यालयाच्या अनेकांत नियतकालिकाचे याप्रसंगी प्रकाशन केले. यावेळी विशेष कामगिरी करणाऱ्या प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान केला.

यावेळी नियामक मंडळ सदस्य चंद्रगुप्त वाघोलीकर, विकास लेंगरेकर, विद्युत शहा, सत्यजित शहा, डॉ. हर्षवर्धन व्होरा, डॉ. जे. जे. शहा, डॉ. राजेंद्र मुथा, सोनिक शहा, राहुल शाह व संस्था सदस्य, एम्स चे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी दिवाण उपस्थित होते.

याप्रसंगी वर्धापन दिनाचे औचित्य साधून ओरिसा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक युवा महोत्सवामधील विजेत्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम झाला. डॉ. विवेक बळे व डॉ. सुशील देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी आभार मानले.

# टीसी मध्ये नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीविषयक कार्यशाळा

बारामती, ता. २६ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, नियोजन व विकास मंडळ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या वतीने गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत आयोजित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आराखडा व अंमलबजावणी या विषयावर एक दिवसीय तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले गेले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी स्वागत केले. डॉ. अविनाश जगताप यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आराखडा व अंमलबजावणीबाबतची सर्व परिपत्रके व मार्गदर्शक तत्त्वे यांचा ऊहापोह केला.

प्रथम सत्रात फर्ग्युसन महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. राधिका जाधव यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार पदवी स्तरावर असणारा अभ्यासक्रम, आराखडा याबाबत सखोल मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. सुभाष शेंडे, यांनी 'परीक्षा पद्धती आणि मूल्यमापन' यावर मार्गदर्शन केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार परिक्षा पद्धती आणि मूल्यमापनामध्ये झालेले नवीन बदल आणि त्यांचे महत्त्व उपस्थितांना अवगत करून दिले. डॉ. रवींद्र ताशिलदार यांनी प्रमुख व किरकोळ विषयांच्या निवडीबद्दल मार्गदर्शन केले.

पुढारी २५/६/२४ पान ७

# 'तुळजाराम' महाविद्यालयास 'अधिकारप्रदत्त स्वायत्त' दर्जा

बारामती, ता. ५ : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा (एम्पावर्ड ऑटोनॉमस कॉलेज स्टेटस) दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाच्या अधीन राहून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ स्वायत्त महाविद्यालय व मान्यता प्राप्त परिसंस्था यांना अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याबाबतची मानके, यामधील तरतुदींच्या आधारे, तसेच विद्यापीठ अनुदान आयोग संबंधित शिखर संस्था व केंद्र व राज्य सरकार तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यांच्याकडून निर्गमित केलेल्या नियमानुसार २०२४-२५ ते २०३३-२०३४ या पुढील दहा वर्षांकरिता हा दर्जा प्रदान केला आहे. अनेकांत एज्युकेशन याबाबत माहिती दिली. जून १९६२ मध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची स्थापना केली. महाविद्यालयास धार्मिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झाला. 'नॅक ए प्लस' दर्जा मिळाला आहे. या महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराने सन्मानित केले आहे. महाविद्यालयाचे रशिया, उझबेकिस्तान तसेच आसाम येथील विद्यापीठ व संशोधन संस्थांबरोबर आंतरराष्ट्रीय करार झाले. महाविद्यालयात ११ संशोधन केंद्र असून ५१ मार्गदर्शक प्राध्यापकांचे १४० विद्यार्थी पीएच. डी. करीत आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी दिली. महाविद्यालयास अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी ... सर्व प्राध्यापकांचे

# टी. सी. महाविद्यालयाला स्वायत्त दर्जा

पुढारी
5/6/24 पान

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील अनेकान्त एज्युकेशनच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा (एम्पॉवर्ड ऑटोनॉमस कॉलेज स्टेट्स) दर्जा प्रदान केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०३३-३४ या दहा वर्षांकरिता हा दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी यासाठी या महाविद्यालयाची स्थापना जून १९६२ मध्ये करण्यात आली. या महाविद्यालयात सध्या जवळपास १२ हजार विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर वर्गामध्ये शिक्षण घेत आहेत.

महाविद्यालयास धार्मिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झाला असून, नॅक, बेंगळुरूकडून ए + दर्जा प्राप्त झाला आहे. यापूर्वी डिसेंबर २०१८ मध्ये यूजीसीकडून




**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय.**

करण्यात आला आहे.

त्यानुसार सर्व विषयांचे अभ्यासक्रम तयार करून त्याप्रमाणे परीक्षांचे नियोजन, निकाल आदी महाविद्यालयस्तरावर करीत आहे. या महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार मिळाला आहे.

महाविद्यालयाचे रशिया, उझबेकिस्तान, आसाम येथील विद्यापीठ व संशोधन संस्था आदींसोबत आंतरराष्ट्रीय शैक्षणिक करार झाले आहेत. याअंतर्गत विविध उपक्रम महाविद्यालय आयोजित करीत आहे. विद्यार्थ्यांच्या हितासाठी संस्थेने अनेकान्त

त्याचप्रमाणे स्पर्धा परीक्षेच्या तयारीकरिता केंद्र, सीए फाउंडेशन केंद्र सुरू केले आहे. महाविद्यालयामध्ये एकूण ११ संशोधन केंद्रे असून, ५१ मार्गदर्शक प्राध्यापकांचे अंतर्गत १४० विद्यार्थी पीएच.डी. करीत आहेत.

शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा आदींमध्येदेखील आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

सांस्कृतिक क्षेत्रामध्ये महाविद्यालयाने पुरुषोत्तम करंडक स्पर्धा तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदवून यश प्राप्त केले आहे. महाविद्यालयाच्या या यशस्वितेबद्दल व अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जाबद्दल प्राचार्य डॉ.अविनाश जगताप, सर्व प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी यांचे संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांनी

लोकमत

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास एम्पॉवर्ड ऑटोनॉमस कॉलेज दर्जा

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास एम्पॉवर्ड ऑटोनॉमस कॉलेज स्टेट्स दर्जा प्रदान केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०३३-३४ या दहा वर्षाकरिता हा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून या महाविद्यालयाची स्थापना जून १९६२ मध्ये करण्यात आली. या महाविद्यालयात सध्या जवळपास १२ हजार विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर वर्गामध्ये शिक्षण घेत आहेत.

महाविद्यालयास धार्मिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त झाला असून नॅक, बंगळुरूकडून 'ए' दर्जा प्राप्त झाला आहे. यापूर्वी डिसेंबर २०१८ साली यूजीसीकडून महाविद्यालयास स्वायत्त दर्जा प्रदान करण्यात आला आहे. महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार मिळाला आहे. महाविद्यालयाचे रशिया, उझबेकिस्तान, आसाम येथील विद्यापीठ व संशोधन संस्था आदी सोबत आंतरराष्ट्रीय शैक्षणिक करार झाले आहेत. त्याचप्रमाणे स्पर्धा परीक्षेच्या तयारीकरिता केंद्र, सीए फाउंडेशन केंद्र सुरू केले आहे. महाविद्यालयामध्ये एकूण ११ संशोधन केंद्रे असून, ५१ मार्गदर्शक प्राध्यापकांचे अंतर्गत १४० विद्यार्थी पीएच.डी. करीत आहेत.

## आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग

शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, क्रीडा आदींमध्येदेखील आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. सांस्कृतिक क्षेत्रामध्ये महाविद्यालयाने पुरुषोत्तम करंडक स्पर्धेत तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदवून यश प्राप्त केले आहे. महाविद्यालयाच्या यशस्वितेबद्दल व अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जाबद्दल प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांचे संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, मिलिंद शाह वाघोलीकर यांनी अभिनंदन केले.

[illegible]

१ पुणे

रविवार, ३० जून २०२४

**धर्मादाय उप-आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे समोर चौकशीची नोटीस**

(मा १९५० चा मुंबई सार्वजनिक (विश्वस्त व्यवस्था अधिनियम सन १९५० चे कलम-२१)

बदल अर्ज क्रमांकः- १६४१/२०२३ कलम-२२

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था :- अनेकांत एज्युकेशन सोसायटी, तुळजाराम चतुरचंद कॉलेज कॅम्पस, बारामती - ४१३१०२.

नोंदणी क्रमांक - एफ/२४२ (पुणे) या न्यासासंबंधात

श्री. मिलिंद आर शाह - वाघोलीकर,
वाघोलीकर बंगला, वाघोलीकर पार्क,
बारामती, जिल्हा - पुणे - ४१३१०२.

अर्जदार यांनी कलम २२ अन्वये केलेल्या अर्जासंबंधात कलम २२ अन्वये भरलेले नमुना सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मा. धर्मादाय उप आयुक्त, पुणे विभाग पुणे, हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये चौकशी करणार आहेत. सदर बदल अर्जाद्वारे न्यासाच्या घटना, नियम व नियमावलीत बदल मंजुरीसाठी नोंदविण्यात आलेला आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत/हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यातारखेपासून तीस दिवसांचे आत कार्यालयात समक्ष येऊन कैफियत/हरकत दाखल करावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा/हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत/हरकत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

आज दिनांक २५/६/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व मा. धर्मादाय उप-आयुक्त, पुणे विभाग, पुणे, यांच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
अधिक्षक, (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पुणे विभाग, पुणे

(शिक्का)

सकाळ ५/७/२४ पान ७

# 'तुळजाराम' महाविद्यालयास 'अधिकारप्रदत्त स्वायत्त' दर्जा

बारामती, ता. ५ : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा (एम्पावर्ड ऑटोनॉमस कॉलेज स्टेटस) दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाच्या अधीन राहून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ स्वायत्त महाविद्यालय व मान्यता प्राप्त परिसंस्था यांना अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याबाबतची मानके, यामधील तरतुदींच्या आधारे, तसेच विद्यापीठ अनुदान आयोग संबंधित शिखर संस्था व केंद्र व राज्य सरकार तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यांच्याकडून निर्गमित केलेल्या नियमानुसार २०२४-२५ ते २०३३-२०३४ या पुढील दहा वर्षाकरिता हा दर्जा प्रदान केला आहे. अनेकांत एज्युकेशन याबाबत माहिती दिली. जून १९६२ मध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची स्थापना केली. महाविद्यालयास धार्मिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झाला. 'नॅक ए प्लस' दर्जा मिळाला आहे. या महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराने सन्मानित केले आहे. महाविद्यालयाचे रशिया, उझबेकिस्तान तसेच आसाम येथील विद्यापीठ व संशोधन संस्थांबरोबर आंतरराष्ट्रीय करार झाले. महाविद्यालयात ११ संशोधन केंद्र असून ५१ मार्गदर्शक प्राध्यापकांचे १४० विद्यार्थी पीएच. डी. करीत आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी दिली. महाविद्यालयास अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी

दैनिक सकाळ दि. ०६/०७/२०२४ पान ४

# 'तुळजाराम' महाविद्यालयास 'अधिकारप्रदत्त स्वायत्त' दर्जा

बारामती, ता. ५ : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा (एम्पावर्ड ऑटोनॉमस कॉलेज स्टेटस) दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाच्या अधीन राहून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ स्वायत्त महाविद्यालय व मान्यता प्राप्त परिसंस्था यांना अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याबाबतची मानके, यामधील तरतुदींच्या आधारे, तसेच विद्यापीठ अनुदान आयोग संबंधित शिखर संस्था व केंद्र व राज्य सरकार तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यांच्याकडून निर्गमित केलेल्या नियमानुसार २०२४-२५ ते २०३३-२०३४ या पुढील दहा वर्षांकरिता हा दर्जा प्रदान केला आहे. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी याबाबत माहिती दिली. जून १९६२ मध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची स्थापना केली. महाविद्यालयास धार्मिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झाला. 'नॅक ए प्लस' दर्जा मिळाला आहे. या महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराने सन्मानित केले आहे. महाविद्यालयाचे रशिया, उझबेकिस्तान तसेच आसाम येथील विद्यापीठ व संशोधन संस्थांबरोबर आंतरराष्ट्रीय करार झाले. महाविद्यालयात ११ संशोधन केंद्र असून ५१ मार्गदर्शक प्राध्यापकांचे १४० विद्यार्थी पीएच. डी. करीत आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी दिली. महाविद्यालयास अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे अभिनंदन केले आहे.

दै. सकाळ ०६/०७/२४ पान ४

पुणे जिल्हा

सकाळ ०६/०७/२४ ४

## अवतीभवती

### अमर कुलकर्णी यांना पीएच.डी. प्रदान



डॉ. अमर कुलकर्णी.

बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील ग्रंथपाल अमर कुलकर्णी यांना नुकतीच अरुणाचल प्रदेश येथील वेंकटेश्वरा मुक्त विद्यापीठाकडून ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात पीएच. डी. जाहीर झाली. 'स्टडी ऑफ बिब्लिओमेट्रीक अँड बेबोमेट्रिक्स ऍनालेसिस ऑफ ओपन ऍक्सेस केमिस्ट्री जर्नल्स' २०१५-२०१९ हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. त्यांना दिल्ली येथील आय. एन. टेक. इन्स्टिट्यूट येथील प्रा. डॉ. रामकृष्णचरण यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. अमर कुलकर्णी यांना मिळालेल्या यशाबद्दल अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, सर्व विश्वस्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.

दैनिक सकाळ दि. ०६/०४/२०२४ पान ५

# 'तुळजाराम' महाविद्यालयास 'अधिकारप्रदत्त स्वायत्त' दर्जा

बारामती, ता. ५ : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा (एम्पावर्ड ऑटोनॉमस कॉलेज स्टेटस) दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाच्या अधीन राहून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ स्वायत्त महाविद्यालय व मान्यता प्राप्त परिसंस्था यांना अधिकार प्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याबाबतची मानके, यामधील तरतुदींच्या आधारे, तसेच विद्यापीठ अनुदान आयोग संबंधित शिखर संस्था व केंद्र व राज्य सरकार तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, यांच्याकडून निर्गमित केलेल्या नियमानुसार २०२४-२५ ते २०३३-२०३४ या पुढील दहा वर्षांकरिता हा दर्जा प्रदान केला आहे. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी याबाबत माहिती दिली. जून १९६२ मध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची स्थापना केली. महाविद्यालयास धार्मिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त झाला. 'नॅक ए प्लस' दर्जा मिळाला आहे. या महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून उत्कृष्ट महाविद्यालय, उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराने सन्मानित केले आहे. महाविद्यालयाचे रशिया, उझबेकिस्तान तसेच आसाम येथील विद्यापीठ व संशोधन संस्थांबरोबर आंतरराष्ट्रीय करार झाले. महाविद्यालयात ११ संशोधन केंद्र असून ५१ मार्गदर्शक प्राध्यापकांचे १४० विद्यार्थी पीएच. डी. करीत आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी दिली. महाविद्यालयास अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे अभिनंदन केले आहे.

दैनिक सकाळ ०६/०४/२४ पान ५

## पुणे जिल्हा

सकाळ ०६/०४/२४ ४

## अवतीभवती

### अमर कुलकर्णी यांना पीएच.डी. प्रदान



डॉ. अमर कुलकर्णी.

बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील ग्रंथपाल अमर कुलकर्णी यांना नुकतीच अरुणाचल प्रदेश येथील वेंकटेश्वरा मुक्त विद्यापीठाकडून ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात पीएच. डी. जाहीर झाली. 'स्टडी ऑफ बिब्लिओमेट्रीक अँड बेबोमेट्रिक्स ॲनालेसिस ऑफ ओपन ॲक्सेस केमिस्ट्री जर्नल्स' २०१५-२०१९ हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. त्यांना दिल्ली येथील आय. एन. टेक. इन्स्टिट्यूट येथील प्रा. डॉ. रामकृष्णचरण यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. अमर कुलकर्णी यांना मिळालेल्या यशाबद्दल अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर, सर्व विश्वस्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.

लोकमत
पुणे, सोमवार, दि. २२ जुलै २०२४
५





# उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

• शुभेच्छुक •

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

**जवाहर शाह (वाघोलीकर)**
अध्यक्ष

**मिलिंद शाह (वाघोलीकर)**
सचिव

**सुनिल शि. शहा (लेंगरेकर)**
खजिनदार

श्री. विकास शहा (लेंगरेकर) | श्री. चंद्रवदन शहा (मुंबईकर) | श्री. चंद्रगुप्त शाह (वाघोलीकर) | श्री. विदयुत एम. शहा (इंजिनियर) | डॉ. हर्षवर्धन व्होरा | श्री. सत्यजित शहा (पंदारकर)

डॉ. सुभाष अडदंडे | श्री. पद्माकर पाटील | डॉ. महावीर अक्कोळे | डॉ. धवल पाटील | श्री. अशोक शिरगुप्पे | श्री. बाळासाहेब इंगळे

• स्वीकृत सदस्य •

श्री. राहुल शाह (वाघोलीकर) | डॉ. जयप्रकाश शहा (वडूजकर) | श्री. सोनिक शहा (पंदारकर)

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती**
**अनेकान्त इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बारामती**
**अनेकान्त इंग्लिश मिडीयम स्कूल, बारामती**

प्राचार्य, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, सर्व प्राध्यापक, संचालक, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

सकाळ बारामती तालुका

पुणे जिल्हा, सोमवार, २२ जुलै २०२४ । ६



मा.ना. **अजितदादा पवार** यांना **वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा**

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य

शुभेच्छुक

# अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

जवाहर शाह (वाघोलीकर)
अध्यक्ष

मिलिंद शाह (वाघोलीकर)
सचिव

सुनिल शि. शहा (लेंगरेकर)
खजिनदार

श्री.विकास शहा (लेंगरेकर) श्री.चंद्रवदन शहा (मुंबईकर) श्री.चंद्रगुप्त शाह (वाघोलीकर) श्री.विदयुत एम.शहा (इंजिनियर) डॉ.हर्षवर्धन व्होरा श्री.सत्यजित शहा (पंदारकर)

डॉ.सुभाष अडदंडे श्री.पद्माकर पाटील डॉ.महावीर अक्कोळे डॉ.धवल पाटील श्री.अशोक शिरगुप्पे श्री.बाळासाहेब इंगळे

* स्वीकृत सदस्य *


श्री.राहुल शाह (वाघोलीकर) डॉ.जयप्रकाश शहा (वडूजकर) श्री.सोनिक शहा (पंदारकर)

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

## अनेकान्त इंस्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बारामती

## अनेकान्त इंग्लिश मिडीयम स्कूल, बारामती

प्राचार्य, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, सर्व प्राध्यापक ,संचालक,सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी



# उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार

## यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

● शुभेच्छुक ●

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

| जवाहर शाह (वाघोलीकर) | मिलिंद शाह (वाघोलीकर) | सुनिल शि. शहा (लेंगरेकर) |
|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

श्री. विकास शहा ( लेंगरेकर ) · श्री. चंद्रवदन शहा (मुंबईकर) · श्री. चंद्रगुप्त शाह (वाघोलीकर) · श्री. विदयुत एम. शहा (इंजिनियर) · डॉ. हर्षवर्धन व्होरा · श्री. सत्यजित शहा (पंदारकर)

डॉ. सुभाष अडदंडे · श्री. पद्माकर पाटील · डॉ. महावीर अक्कोळे · डॉ. धवल पाटील · श्री. अशोक शिरगुप्पे · श्री. बाळासाहेब इंगळे

● स्वीकृत सदस्य ●

श्री. राहुल शाह (वाघोलीकर) · डॉ. जयप्रकाश शहा (वडूजकर) · श्री. सोनिक शहा (पंदारकर)

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती
## अनेकान्त इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, बारामती
## अनेकान्त इंग्लिश मिडीयम स्कूल, बारामती

प्राचार्य, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, सर्व प्राध्यापक, संचालक, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

दैनिक लोकमत २३/५/२५
पान ४

# प्रा. डॉ. गौतम जाधव यांना पुरस्कार



बारामती : अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्रा. डॉ. गौतम जाधव यांना नुकताच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने सुरू करण्यात आलेला पहिला उत्कृष्ट शारीरिक शिक्षण संचालक पुरस्कार पारंपरिक महाविद्यालय गटातून प्राप्त झाला. प्रा. डॉ. जाधव यांना यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पहिला उत्कृष्ट शारीरिक शिक्षण संचालक पुरस्कारदेखील प्राप्त झालेला आहे. क्रीडा समितीच्या पुरस्काराचे ते प्रथम मानकरी ठरल्यामुळे प्रा. डॉ. गौतम जाधव यांचे कौतुक करण्यात आले. यापूर्वी पर्ल फाउंडेशन, मदुराई या संस्थेचा उत्कृष्ट शारीरिक शिक्षण संचालक पुरस्कारदेखील प्राप्त झाला आहे. पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.

लोकमत २३/५/२५ ४

दै. पुढारी दि. २३/८/२४ - पान - ४

# प्रा. गौतम जाधव यांना उत्कृष्ट शारीरिक शिक्षण संचालक पुरस्कार

२३/८/२४ पान ४

बारामती : पुढारी वृत्तसेवा



अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील प्रा. डॉ. गौतम जाधव यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठअंतर्गत पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने सुरू करण्यात आलेला पहिला उत्कृष्ट शारीरिक शिक्षण संचालक पुरस्कार पारंपरिक महाविद्यालय गटातून प्राप्त झाला आहे.

प्रा. डॉ. गौतम जाधव यांना यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पहिला उत्कृष्ट शारीरिक शिक्षण संचालक पुरस्कारदेखील प्राप्त झालेला आहे. क्रीडा समितीच्या पुरस्काराचे ते प्रथम मानकरी ठरल्यामुळे जाधव यांचे विशेष अभिनंदन होत आहे.

यापूर्वी पर्ल फाउंडेशन मदुराई या संस्थेचा राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट शारीरिक शिक्षण संचालक पुरस्कारदेखील त्यांना प्राप्त झाला आहे. इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च वायनाड केरळ यांच्यातर्फे दिला जाणारा २०२३ चा डॉ. सी. व्ही. रमन पुरस्कार व दिल्ली येथील लॉर्ड गौतम बुद्धा राष्ट्रीय पारितोषिक प्राप्त झालेले आहेत.

मागील १४ वर्षांपासून महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रात त्यांनी भरीव कामगिरी केलेली आहे. आत्तापर्यंत आंतरराष्ट्रीय स्तरावर ९ खेळाडू तसेच राष्ट्रीय, विद्यापीठ व राज्यस्तरावर विविध खेळांतून अनेक खेळाडू खेळलेले आहेत. डॉ. जाधव यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, संस्थेचे सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.




टी. सी. महाविद्यालयाच्या प्रदर्शनाला तृतीय क्रमांक मिळाला.

# टी.सी. महाविद्यालय विज्ञान प्रदर्शनात तृतीय

बारामती : सोमेश्वरनगर (ता. बारामती) येथील सोमेश्वर इंजिनियरिंग कॉलेजमध्ये आयोजित सोमेश्वर टेक्नोथॉन २के२४ राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयातील पर्यावरण-शास्त्र या विषयाच्या 'इकोब्रिक्स' या प्रकल्पास तृतीय क्रमांक मिळाला. या प्रकल्पासाठी रोख पाच हजार रुपये, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन आरती दीपक ढोरे व सोनाली दादासाहेब बनकर इयत्ता १२वी विज्ञान या विद्यार्थिनींना प्रदान करण्यात आले. या प्रकल्पासाठी अनिता पाटील यांनी मार्गदर्शन केले. या प्रकल्पाची एकूण १४ प्रकल्पांमधून तृतीय क्रमांकासाठी निवड झाली. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांचे यासाठी मार्गदर्शन लाभले. आरती व सोनाली यांचा सत्कार सोमेश्वर कारखान्याचे संचालक आनंदकुमार होळकर, कार्यकारी संचालक राजेंद्र यादव, सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव भारत खोमणे आदींच्या हस्ते करण्यात आला.

पुढारी २७।५।२४ पा.न. ५

दै. पुढारी ६/८/२४ पान ५

# 'टी. सी.'त 'कृत्रिम बुद्धिमत्ता : संधी व आव्हाने' यावर व्याख्यान

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयामध्ये गुरुवारी (दि. १) कृत्रिम बुद्धिमत्ता वाणिज्य शाखेतील संधी आणि आव्हाने या विषयावर वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी बेंचमार्क आयटी सोल्युशन कंपनी पुणेचे संचालक मंगेश वाघ यांचे व्याख्यान पार पडले.

आपल्या मार्गदर्शनामध्ये वाघ यांनी सद्यस्थितीत कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे अपरिहार्य आहे, या तंत्रज्ञानाचा शिरकाव अकाउंटन्सी, स्टॉक मार्केट, अर्थशास्त्र इत्यादी क्षेत्रांमध्ये झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारित नोकरी, उद्योग, व्यवसाय करण्यासाठी आपल्या विषयाचे सखोल ज्ञान व तंत्रज्ञानातील विविध कौशल्ये संपादित केल्यास भविष्यात मोठ्या संधी प्राप्त होतील, असा विश्वास व्यक्त केला. परंतु यासोबत डाटा प्रायव्हसी, डाटा सुरक्षितता व माहिती संकलन या आव्हानांवरही प्रकाश झोत टाकला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या वैशाली माळी होत्या.



टी. सी. महाविद्यालयात मंगेश वाघ यांचा सत्कार करताना मान्यवर.

त्यांनी अशा प्रकारची व्याख्याने आयोजित करण्यामागचा उद्देश तसेच व्याख्यानांमधून मिळणाऱ्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी स्वतःचे भविष्य घडवावे, असे मत व्यक्त केले.

सकाळ · १/४/२४ पा.नं. १

# टीसी महाविद्यालयात रस्ता सुरक्षा कार्यशाळा

बारामती, ता. ( ) : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघटना आणि वाणिज्य विभाग यांच्या वतीने 'रस्ता सुरक्षा' विषयावर कार्यशाळा पार पडली.

बारामतीचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र केसकर यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी वाढदिवसाचे गिफ्ट देताना या पुढील काळात एकमेकांना हेल्मेट द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांना वाहने सावकाश चालविण्याचा सल्ला दिला.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांच्यासह वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. जनार्दन पवार, कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. मेघा बडवे, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. अशोक काळंगे आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

दै. पुढारी ७/१/२८ पान ६



टी. सी. महाविद्यालयात रस्ता सुरक्षेवर कार्यशाळा पार पडली.

# टी. सी. महाविद्यालयात रस्ता सुरक्षा कार्यशाळा

**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा
या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा पार पडली. माजी विद्यार्थी
संघटना व वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे
आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी उपप्रादेशिक परिवहन
अधिकारी राजेंद्र केसकर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना रस्ता
सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले आणि विद्यार्थ्यांनी एकमेकांना
वाढदिवसानिमित्त हेल्मेट गिफ्ट म्हणून द्यावे, असे आवाहन केले.
उपप्राचार्य प्रा. डॉ. सचिन गाडेकर यांनी महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी
रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करतील असा विश्वास व्यक्त केला.
प्रास्ताविक वाणिज्य विभागप्रमुख डॉ. जनार्दन पवार यांनी केले. या
कार्यशाळेच्या समन्वयक म्हणून डॉ. मेघा बडवे यांनी काम पाहिले.
उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे या वेळी उपस्थित होते.

२१/८/२४ पान ८



बारामती शहरातील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'रस्ता सुरक्षा' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली.

# 'रस्ता सुरक्षा' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा

२१/८/२४ पान ८

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : बारामती शहरातील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती येथे नुकतीच माजी विद्यार्थी संघटना आणि वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'रस्ता सुरक्षा' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेत प्रादेशिक परिवहन अधिकारी राजेंद्र केसकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी एकमेकांना वाढदिवसानिमित्त हेल्मेट गिफ्ट म्हणून द्यावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. सचिन गाडेकर उपस्थित होते. सर्व विद्यार्थी हे आदर्श विद्यार्थी असून, ते रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वाणिज्य विभागप्रमुख डॉ. जनार्दन पवार यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेच्या समन्वयक म्हणून डॉ. मेघा बडवे यांनी काम पाहिले.

पुढारी १२ मार्च २८ पान २

# 'टीसी'त प्रेमचंद जयंती साजरी

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामतीच्या हिंदी विभागातर्फे प्रेमचंद जयंती उत्सव आयोजित करण्यात आला होता. प्रेमचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमास फलटण येथील मुधोजी विद्यालयातील नितीन धवडे, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी प्रेमचंदजींच्या साहित्यात चित्रित केलेली मानवीय मूल्ये, तत्कालीन भारतीय शेतकरी, मजूर, पिडीत जीवन यावर विवेचन केले. प्रेमचंद यांचे समग्र साहित्य आजच्या काळात किती समर्पक आहे हे सांगतानाच त्यांनी कफन, ईदगाह, बडे घर की बेटी या कालातीत कथांबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. डॉ. सचिन गाडेकर होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रदीप सरवदे यांनी केले. नियोजन प्राचार्य प्रा. डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

१२ मार्च २८ पान २

पुढारी १२ मार्च २८ पान २

दै. पुढारी १५/१/२४ पान ४

# स्वरूप भुजबळ पोलिस उपनिरीक्षकपदी



**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी स्वरूप भरत भुजबळ याची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत प्रथम प्रयत्नामध्ये उत्तीर्ण होऊन पोलिस उपनिरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. स्वरूप याने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात २०२१-२२ मध्ये एम. ए. पदव्युत्तर शिक्षण घेतले. स्वरूप भुजबळ याने बेसबॉल ऑल इंडिया इंटरयुनिव्हर्सिटी चॅम्पियनशिपमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघातून सहभागी होऊन सुवर्णपदक प्राप्त केले. स्वरूप याने क्रीडा विभागाच्या कोट्यामधून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली व महाराष्ट्रातून प्रथम क्रमांकाने तो उत्तीर्ण झाला. स्वरूप याने अतिशय मेहनतीने हे यश संपादन केले आहे. त्यास प्राप्त झालेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी स्वरूप भुजबळचे अभिनंदन केले आहे.

पुढारी १५/१/२४ पान ४

दै. पुढारी दि. २०/०८/२४ पान ४

# टी. सी. महाविद्यालयात फोटोग्राफी स्पर्धा

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक छायाचित्रण दिनानिमित्ताने तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये 'थ्रू द फ्रेम्स' फोटोग्राफी स्पर्धा व प्रदर्शन २०२४ चे २१ ते २३ ऑगस्ट या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमधील कल्पनाशक्ती आणि कलागुणांना वाव मिळावा म्हणुन महाविद्यालयातील मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज विभागाकडून दरवर्षी ही स्पर्धा व प्रदर्शन भरविण्यात येते. यावर्षी प्रदर्शनाचे दहावे वर्ष आहे.

या स्पर्धेमध्ये विद्यार्थी, व्यावसायिक फोटोग्राफर तसेच फोटोग्राफीची आवड असणारी कोणतीही व्यक्ती सहभागी होऊ शकते. या स्पर्धेसाठी व्यक्ती, ठिकाण आणि निसर्ग हे विषय देण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिस, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. तसेच सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रदेखील दिले जाणार आहे.

यासाठी स्पर्धकांनी नोंदणी करणे गरजेचे आहे. ऑनलाइन व ऑफलाईन पद्धतीने सर्व स्पर्धक नाव नोंदणी करु शकतात. ऑनलाइन नाव नोंदणीसाठी https:/// forms. gle/ nif1 saL5 rPZiLrYw9 या लिंकवर स्पर्धकांनी आपली नावनोंदणी करावी. स्पर्धकांनी स्वतः काढलेले फोटो १९ ऑगस्टपर्यंत पत्रकारिता आणि जनसंवाद विभागात हार्डकॉपीच्या स्वरूपात जमा करावे किंवा throughtheframesphotography @gmail. Com. या इ-मेल आयडीवर फोटोंची सॉफ्ट कॉपी इ-मेल करावी. जास्तीत-जास्त स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी केले आहे.

पुढारी २०/८/२४ पान ४

दै. पुढारी दि. 20/08/24 पान 4

# टी. सी. महाविद्यालयात फोटोग्राफी स्पर्धा

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक छायाचित्रण दिनानिमित्ताने

व्यावसायिक फोटोग्राफर तसेच फोटोग्राफीची आवड असणारी कोणतीही व्यक्ती सहभागी होऊ शकते. या

शकतात. ऑनलाइन नाव नोंदणीसाठी https:/// forms. gle/ nif1 saLS rPZiLrYw9 या लिंकवर स्पर्धकांनी

दै. सकाळ दि 21/08/24 पान 3

# कोलकता घटनेच्या निषेधार्थ बारामतीत विद्यार्थ्यांचा मोर्चा

**बारामती, ता. २०** : कोलकता येथे झालेल्या महिला डॉक्टरवरील अत्याचार व खून प्रकरणाचा निषेध करण्यासाठी येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या विद्यार्थी व प्राध्यापकांनी मंगळवारी (ता. २०) मूक मोर्चा काढला होता. यात ५५० विद्यार्थी सहभागी झाले होते. या प्रकरणातील दोषींना कठोर शिक्षा व्हावी, या पुढील काळात असे प्रकार घडू नयेत, असे निवेदन उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी प्रशासनास दिले.

मोर्चामध्ये आय.एम.ए. बारामतीच्या अध्यक्षा डॉ. साधना कोल्हटकर, कलकत्ता येथील प्रिया दत्त, डॉ. महेश काटे, डॉ. अपर्णा काटे, डॉ. हरिदास काटे, उज्ज्वला जाधव, जवाहर वाघोलीकर, हर्षवर्धन वाघोलीकर, धवल वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी सहभागी होत पाठिंबा दिला. मूक मोर्चाचे संयोजन डॉ. सीमा नाईक गोसावी व सहकाऱ्यांनी केले.




**बारामती** : चतुरचंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी काढलेला मूक मोर्चा.

सकाळ 21/08/24 पान 3

लोकमत २२/८/२०२४




कोलकत्ता येथील अत्याचाराच्या निषेधार्थ तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापकांनी मोर्चा काढला.

# कोलकाता घटनेच्या निषेधार्थ बारामतीत मूक मोर्चा

२२/०८/२०२४

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** कोलकाता येथील सरकारी हॉस्पिटलमध्ये प्रशिक्षित महिला डॉक्टरवर कामावर असताना अमानुषपणे अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक यांनी निषेधार्थ ... यामध्ये तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, पत्रकारिता विभाग, विद्यार्थी विकास मंडळाचे ५५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

झालेल्या प्रकाराची योग्य दखल घेऊन यामध्ये सामील अपराध्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशा प्रकारच्या दुर्दैवी व अमानुष घटना समाजात यापुढे घडणार नाहीत. अशा आशयाचे निवेदन उपजिल्हाधिकारी महेश हरिश्चंद्र यांना उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी सर्वांच्या वतीने दिले. या मोर्चामध्ये आयएमए बारामतीच्या अध्यक्षा डॉ. साधना कोल्हटकर, कोलकाता येथील प्रिया दत्त, डॉ. महेश काटे डॉ. अपर्णा काटे, डॉ. हरिदास काटे, उज्ज्वला जाधव, प्रशासकीय अधिकारी, महिला बालकल्याण समिती यांनी पाठिंबा दिला. त्याचप्रमाणे या मोर्चास अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, संस्थेचे सदस्य हर्षवर्धन शाह वाघोलीकर, धवल शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी पाठिंबा दिला. मूक मोर्चाचे संयोजन महिला अत्याचार विरोधी कृती समितीच्या प्रमुख डॉ. सीमा नाईक गोसावी व सर्व सदस्य यांनी केले.

पुढारी २४/०८/२४ पान ३

# कोलकाता घटनेच्या निषेधार्थ मूक मोर्चा

बारामती : पुढारी वृत्तसेवा २४/०८/२४ पान ३

कोलकाता येथील आर. जी. कार मेडिकल महाविद्यालयात डॉक्टर युवतीवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ बारामतीतील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाकडून मूक मोर्चा काढण्यात आला. सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, पत्रकारिता विभाग, विद्यार्थी विकास मंडळाचे असे एकूण ५५० विद्यार्थी, महाविद्यालयाचे पदाधिकारी व प्राध्यापकांनी या मोर्चात सहभाग नोंदविला.

झालेल्या प्रकाराची योग्य दखल घेऊन यामध्ये सामील अपराध्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशा प्रकारच्या दुर्दैवी व अमानुष घटना समाजात यापुढे घडणार नाहीत अशा आशयाचे निवेदन अप्पर तहसीलदार महेश हरिश्चंद्र यांना उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर यांनी दिले.

आयएमए बारामतीच्या अध्यक्ष डॉ. साधना कोल्हटकर, प्रिया दत्ता, डॉ. महेश काटे, डॉ. अपर्णा काटे, डॉ. हरिदास काटे, उज्ज्वला जाधव आदी या वेळी उपस्थित




मूक मोर्चात सहभागी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर व अन्य.

होते. मूक मोर्चास अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी सहभागी होत पाठिंबा दिला. मूक मोर्चाचे संयोजन महिला अत्याचार विरोधी कृती समितीच्या प्रमुख डॉ. सीमा नाईक गोसावी व समितीतील सदस्यांनी केले.

दिनांक 23/08/2024

Anekant Education Society's

# ANEKANT INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES (AIMS)

Anekant Education Society Campus, Baramati Dist – Pune
Website: www.aimsbaramati.org
Email Id: director.aimsbaramati@gmail.com

**Religious Minority Institution**

**Contact No. 8888340340, 02112-227299**

## MBA Direct Second Year ( LATERAL ENTRY ) ADMISSION 2024-25

**Applications are invited from registered candidates who have completed B.Tech. B.E, BMS, BBA (4 years).**

## *Admission Schedule*

| Activity | Date |
|---|---|
| Invitation of application | 24/08/2024 to 27/08/2024 (Up to 5:00 PM) |
| Display of Merit List | 27/08/2023 at 5:30 PM |
| Confirmation of Admission | 28/08/2023 (Up to 5:00 PM) |

Note: Admission will be as per inter-se-merit declared by Competent Authority.
For more detail please refer Institute's and CET Cell's website.

**Director**
**AIMS**

**Secretary**
**AIMS**

दै. लोकमत 23/08/2024

[illegible] 28/8/24 [illegible]

[illegible] 28/8/24 [illegible]

Anekant Education Society's

**ANEKANT INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES (AIMS)**

**Anekant Education Society Campus, Baramati Dist –Pune**

## CORRIGENDUM

In reference to the advertisement dated 23-08-2024 MBA direct second year (Lateral Entry) admission, 'Display of Merit List' & 'Confirmation of Admission' dates read as 2024 instead 2023.

Director

पुढारी 24/7/24 पान 4

# प्रा. तृप्ती आरेकर यांना पीएच. डी.



बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संख्याशास्त्र विभागातील प्रा. तृप्ती शंतनू आरेकर यांना जगदीशप्रसाद झाबरमल टिबडेवाला विश्वविद्यालय, झुंझुनू यांच्याकडून संख्याशास्त्र विषयाची पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. 'क्लस्टरींग स्ट्रॅटेजीस यूझिंग डिफरंट सिमिलरॅटीज मेजर्स ' या विषयावर त्यांनी प्रबंध सादर केला होता. यासाठी त्यांना या विश्वविद्यालयाच्या डॉ. स्वाती देसाई यांनी मार्गदर्शन केले. तर पुण्याच्या आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. जया लिंबोरे यांनी सहमार्गदर्शन केले. प्रा. डॉ. आरेकर या टीसी महाविद्यालयाच्या संख्याशास्त्र विभागामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन पेपर प्रसिद्ध केले आहेत. प्रा. डॉ. आरेकर यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर), प्राचार्य, डॉ.अविनाश जगताप, विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. विकास काकडे, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. पुढारी 24/7/24.4

लोकमत 24/7/24 पान 4

# प्रा. तृप्ती आरेकर यांना पीएच.डी.

लोकमत न्यूज नेटवर्क



बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संख्याशास्त्र विभागातील प्रा. तृप्ती शंतनू आरेकर यांना श्री जगदीशप्रसाद झाबरमल टिबडेवाला विश्वविद्यालय, झुंझुनू यांनी संख्याशास्त्र विषयाची पीएच.डी. पदवी प्रदान केली.

संशोधन 'क्लस्टरिंग स्ट्रॅटेजीस यूझिंग डिफरंट सिमिलरॅटीज मेजर्स' हा प्रबंध त्यांनी सादर केला होता. या संशोधन कार्यासाठी त्यांना डॉ. स्वाती देसाई, श्री जगदीशप्रसाद झाबरमल टिबडेवाला विश्वविद्यालय, झुंझुनू यांनी मार्गदर्शन केले. प्रा.डॉ. आरेकर यांचे संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह, सचिव मिलिंद शाह, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, प्रा.डॉ. विकास काकडे यांनी अभिनंदन केले.

लोकमत 24/7/24 4

पुढारी २४/०१/२५ पान ४

# टीसी महाविद्यालयातील तीन प्राध्यापकांना पीएच.डी.

**बारामती,** ता. २३ : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील तृप्ती आरेकर, पूजा गायकवाड व नीलांबरी जगताप यांना संख्याशास्त्र या विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. या तिन्ही प्राध्यापकांना श्री जगदीशप्रसाद झाबरमल टिबडेवाला विश्वविद्यालय, झुंझुनू यांच्याकडून पीएच.डी. पदवी प्रदान केली गेली.


**पूजा गायकवाड**


**नीलांबरी जगताप**


**तृप्ती आरेकर**

तृप्ती आरेकर यांनी 'क्लस्टरींग स्ट्रॅटेजीस यूझिंग डिफरंट सिमिलरॅटीज मेजर्स' हा प्रबंध सादर केला. त्यांना डॉ. स्वाती देसाई व डॉ. जया लिंबोरे यांनी मार्गदर्शन केले. पूजा गायकवाड यांनी 'कंपॅरिटिव्ह स्टडी ऑफ मशिन लर्निंग अल्गोरिदम्स फॉर द प्रेडिक्शन ऑफ ॲनिमिया अमंग वूमेन ॲडव्हान्स एॅट रिप्रॉडक्टिव्ह एज' हा प्रबंध सादर केला होता. नीलांबरी जगताप यांनी 'क्रिटिकल कम्पॅरिझन बिटवीन डिस्क्रिप्टिव्ह डायग्नॉस्टिक, प्रिडक्टिव्ह अँड प्रिस्किप्टिव्ह स्टॅटिस्टिकल मॉडेल' हा प्रबंध सादर केला. त्यांना डॉ. स्वाती देसाई व टीसीचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी मार्गदर्शन केले.

पुढारी २४/०१/२५ पान ४

पुढारी

पुणे, रविवार, २५ ऑगस्ट २०२४ ५

# 'अनेकान्त'चे वाघोलीकर यांना चेंजमेकर अवॉर्ड

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**



येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांना तामिळनाडूतील आयसीटी ॲकेडमीतर्फे चेंजमेकर ॲवार्ड देण्यात आला.

आयसीटी अकॅडमी तामिळनाडू तर्फे पुणे येथे ब्रिज कॉन्फरन्स २०२४चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तामिळनाडूचे माहिती तंत्रज्ञानमंत्री डॉ. पालनी वेल ठिगाराजन यांच्या हस्ते अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव मिलिंद शाह वाघोलीकर यांना 'एज्युकेशन चेंज मेकर' अवॉर्ड प्रदान करण्यात आला. वाघोलीकर हे गेल्या अनेक वर्षांपासून अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या सचिवपदी कार्यरत आहेत. त्यांनी बारामती नगरपरिषद बांधकाम समितीचे चेअरमन म्हणून अनेक वर्षे काम केले आहे. संस्थेच्या व महाविद्यालयाच्या विकासासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, संस्थेचे विश्वस्त, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले आहे.

पुढारी २५/८/२४ पान ५

---

पान ६
सकाळ २५/८/२४

# मिलिंद वाघोलीकर यांना चेंजमेकर ॲवॉर्ड



मिलिंद वाघोलीकर

**बारामती :** आयसीटी ॲकॅडमी तमिळनाडूतर्फे पुणे येथे ब्रिज कॉन्फरन्स २०२४ घेण्यात आली. यामध्ये अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सचिव मिलिंद वाघोलीकर यांना एज्युकेशन चेंजमेकर ॲवॉर्ड तमिळनाडूचे माहिती तंत्रज्ञान मंत्री डॉ. पालनी वेल ठिगाराजन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. वाघोलीकर अनेक वर्षांपासून अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या सचिवपदी कार्यरत आहेत. त्यांनी बांधकाम समितीचे चेअरमन म्हणून अनेक वर्षे काम केले आहे. संस्थेच्या आणि महाविद्यालयाच्या विकासासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. वाघोलीकर यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, संस्थेचे विश्वस्त, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी त्यांचे अभिनंदन केले.

पुढारी २५/०१/२०२४ पान ५

# प्रा. जगताप, प्रा. गायकवाड यांना पीएच.डी.



प्रा. जगताप



प्रा. गायकवाड

बारामती : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील संख्याशास्त्र विषयाच्या प्रा. नीलांबरी जगताप व प्रा. पूजा गायकवाड यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. प्रा. जगताप यांना जगदीशप्रसाद झाबरमल टिबडेवाला विश्वविद्यालय झुंझुनू यांनी संख्याशास्त्र विषयाची पीएच.डी.पदवी प्रदान केली आहे. त्यांनी 'क्रिटिकल कम्पॅरिझन बिटवीन डिस्क्रिप्टिव्ह डायग्नोस्टिक, प्रिडिक्टिव्ह अँड प्रिस्किप्टिव्ह स्टॅटिस्टिकल मॉडेल' हा प्रबंध त्यांनी सादर केला होता. या संशोधन कार्यासाठी त्यांना या विश्वविद्यालयाच्या डॉ. स्वाती देसाई यांनी मार्गदर्शन केले. तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी सहमार्गदर्शक म्हणून काम पाहिले. प्रा. पूजा गायकवाड यांनाही झुंझुनूच्या विश्वविद्यालयालयाकडून संख्याशास्त्र विषयात पीएच.डी.पदवी प्रदान केली आहे. त्यांनी 'कंपॅरिटिव्ह स्टडी ऑफ मशिन लर्निंग अल्गोरिदम्स फॉर द प्रेडिक्शन ऑफ ऍनेमिया अमंग वूमेन ऍडव्हान्स ऍट रिप्रॉडक्टिव्ह एज' हा प्रबंध त्यांनी सादर केला होता. या संशोधन कार्यासाठी त्यांना या विश्वविद्यालयाच्या डॉ. फारुकी झाकीरहुसेन, जगदीश प्रसाद यांनी मार्गदर्शन केले, तर महाविद्यालयाच्या डॉ. वैशाली पाटील यांनी सह मार्गदर्शक म्हणून काम पाहिले. संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह, सचिव मिलिंद शाह, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. विकास काकडे, उपप्राचार्य, रजिस्ट्रार व प्राध्यापक, प्राध्यापकेतर वर्गाकडून या दोन्ही प्राध्यापिकांचे अभिनंदन करण्यात आले.

लोकमत २५/८/२४ पान ६

# दिल्ली समारोहात प्राध्यापक, स्वयंसेवक अतिथी

२५/८/२४ पान ६

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास कर्डिले व स्वयंसेवक साक्षी रमेश फाळके यांना स्वातंत्र्य दिन समारोहात विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहण्याचा बहुमान मिळाला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने 'मेरी माटी मेरा देश' या अभियानांतर्गत उत्कृष्टरीत्या अमृत कलश संकलन, अमृत वाटिका आदी उपक्रम राबविल्याबद्दल महाविद्यालयास हा बहुमान मिळाला. या अभिमानास्पद सन्मानाबद्दल अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



दिल्ली येथील स्वातंत्र्य दिन समारोहात टी. सी महाविद्यालयाचे प्राध्यापक, स्वयंसेवकांना विशेष अतिथींचा मान मिळाला.

पुढारी २५/८/२४ पान ५



स्वातंत्र्यदिन समारंभात टी. सी. महाविद्यालयातील डॉ. विलास कर्डीले व साक्षी फाळके यांना विशेष अतिथी म्हणून स्थान मिळाले.

## स्वातंत्र्यदिन समारंभात टी.सी.च्या दोघांना संधी

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास कर्डीले व स्वयंसेवक साक्षी रमेश फाळके यास १५ ऑगस्ट २०२४ रोजी ७८ व्या स्वातंत्र्य दिन समारोहात विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहण्याचा बहुमान मिळाला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने 'मेरी माटी मेरा देश' या अभियानांतर्गत उत्कृष्टरीत्या अमृत कलश संकलन, अमृत वाटिका आदी उपक्रम राबविल्याबद्दल महाविद्यालयास हा बहुमान मिळाला. या अभिमानास्पद सन्मानाबद्दल अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार,

पुढारी २५/८/२४ पान ५




**पुणे** : पुरस्कार स्वीकारताना तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा संघ.

# चतुरचंद महाविद्यालयास आयसीटी अकॅडमीतर्फे पुरस्कार

बारामती, ता. २७ : आयसीटी इन्फोटेक अंतर्गत स्टुडंट ट्रान्सफॉर्मेशन प्रोग्रामअंतर्गत विद्यार्थी प्रशिक्षण केंद्र आणि मायक्रोसॉफ्ट शिक्षकांसाठी सायबर शिक्षा अंतर्गत बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या प्रशिक्षण केंद्रास मान्यता देऊन गौरविण्यात आले. तमिळनाडूचे माहिती तंत्रज्ञान मंत्री, डॉ. पालनीवेल थीगाराजन यांचे हस्ते महाविद्यालयास याप्रसंगी पुरस्कार प्रदान करून सन्मानित केले.

आयसीटी ॲकॅडमी, तमिळनाडू यांच्यावतीने पुणे येथे ब्रीज कॉन्फरन्स २०२४ चे आयोजन केले होते. यावेळी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उपेंद्र चौधरी समन्वयक राहुल शहा, प्लेसमेंट समन्वयक महेश फुले यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

आयसीटी ॲकॅडमी आणि महाविद्यालय यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत २०१८ पासून विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट प्रशिक्षण कॉलेज टू कॅम्पस, सॉफ्ट स्किल, बीएफएसआय, विद्यार्थी परिवर्तन कार्यक्रम तसेच पॉवर सेमिनार अंतर्गत कॉर्पोरेट प्रशिक्षण, फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम, प्लेसमेंट, विद्यार्थी सक्षमीकरण तसेच आर्थिक साक्षरता, डिजिटल साक्षरता, शिक्षक सक्षमीकरण, आयटी कौशल्य प्रशिक्षण यांसारख्या विविध कार्यक्रमांतर्गत तीन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकासाचे ध्येय महाविद्यालयाने साध्य केले आहे. त्याबद्दल पुरस्कार प्रदान केला आहे. दरम्यान संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी अभिनंदन केले.

दै. पुढारी दि. 20/07/24 पान ४

# टी. सी. महाविद्यालयात फोटोग्राफी स्पर्धा

लोकमत 25/07/24 पान 5

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे
**तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय**, ता. बारामती, जि. पुणे
**स्वायत्त**
NAAC Re-accredited 'A+' Grade, ISO 210001:2018 Certified,
जैन अल्पसंख्याक संस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित
वेबसाईट : www.tccollege.org ई-मेल : principal.tccollege@gmail.com,
संपर्क क्र. ०२११२-२२२४०५

**प्रवेश सूचना २०२४-२०२५**

आमच्या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली (AICTE) व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ... अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे ... असलेला DTE ...

पुढारी 25/07/24 पान 3

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,
**तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय**, ता. बारामती, जि. पुणे
**स्वायत्त**
NAAC Re-accredited 'A+' Grade, ISO 210001:2018 Certified, जैन अल्पसंख्याक संस्था
वेबसाईट : www.tccollege.org
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित
ई-मेल :principal.tccollege@gmail.com

**प्रवेश सूचना २०२४-२०२५**

आमच्या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ ... पुणे विद्यापीठ, पुणे ...

लोकमत २०/०१/२४ पान ५

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ता. बारामती, जि. पुणे

## स्वायत्त

NAAC Re-accredited 'A+' Grade, ISO 210001:2018 Certified,

जैन अल्पसंख्याक संस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित

वेबसाईट : www.tccollege.org ई-मेल : principal.tccollege@gmail.com,

संपर्क क्र. ०२११२-२२२४०५

## प्रवेश सूचना २०२४-२०२५

आमच्या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे मान्यताप्राप्त झालेल्या खालील अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रथम पसंतीकरिता आवश्यक असलेला DTE कोड नंबर खालीलप्रमाणे आहे. तरी इच्छुकांनी कार्यालयाशी समक्ष संपर्क साधावा.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | DTE कोड नंबर | प्रवेश क्षमता | संपर्क |
|---|---|---|---|---|
| वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत | | | | |
| १ | बी.बी.ए. | Code Number : 16195 | १२० | ९८९०५११२४१ |
| २ | बी.बी.ए.(सी.ए.) | Code Number : 16195 | १८० | ९५०३६६८६७५ |
| विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत | | | | |
| ३ | बी.सी.ए.(सायन्स) | Code Number : 16164 | १८० | ९७३०३४८६१७ |

प्राचार्य

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि. पुणे

* * * *

लोकमत २०/०१/२४ पान ५

पुढारी २०/०१/२४ पान ३

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ता.बारामती, जि. पुणे

## स्वायत्त

NAAC Re-accredited 'A+' Grade, ISO 210001:2018 Certified, जैन अल्पसंख्याक संस्था

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित

वेबसाईट : www.tccollege.org ई-मेल :principal.tccollege@gmail.com संपर्क क्र. 02112-222405

## प्रवेश सूचना २०२४ - २०२५

आमच्या महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४ - २०२५ पासून आखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे मान्यताप्राप्त झालेल्या खालील अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रथम पसंतीकरिता आवश्यक असलेला DTE कोड नंबर खालीलप्रमाणे आहे. तरी इच्छुकांनी कार्यालयाशी समक्ष संपर्क साधावा.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | DTE कोड नंबर | प्रवेश क्षमता | संपर्क |
|---|---|---|---|---|
| वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्गत | | | | |
| १ | बी.बी.ए. | Code Number : 16195 | 120 | ९८९०५११२४१ |
| २ | बी.बी.ए.(सी.एं.) | Code Number : 16195 | 180 | ९५०३६६८६७५ |
| विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत | | | | |
| ३ | बी.सी.ए.(सायन्स) | Code Number : 16164 | 180 | ९७३०३४८६१७ |

प्राचार्य

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि. पुणे

पुढारी २०/०१/२४ पान ३

दै. सकाळ दि. ३०/०८/२०१४

# टीसी कॉलेज येथे सेवानिवृत्तांचा मेळावा

बारामती, ता. २९ : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात सेवानिवृत्त सेवकांचा १७ वा आनंद मेळावा नुकताच पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. धनसिंग जगताप होते. याप्रसंगी दिवंगत सेवक, नातेवाईक व इतरांना श्रद्धांजली अर्पण केली गेली.

मागील सभेचा कार्यवृत्तांत नीलिमा दाभाडे यांनी वाचला, खर्चतपशिल वसंत बेलदार यांनी दिला. प्रमोद वडगावकर यांनी कविता सादर केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेजर मानसिंग गोडसे यांनी केले. पी. जी. मेहेर, एम. आर. साळवे, अनिल इंगळे यांनी मनोगत व्यक्त केले. रजनी सुर्वे यांनी आभार मानले. डॉ. डी. व्ही. सरवदे यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ ३०/०८/२०१४

## टी.सी. महाविद्यालयात एकपात्री कार्यक्रम उत्साहात

**बारामती :** बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात महिला अत्याचार विरोधी कृती समिती अंतर्गत 'सेफ वर्क प्लेसेस' या विषयावर पुणे येथील लेखक व समुपदेशक संदीप मसहूर यांच्या कथा अभिवाचनाचा एकपात्री कार्यक्रम उत्साहात पार पडला. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध मनाई आणि निवारण अधिनियम २०१३ विशाखा कायदा (पॉश) याबाबत साक्षरता व जागरूकता निर्माण होण्यासाठीची माहिती त्यांनी या वेळी दिली. ते म्हणाले, कामाच्या ठिकाणी महिलांना आश्वासक व सुरक्षित वातावरण हवे. पॉश कायदा हा नागरी कायदा आहे. याचे कामाच्या ठिकाणी गांभीर्याने पालन केले गेले पाहिजे. महिलांना शिक्षणाचा मूलभूत हक्क आहे त्यांना सन्मानाने वागविले पाहिजे. तीन सत्रामध्ये या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप हे अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक समितीच्या चेअरमन डॉ. सीमा नाईक-गोसावी यांनी केले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा हे या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन डॉ. नाईक-गोसावी, सुषमा संगई व समिती सदस्य यांनी केले.

## टी.सी. कॉलेज सेवानिवृत्तांचा मेळावा

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील सेवानिवृत्त सेवकांचा आनंद मेळावा नुकताच पार पडला. प्रा. डॉ. धनसिंग जगताप अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक मेजर मानसिंग गोडसे यांनी केले. निवृत्त झालेल्या निशा मोदी व एम.आर साळवे यांचा हार्मोनियम परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. मागील सभेचा कार्यवृत्तांत नीलिमा दाभाडे यांनी वाचला. खर्च तपशील वसंत बेलदार यांनी दिला. प्रमोद वडगावकर, पी.जी. मेहेर, एम.आर. साळवे, अनिल इंगळे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. डी.व्ही. सरवदे यांनी सूत्रसंचालन केले. रजनी सुर्वे यांनी आभार मानले.

सकाळ ३१।८।२४

अवतीभवती पान ९

# टीसी महाविद्यालयात कथा अभिवाचन

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात महिला अत्याचार विरोधी कृती समिती अंतर्गत सेफ वर्क प्लेसेस या विषयावर पुण्यातील समुपदेशक संदीप मसहूर यांच्या कथा अभिवाचनाचा एकपात्री कार्यक्रम आयोजित केला होता. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंध मनाई आणि निवारण अधिनियम २०१९ विशाखा कायदा, पॉश कायद्याबाबत साक्षरता व जागरूकता निर्माण होण्यासाठीची संदीप मसहूर यांनी माहिती दिली. कायद्याचे गठण, तरतुदी, स्वरूप, अंमलबजावणी व शिफारशी याचीही त्यांनी माहिती दिली. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, रजिस्ट्रार अभिनंदन शहा उपस्थित होते. डॉ. सीमा नाईक गोसावी, सुषमा संगई व समिती सदस्य यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सीमा नाईक गोसावी यांनी केले.

दैनिक पुढारी






आयसीटी अकॅडमीतर्फे टी. सी. महाविद्यालयाला ॲवॉर्ड देत गौरविण्यात आले.

# टी. सी. महाविद्यालयाचा गौरव

**बारामती :** आयसीटी अकॅडमी तामिळनाडूतर्फे पुणे येथे ब्रीज कॉन्फरन्स २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाला अवार्ड देऊन गौरविण्यात आले. आयसीटी इन्फोटेकअंतर्गत स्टुडंट ट्रान्सफॉर्मेशन प्रोग्रामअंतर्गत विद्यार्थी प्रशिक्षण केंद्र आणि मायक्रोसॉफ्ट शिक्षकांसाठी सायबर शिक्षाअंतर्गत प्रशिक्षण केंद्रास मान्यता देऊन गौरविण्यात आले. तामिळनाडूचे माहिती तंत्रज्ञानमंत्री डॉ. पालनीवेल थीगाराजन यांचे हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे, उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. उपेंद्र चौधरी, समन्वयक राहुल शहा, प्लेसमेंट समन्वयक प्रा. महेश फुले यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, संस्थेचे सचिव मिलिंद शहा वाघोलीकर यांनी अभिनंदन केले आहे.

पुढारी ०४/०९/२४ पान ४

# फोटोग्राफी स्पर्धेत उदयन घोडके प्रथम

बारामती : पुढारी वृत्तसेवा

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात आयोजित फोटोग्राफी स्पर्धेमध्ये अहमदनगरच्या न्यू आर्ट्स महाविद्यालयाच्या उदयन घोडके याने प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेला आणि प्रदर्शनाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला.

महाविद्यालयाच्या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागाकडून 'थ्रू द फ्रेम्स' फोटोग्राफी स्पर्धा आणि प्रदर्शन २२ ते २४ ऑगस्ट दरम्यान भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, स्पर्धेचे परीक्षक ऋषिकेश क्षिरसागर यांच्या हस्ते झाले. उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, डॉ. अशोक काळंगे, विभागप्रमुख प्रा. राहुल चौधरी,



टी. सी. महाविद्यालयात फोटोग्राफी स्पर्धा, प्रदर्शनाचे उद्घाटन करताना मान्यवर.

प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. स्पर्धेकरिता व्यक्ती, ठिकाण, निसर्ग या विषयांतर्गत तीनशेहून अधिक फोटो आले होते. यासोबतच पत्रकारिता विभागातील विद्यार्थांनी यंदाच्या पंढरपूर वारीमध्ये काढलेल्या व्यक्ती छायाचित्रांचे प्रदर्शन सुद्धा भरविण्यात आले होते.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे : विद्यार्थी गट : प्रथम- उदयन घोडके (न्यू आर्ट्स महाविद्यालय, अहमदनगर), द्वितीय- रोहित काळे (टी. सी. महाविद्यालय, बारामती), तृतीय- स्वप्निल गुंजारी (टी. सी. महाविद्यालय, बारामती), व्यावसायिक गट : प्रथम- अनिकेत गुरव (व्यावसायिक फोटोग्राफर,) द्वितीय - प्रतिक कचरे (फ्रीलान्सर, फोटोग्राफर), तृतीय- सौरभ माने (व्यावसायिक फोटोग्राफर)

दै. पुढारी दि ०५।०९।२४ पान ५

# अनेकान्त स्कूलचे हॉकी स्पर्धेत यश

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

बारामती येथील अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलमधील मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय नेहरू हॉकी स्पर्धेमध्ये घवघवीत यश मिळविले. या संघाची निवड विभागस्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा परिषद, पुणे तसेच एस.एन.बी.पी. इंटरनॅशनल स्कूल मोशी यांच्या संयुक्त विद्यमाने १७ वर्षांखालील पुणे जिल्हास्तरीय नेहरू हॉकी (मुले व मुली) स्पर्धा दि. २८ ऑगस्ट रोजी पार पडली. या स्पर्धेमध्ये बारामतीतील अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत विजेतेपद पटकावले.



जिल्हास्तरीय स्पर्धेत यश मिळविणाऱ्या बारामती येथील अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थिनी.

या संघातील तनुश्री पोटे, खुशबू कुमावत, सृष्टी रुपनवर, सृष्टी भोसले, कावेरी जाधव, चैतन्या खोरे, जुई गुळूमकर, अवंतिका म्हेत्रे, भूमिका पवार, पूर्वा जाधव, कृतिका गांधी, श्रीरक्षा बाबर, वेदिका वाघ, साक्षी नाळे, स्मृती नाळे या खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

या यशाबद्दल अनेकान्त शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), शाळा समितीचे अध्यक्ष चंद्रवदन शहा (मुंबईकर), प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी दिवाण, समन्वयिका स्मिता ढवळीकर तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

पुढारी दि ०५।०९।२४ पान ६

## 'इंडस्ट्री ओरिएंटेड' कार्यशाळा उत्साहात

**बारामती :** अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील बीबीए (सीए) विभागाने उद्योजकता विकास (ईडी) सेलच्या मार्गदर्शनाखाली एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले. 'इंडस्ट्री-ओरिएंटेड : उद्योजकता आणि ऑब्जेक्ट-ओरिएंटेड प्रोग्रामिंग' या विषयावर सोमवारी (दि. २) ही कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यशाळेत बीबीए (सीए) विभागाच्या द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्षाच्या १३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ऑब्जेक्ट-ओरिएंटेड प्रोग्रामिंग (ओओपी) या तांत्रिक संकल्पनांचे उद्योग क्षेत्रात उद्योजकतेच्या दृष्टिकोनातून कसे उपयोग होऊ शकतात, याबद्दल विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान देणे हे या कार्यशाळेचे उद्दिष्ट होते. पुण्यातील टास्क कन्सल्टंट्स प्रा. लि.चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद तासगावकर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील विविध समस्यांवर समाधान शोधण्यासाठी सृजनशील विचार करण्यास प्रवृत्त केले. विद्यार्थ्यांनी


ALFA
17
AIA

दै- सकाळ- दि - ६।९।२०२४: पा. नं - ३.

Anekant Education Society's

**ANEKANT INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES (AIMS)**

Anekant Education Society Campus, Baramati Dist –Pune

Religious Jain Minority Institute

Email: director@aimsbaramati.org Website: www.aimsbaramati.org

Contact us on : 02112-227299, 8888340340

(Approved by AICTE, Govt. of Maharashtra, Permanently Affiliated to S P Pune University)

**ADMISSION OPEN FOR MBA (A.Y. 2024-25) Against CAP Vacant Seats**

Admission Schedule

| Activity | Date |
|---|---|
| Invitation of Application | 08/09/2024 to 10/09/2024 (Up to 5:00 PM) |
| Display of Merit List | 11/09/2024 at 11:00 AM |
| Confirmation of Admission | 12/09/2024 (Up to 5:00 PM) |

Note: Admission will be as per inter-se-merit declared by the Competent Authority. For more details please refer Institute's and CET Cell's website.

Director
AIMS

सकाळ- दि- ६।९।२४.

Secretary
AIMS

दै- पुढारी- दि - ६।९।२०२४: पा. नं-३.

Anekant Education Society's

**ANEKANT INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES (AIMS)**

Anekant Education Society Campus, Baramati Dist –Pune

Religious Jain Minority Institute

Email: director@aimsbaramati.org Website: www.aimsbaramati.org

Contact us on : 02112-227299, 8888340340

(Approved by AICTE, Govt. of Maharashtra, Permanently Affiliated to S P Pune University)

**ADMISSION OPEN FOR MBA (A.Y. 2024-25) Against CAP Vacant Seats**

Admission Schedule

| Activity | Date |
|---|---|
| Invitation of Application | 08/09/2024 to 10/09/2024 (Up to 5:00 PM) |
| Display of Merit List | 11/09/2024 at 11:00 AM |
| Confirmation of Admission | 12/09/2024 (Up to 5:00 PM) |

Note: Admission will be as per inter-se-merit declared by the Competent Authority. For more details please refer Institute's and CET Cell's website.

Director
AIMS

Secretary
AIMS

पुढारी ६।९।२४ पान ३

दै- लोकमत. दि- ८/१२/२०२४. पा.नं- ४.

ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे शिष्यवृत्ती प्रदान

# राधिका शाह वाघोलीकर यांना स्कॉलरशिप प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी राधिका मिलिंद शाह वाघोलीकर यांना ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे आयोजित आयएफएसओ काँग्रेसमध्ये 'इंटरनॅशनल फेडरेशन फॉर द सर्जरी ऑफ ओबेसिटीॲंड मेटाबोलिक डिसऑर्डर आयएफएसओ' यांच्या वतीने शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. जगभरातून निवडलेल्या दहा जणांमध्ये भारतामधून त्या एकमेव ठरल्या आहेत.

ऑस्ट्रेलियामधील मेलबर्न येथे आयोजिलेल्या या आयएफएसओ काँग्रेसमध्ये जगभरातील ७३ देशांमधील नामांकित डॉक्टर्स व संशोधक सहभागी झाले होते.



विद्यार्थिनी राधिका शाह वाघोलीकर यांना ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

स्थूलपणावर शस्त्रक्रिया शस्त्रक्रियानंतर योग्य उपचार व काळजी या विषयातील अनेक प्रख्यात तज्ज्ञ या आयएफएसओ काँग्रेसमध्ये शोधनिबंध सादर केले. राधिका शहा यांनीदेखील शोधनिबंध सादर केला. कुमारी राधिका शहा यांना २०२३ मध्ये इटली येथे आयोजिलेल्या आयएफएसओ २०२३ काँग्रेसमध्ये 'बेस्ट पेपर अवॉर्ड' प्राप्त झाला आहे. राधिका यांनी मलेशिया, यूएसए, लंडन, बेल्जियम, फिलिपिन्स, इटली, तुर्की, ऑस्ट्रेलिया इत्यादी ठिकाणी आयोजिलेल्या परिषदेमध्ये शोधनिबंध सादर केले आहेत.

यापूर्वी अमेरिकेतील लासव्हेगास येथे झालेल्या 'अमेरिकन सोसायटी फॉर मेटाबोलिक ॲंड बेरियाट्रिक सर्जरी' या जगातील सर्वोच्च संस्थेच्या वार्षिक परिषदेमध्ये राधिका यांनी प्रशिक्षण दिले होते. राधिका शाह यांच्या आंतरराष्ट्रीय कामगिरीबद्दल अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, संस्थेचे विश्वस्त, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले आहे.

दै. सकाळ- दि- ७/१२/२०२४. पा.नं- ५.

# राधिका शहा यांना मेलबर्नची शिष्यवृत्ती



राधिका शहा

**बारामती, ता. ६ :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी असलेल्या राधिका मिलिंद शाह (वाघोलीकर) यांना ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे नुकत्याच आयोजित केलेल्या आयएफएसओ काँग्रेसमध्ये ''इंटरनॅशनल फेडरेशन फॉर द सर्जरी ... काळजी या विषयावर राधिका शहा यांच्यासह अनेक प्रख्यात तज्ज्ञांनी या काँग्रेसमध्ये शोधनिबंध सादर केले. त्यांना सन २०२३ मध्ये इटली येथे आयोजिलेल्या आयएफएसओ २०२३ काँग्रेसमध्ये 'बेस्ट पेपर अवॉर्ड' प्राप्त झाला आहे. त्यांनी मलेशिया, यूएसए, लंडन, बेल्जियम, फिलिपिन्स, इटली, तुर्की, ऑस्ट्रेलिया आदी ठिकाणी आयोजिलेल्या परिषदेमध्ये शोधनिबंध सादर केले आहेत.

यापूर्वी अमेरिकेतील लासव्हेगास



दै. सकाळ - दि - ८।६।२०२४. पा. क्रं - ५.

# राधिका शहा यांना मेलबर्नची शिष्यवृत्ती



राधिका शहा

**बारामती,** ता. ६ : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी असलेल्या राधिका मिलिंद शाह (वाघोलीकर) यांना ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे नुकत्याच आयोजित केलेल्या आयएफएसओ काँग्रेसमध्ये ''इंटरनॅशनल फेडरेशन फॉर द सर्जरी ऑफ ओबेसिटी अँड मेटाबोलिक डिसऑर्डर आय एफ एस ओ'' यांच्या वतीने सन्माननीय शिष्यवृत्ती प्रदान केली.

जगभरातून निवडलेल्या दहा ... एकमेव

काळजी या विषयावर राधिका शहा यांच्यासह अनेक प्रख्यात तज्ज्ञांनी या काँग्रेसमध्ये शोधनिबंध सादर केले. त्यांना सन २०२३ मध्ये इटली येथे आयोजिलेल्या आयएफएसओ २०२३ काँग्रेसमध्ये 'बेस्ट पेपर अवॉर्ड' प्राप्त झाला आहे. त्यांनी मलेशिया, यूएसए, लंडन, बेल्जियम, फिलिपिन्स, इटली, तुर्की, ऑस्ट्रेलिया आदी ठिकाणी आयोजिलेल्या परिषदेमध्ये शोधनिबंध सादर केले आहेत.

यापूर्वी अमेरिकेतील लासव्हेगास येथे झालेल्या 'अमेरिकन सोसायटी फॉर मेटाबोलिक अँड बेरिययाट्रिक सर्जरी' या जगातील सर्वोच्च संस्थेच्या वार्षिक परिषदेमध्ये त्यांनी प्रशिक्षण दिले होते. अनेकांत ... अध्यक्ष

दै- लोकमत · दि - ६/१२०२४ पा.नं - ८.



जिल्हास्तरीय नेहरू हॉकी स्पर्धेत अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूल, बारामतीच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले.

# जिल्हास्तरीय नेहरू हॉकी स्पर्धेत 'अनेकान्त'चे यश

६/१२/२४ पान ८

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय व जिल्हा क्रीडा परिषद तसेच एसएनबीपी इंटरनॅशनल स्कूल, मोशी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १७ वर्षाखालील जिल्हास्तरीय नेहरू हॉकी मुले व मुली स्पर्धेचे आयोजन मोशी येथील एसएनबीपी इंटरनॅशनल स्कूलमध्ये केले होते. या स्पर्धेत बारामती येथील अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

विजयी संघाची निवड विभागस्तरीय नेहरू हॉकी स्पर्धेसाठी झाली आहे. विजयी संघातील तनुश्री पोटे, खुशबू कुमावत, सृष्टी रूपनवर, सृष्टी भोसले, कावेरी जाधव, चैतन्या खोरे, जुई गुळूमकर, अवंतिका म्हेत्रे, भूमिका पवार, पूर्वा जाधव, कृतिका गांधी, श्रीरक्षा बाबर, वेदिका वाघ, साक्षी नाळे, स्मृती नाळे या खेळाडूंनी नेत्रदीपक कामगिरी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. या यशाबद्दल अनेकान्त शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जवाहर शहा (वाघोलीकर), शाळा समितीचे अध्यक्ष चंद्रवदन शहा (मुंबईकर), स्कूलच्या प्राचार्या डॉ. ऋचा तिवारी दिवाण, समन्वयिका स्मिता ढवळीकर तसेच सर्व शिक्षकांनी खेळाडूंचे विशेष अभिनंदन केले.

सकाळ · दि - ६/१२/२०२४ पा. नं - ४.

## टीसीमध्ये कायदेविषयक जाणीव जागृती व्याख्यान

**बारामती** : येथील तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालय, महिला सबलीकरण समितीअंतर्गत ॲड. सुप्रिया बर्गे यांनी कायदेविषयक जाणीव-जागृती व्याख्यानामध्ये कायदेविषयक माहिती दिली. मोबाईलच्या वापराचे फायदे व तोटे सांगितले व विद्यार्थ्यांच्या हातून नकळत सायबर गुन्हे कसे होऊ शकतात व त्याचे गंभीर परिणाम त्यांच्या करिअरवर होतात म्हणूनच विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर काळजीपूर्वक करावा असेही त्यांनी सांगितले. १८ ते ३० वर्ष वयोगटातील मुलांचा आत्मविश्वास कसा वाढवा, यासाठी काही प्रात्यक्षिके घेतली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी मार्गदर्शन केले. उपप्राचार्य वैशाली माळी अध्यक्षस्थानी होत्या. अनिता पाटील यांनी प्रास्ताविक केले.

सकाळ ६/१२/२४ ४

असलल्या राधिका मिलिंद शाह (वाघोलीकर) यांना ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे नुकत्याच आयोजित केलेल्या आयएफएसओ काँग्रेसमध्ये ''इंटरनॅशनल फेडरेशन फॉर द सर्जरी

अवॉर्ड' प्राप्त झाला आहे. त्यांनी मलेशिया, यूएसए, लंडन, बेल्जियम, फिलिपिन्स, इटली, तुर्की, ऑस्ट्रेलिया आदी ठिकाणी आयोजिलेल्या परिषदेमध्ये शोधनिबंध सादर केले आहेत.

यापूर्वी अमेरिकेतील लासव्हेगास

# अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

पत्ता : प्रशासन भवन, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती,
जि. पुणे- ४१३ १०२ मो.नं. ८६२४८१०६०६

## निविदा सूचना

आमच्या अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती या आवारातील स.नं.२६९/अ/१/१/२७०/अ/२७१/अ/प्लॉट नं. १ या ठिकाणी कॉमन फॅसिलिटी सेंटर या इमारतीच्या विस्तार व वाढीव बांधकामाकरिता अनुभवी व योग्य त्या वर्गामध्ये नोंदणी प्राप्त कंत्राटदारांकडून बी-१ प्रकारामध्ये सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | इमारतीचे क्षेत्रफळ | मजले | अंदाजे बांधकाम खर्च रु. | बयाणा रक्कम रुपये | सुरक्षा अनामत | कामाचा कालावधी | निविदा फी रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७६६.८७ चौ. मी. | ग्राउंड + तीन मजले | ३,७२,००,०००/- (तीन कोटी बहात्तर लाख रुपये) | अंदाजपत्रकीय रकमेच्या १% | अंदाजपत्रकीय रकमेच्या ५% (रोख २% आणि बिलातून ३%) | ९ महिने | १०,०००/- रोख ना परतावा |

कोऱ्या निविदा दि.०९-०९-२०२४ सकाळी ११.०० वा. पासून ते दि. १४-०९-२०२४ सायं. ५.०० वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध होतील. कोऱ्या निविदा घेण्यापूर्वी संस्थेच्या कार्यालयात निविदाच्या अटी व शर्ती पाहूनच कोरी निविदा खरेदी करावी. भरलेल्या निविदा दि. २०-०९-२०२४ रोजी दुपारी ४.०० वा. पर्यंत स्वीकारल्या जातील. प्री-बिडसंबंधी काही प्रश्न असतील तर secretary.anekant@gmail.com या मेलवर दि.१६-०९-२०२४ सायं. ५.०० वा. पर्यंत पाठवावे, यासंबंधी उत्तर आपल्या मेलवर दि.१८.०९.२०२४ रोजी मिळेल. दाखल झालेल्या निविदा दि.२०-०९-२०२४ दुपारी ४.०० वा. कंत्राटदारांच्या समक्ष उघडल्या जातील. बयाणा रक्कम डी.डी. द्वारे **अनेकान्त एज्युकेशन सोसायटी अकौंट लोकल कमिटी** या नावे द्यावयाची आहे. कोणतीही अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार अनेकान्त एज्युकेशन सोसायटीने राखून ठेवलेला आहे.

| आर्किटेक्ट | चेअरमन | सचिव |
|---|---|---|
| मिलिंद पावसकर ॲण्ड असोसिएट्स, पुणे | बांधकाम समिती | अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती |

दैनिक पुढारी दि ०७/०७/२०२४ पान ३

# बारामतीच्या राधिका शाह यांना ऑस्ट्रेलियात स्कॉलरशिप



**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी राधिका मिलिंद शाह वाघोलीकर यांना ऑस्ट्रेलिया येथील मेलबर्न येथे आयोजित केलेल्या आयएफएसओ काँग्रेसमध्ये 'इंटरनॅशनल फेडरेशन फॉर द सर्जरी ऑफ ओबेसिटी अँड मेटाबोलिक डिसऑर्डर आयएफएसओ' यांच्या वतीने शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सचिव मिलिंद शाह यांच्या त्या कन्या आहेत.

जगभरातून निवडलेल्या दहा जणांमध्ये भारतामधून त्या एकमेव ठरल्या आहेत. ऑस्ट्रेलियामधील मेलबर्न येथे आयोजिलेल्या या आयएफएसओ काँग्रेसमध्ये जगभरातील ७३ देशांमधील नामांकित डॉक्टर्स व संशोधक सहभागी झाले होते. 'स्थूलपणावर शस्त्रक्रिया, शस्त्रक्रियेनंतर योग्य उपचार व काळजी' या विषयातील अनेक तज्ज्ञांनी शोधनिबंध सादर केले. राधिका शाह यांनी देखील शोधनिबंध सादर केला. राधिका शाह यांच्या आंतरराष्ट्रीय कामगिरीबद्दल अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, संस्थेचे विश्वस्त प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले आहे. पुढारी ७/७/२४ ३

दैनिक पुढारी दि ०५/०७/२४ पान ३




टी. सी. महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात अॅड. सुप्रिया बर्गे यांचा सत्कार करण्यात आला.

# टी. सी. महाविद्यालयात कायदेविषयक व्याख्यान

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद कनिष्ठ महाविद्यालयात महिला सबलीकरण समिती अंतर्गत आयोजित कार्यक्रमात अॅड. सुप्रिया बर्गे यांनी कायदेविषयक माहिती दिली. कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. वैशाली माळी अध्यक्षस्थानी होत्या. त्यांनी मोबाईलच्या वापराचे ... सांगितले. विद्यार्थ्यांच्या हातून नकळत सायबर गुन्हे कसे ... होतात

दै. पुढारी १०/५/२४ पान ४

# 'टीसी'त 'अँगुलर फॉर एंटरप्रेनर्स' कार्यशाळा

१०/५/२४ पान ४

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील बीबीए (सीए) विभागाने उद्योजकता विकास (ईडी) सेलच्या मार्गदर्शनाखाली एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. 'अँगुलर फॉर एंटरप्रेनर्स : वेब डेव्हलपमेंट' या विषयावर कार्यशाळा पार पडली.

कार्यशाळेत बीबीए (सीए) विभागाच्या तृतीय वर्षातील ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेचे प्रमुख उद्दिष्ट अँगुलर या वेब विकासासाठी वापरण्यात येणाऱ्या तांत्रिक साधनाची ओळख करून देणे आणि उद्योजकांसाठी त्याचा उपयोग कसा करता येईल हे समजावून सांगणे होते.

**वेब विकासासाठीच्या तांत्रिक साधनाची ओळख**



**टी. सी. महाविद्यालयात 'अँगुलर फॉर एंटरप्रेनर्स' कार्यशाळा पार पडली.**

प्रमुख वक्ते म्हणून सॉफ्टवेअर डेव्हलपर रोहित शहा यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी अँगुलरचा वापर करून वेब अनुप्रयोग कसे तयार करता येतील याची माहिती दिली आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कोडिंग सत्रात सहभागी करून घेतले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, बीबीए (सीए) विभागप्रमुख प्रा. माधुरी सस्ते यांचे मार्गदर्शन मिळाले. संयोजन व सूत्रसंचालन प्रा. सलमा शेख यांनी केले, तर प्रा. दत्तात्रय आर्डे यांनी आभार मानले.


ठीच्या
धनाची
व

दैनिक पुढारी दि. २१/०९/२४ पान ४



एम. एस्सी. इन डेटा सायन्सच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. एस. आर. कुलकर्णी यांचा महाविद्यालयाकडून सत्कार करण्यात आला.

# 'संख्याशास्त्र हे डेटा सायन्सचे आधारस्तंभ'

**बारामती :** आजच्या युगातील महत्त्व सांगून डेटा सायन्स या विषयात संख्याशास्त्र विषयाचा मोलाचा वाटा असल्याचे नमूद केले. संख्याशास्त्र हे डेटा सायन्सचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहे. संख्याशास्त्र विषयाच्या मदतीने आपण डेटा सायन्स या विषयातील आधुनिक तंत्रज्ञान सहजतेने आत्मसात करू शकतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी प्राध्यापक डॉ. एस. आर. कुलकर्णी यांनी केले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संख्याशास्त्र विभागातर्फे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांपासून नव्याने एम. एस्सी. इन डेटा सायन्स हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. या अभ्यासक्रमाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे माजी प्राध्यापक प्रा. डॉ. एस. आर. कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. त्या वेळी 'डेटा सायन्स : इज इट चिन्नी कम स्टॅटिस्टीकल सायन्स?' या विषयावर ते बोलत होते. त्यांनी विविध क्षेत्रांतील डेटा सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी सध्याच्या अनुप्रयोगांची माहिती दिली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य प्रा. डॉ. अविनाश जगताप यांनी विविध क्षेत्रांमध्ये डेटा सायन्सची वाढती मागणी अधोरेखित केली आणि विद्यार्थ्यांनी या क्षेत्रातील संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. प्रास्ताविक संख्याशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. विकास काकडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. पूजा गायकवाड यांनी केले. डॉ. प्रीती मालुसरे यांनी आभार मानले. हा अभ्यासक्रम सुरू करण्यामध्ये अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांचा मोलाचा वाटा आहे.




तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत यश मिळविणारा अनेकान्तचा संघ.

## अनेकान्त स्कूलचे तायक्वांदोत यश

**बारामती :** अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलने तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत चमकदार कामगिरी केली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय व जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने तालुकास्तर तायक्वांदो स्पर्धा २०२४-२५ आयोजित करण्यात आली होती. १४, १७, १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटाची स्पर्धा माळेगाव येथे पार पडली. या स्पर्धेत बारामती येथील अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूल बारामतीच्या विद्यार्थ्यांनी खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत वर्चस्व प्रस्थापित केले. स्पर्धेत शरयू माने, रणविजय इंगळे यांनी सुवर्णपदकाची तर सई जगताप, पूर्वी खुडे, ईशानी पाटील यांनी रौप्यपदकाची कमाई केली. त्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. साईराज खलाटे, अनुष्का ताम्हाणे, सई जगताप, विक्रांत खलाटे यांनी कांस्यपदक मिळविले. शाळा समितीचे अध्यक्ष चंद्रवदन शहा मुंबईकर, समितीचे सर्व सदस्य, प्राचार्या डॉ. ऋच्या तिवारी-दिवाण यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. पुढारी १३।०९।२४ ४

# विद्यार्थ्यांनी आपले विचार ठामपणे मांडावेत

१३।०९।२४ पान ४

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**


माणसाची नम्रता ही त्याच्या आवाजावरून समजते. जागतिक स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी विचार मांडण्याचे कौशल्य आत्मसात केले पाहिजे. चिंध्या पांघरून सोनं विकायला बसलो, गिऱ्हाईक येता येईना, सोनं पांघरून चिंध्या विकायला बसलो गिऱ्हाईक हटता हटेना, अशी सध्याची परिस्थिती आहे. म्हणून आपले विचार ठामपणे मांडता आले पाहिजेत, असे मत प्रसिद्ध निवेदक शशांक मोहिते यांनी व्यक्त केले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील मराठी विभाग व उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भाषण लेखन - तंत्र आणि कला या कार्यशाळेमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. सीमा नाईक होत्या.

**शशांक मोहिते यांचे मत**

मोहिते म्हणाले, आपले भाषण लोकांना शहाणं करणारं असावं. भाषेचा वापर प्रांजळपणे करावा. त्यामध्ये कृत्रिमता असू नये. भाषणामध्ये आवाजाच्या चढ-उताराला महत्त्व आहे. चेहऱ्यावरचे हावभाव महत्त्वाचे असतात. अशा अनेक कल्पक उदाहरणातून त्यांनी विद्यार्थ्यांना भाषणाचे महत्त्व पटवून दिले.

प्रास्ताविक व स्वागत डॉ. नितीश सावंत यांनी केले. परिचय डॉ. मुक्ता आंभेरे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. सुनील खामगळ यांनी केले.



टी. सी. महाविद्यालयात भाषण तंत्र या विषयावर बोलताना शशांक मोहिते. सोबत उपस्थित विद्यार्थिनी.

## 'टीसी'ला तलवारबाजी स्पर्धेत विजेतेपद

बारामती : जिल्हा क्रीडा परिषद पुणे आयोजित जिल्हास्तरीय शासकीय शालेय क्रीडा स्पर्धेतील तलवारबाजी या स्पर्धेत बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या एकूण १४ खेळाडूंनी सहभाग घेऊन ईपी, फॉईल व सेबर या क्रीडा प्रकारात सांघिक विजेतेपद प्राप्त केले. राजगुरूनगर येथील हुतात्मा शिवराम हरी राजगुरू क्रीडा संकुलात नुकतीच ही स्पर्धा पार पडली. तलवारबाजीच्या फॉईल प्रकारात अनिशा देवकर -प्रथम, धनश्री शिंदे - द्वितीय, संस्कृती गटगिळे - तृतीय, हर्षदा माने -तृतीय, करण सुरवसे - द्वितीय आणि शुभम सूर्यवंशी याने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. सेबर प्रकारात अनिशा देवकर - द्वितीय, संस्कृती गटगिळे - तृतीय, आर्या पोळ - तृतीय आणि प्रवीण नरवडे याने तृतीय क्रमांक मिळविला. ईपी प्रकारात - आर्या पोळ - द्वितीय, विद्या मोरे - तृतीय , रसिका भोसले - तृतीय व करण सुरवसे याने तृतीय क्रमांक प्राप्त केला.या सर्व खेळाडूंनी जिल्हास्तर स्पर्धेत आपल्या क्रीडा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करून महाविद्यालयास सांघिक विजेतेपद प्राप्त करून दिले. या सर्व विद्यार्थ्यांची पुणे विभागस्तर तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना डॉ. गौतम जाधव व प्रा. अशोक देवकर यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह-वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह- वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.

# अवतीभवती

## 'स्पर्धेत टिकण्यासाठी संभाषण कौशल्य हवे'

बारामती : ''विद्यार्थ्यांनी विचार मांडण्याचे कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे, जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी संभाषण कौशल्य आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन संभाषणकला तज्ज्ञ व निवेदक शशांक मोहिते यांनी केले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील मराठी विभाग व उद्योजकता विकास केंद्रातर्फे आयोजित भाषण लेखन - तंत्र आणि कला या कार्यशाळेमध्ये ते बोलत होते. मोहिते पुढे म्हणाले की, संभाषण कौशल्य वापरताना त्यात कृत्रिमपणा असू नये. आवाजाचा चढ-उतार व चेहऱ्यावरचे हावभाव महत्त्वाचे असतात. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी प्रत्येकाला संवाद साधता येणे गरजेचे आहे, तोही प्रभावी असला पाहिजे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख डॉ. सीमा नाईक होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीश सावंत यांनी केले. डॉ. मुक्ता आंभेरे यांनी परिचय करून दिला. डॉ. सुनील खामगळ यांनी सूत्रसंचालन केले.

दै. लोकमत दि १५/०९/२४ पान ४

# चतुरचंद महाविद्यालयातील भगवान माळी यांना बारामतीरत्न पुरस्कार

१५।९।२४, ४

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** ज्येष्ठ नागरिक संघ यांनी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. भगवान माळी यांना ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ. प्रशांत मांडण यांच्या हस्ते बारामतीरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. माळी यांना शैक्षणिक, सामाजिक कार्याबद्दल हा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. डॉ. माळी हे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात अनेक वर्षांपासून वनस्पतीशास्त्र विभागात अध्यापन करीत असून, तीन वर्षांपासून वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून काम करीत आहेत. त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे व महाराष्ट्र राज्यातर्फे कार्यक्रम अधिकारी पुरस्कार मिळाला आहे. डॉ. माळी यांनी राज्य, राष्ट्रीय स्तरावरील परिषदा व कार्यशाळांमध्ये सहभागी होऊन अनेक शोधनिबंध प्रसिद्ध केलेले आहेत. भारत सरकारची तीन पेटंट त्यांना मंजूर झाली आहेत. सध्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली आठ विद्यार्थी पीएच.डी. करीत आहेत. डॉ. भगवान माळी यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.



तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. भगवान माळी यांना बारामतीरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सकाळ २१/९/२०१७

# अनेकान्त शाळेमध्ये हिंदी दिवस साजरा

**बारामती :** येथील अनेकान्त इंग्लिश मीडियम शाळेत राष्ट्रभाषा हिंदी दिवस विविध कार्यक्रमांनी साजरा केला गेला. कवी संदीप कमलाकांत सुभेदार यांच्या हस्ते सरस्वती पूजन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वरबद्ध हिंदी कविता सादर केल्या. 'बच्चों की कचहरी' यावर आधारित लघु नाटिका सादर केली. संदीप सुभेदार यांनी विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्त्व नमूद केले. ते म्हणाले, ''देशातील सर्व लोकांना एकत्र आणणारी हिंदी भाषा आहे. देशाला एकसंध ठेवण्यात हिंदीचे मोठे योगदान आहे. हिंदी ही केवळ भाषा नाही तर ती भारतीय संस्कृतीचा भाग आहे.''

सकाळ २१/९/१७

## निधन

### श्रीरंगराव जगताप



बारामती : येथील निवृत्त शिक्षक श्रीरंगराव बंडोबा जगताप (वय ९३) यांचे नुकतेच निधन झाले. बारामती नगर परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून त्यांनी दीर्घकाळ सेवा केली. त्यांच्या मागे दोन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप हे त्यांचे पुत्र होत.




अनेकान्त स्कूलमध्ये राष्ट्रभाषा हिंदी दिवस साजरा करण्यात आला.

# बारामती येथे अनेकान्त स्कूलमध्ये राष्ट्रभाषा हिंदी दिवस उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामंती : येथील अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये राष्ट्रभाषा हिंदी दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी कवी संदीप कमलाकांत सुभेदार यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. नंतर विद्यार्थ्यांनी

अतिथी कवी संदीप सुभेदार यांनी विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्त्व सांगितले. ते म्हणाले की, देशातील सर्व लोकांना एकत्र आणणारी हिंदी भाषा आहे. देशाला एकसंध ठेवण्यात हिंदी भाषेचे मोठे योगदान आहे.

हिंदी ही केवळ भाषा नाही, तर ती भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग

सकाळ २३/५/२४ पान ५

# 'जल्लोष'चे विजेतपद टीसी महाविद्यालयाकडे



बारामती : जल्लोष २०२४ स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी.

**बारामती, ता. २२ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ व शारदाबाई पवार महिला महाविद्यालय यांच्यावतीने आयोजित 'जल्लोष २०२४ जिल्हास्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवा'त तुळजाराम चतुरचंद (टी.सी.) महाविद्यालयाने २७ पैकी १८ कला प्रकारांत यश संपादन केले. हे महाविद्यालय यंदाच्या 'जल्लोष २०२४ चषका'चे मानकरी ठरले आहे.

या स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील २३ महाविद्यालयांतील ५८८ स्पर्धक सहभागी झाले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्वररंग या नावाचे 'जल्लोष २०२४' असे नामकरण केले होते. यंदा पहिल्याच जल्लोषचे विजेतपद टी.सी. महाविद्यालयाने पटकाविले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. देविदास वायदंडे, विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ. अभिजित कुलकर्णी, प्राचार्य डॉ. श्रीकुमार महामुनी, पुणे विद्यापीठाचे स्पर्धा समन्वयक स्वामीराज भिसे यांच्या उपस्थितीत झाले. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख भीमराव तोरणे, राजेंद्र कंडरे, सोमनाथ कदम, जय दोशी, विशाल मोरे व सौरभ पांढरे यांनी स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेतले. अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर, सचिव मिलिंद वाघोलीकर व डॉ. जगताप यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

## कला प्रकारांत यश

प्रहसन, एकांकिका, भारतीय समूह नृत्य, भारतीय समूह गायन, मूकनाट्य, पाश्चिमात्य समूह गायन, लोक वाद्यवृंद समूह, प्रश्नमंजूषा, इन्स्टॉलेशन, वादविवाद, चिकटकला, मेहंदी, पोस्टर मेकिंग, पाश्चिमात्य वाद्य वादन, स्वर वाद्य, सुगम संगीत, फोटोग्राफी या कला प्रकारांतील विजयी विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, रौप्यपदक, कांस्य पदक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

सकाळ २३/५/२४

दै पुढारी दि 23/9/24 पान 2




बारामतीत संयुक्त कर्मवीर जयंती महोत्सवात बोलताना प्रा. कृष्णात खोत व दुसऱ्या छायाचित्रात समोर उपस्थित विद्यार्थी.

# ‘कर्मवीरां’च्या ‘रयत’मुळे बहुजनांची मुले शिकली

23/9/24 पान 2

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

बहुजनांची मुले शिकावीत यासाठी गावोगावी फिरून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शाळा सुरू केल्या. त्यांच्यामुळेच बहुजनांच्या मुलांना शिक्षणाची कवाडे खुली झाली, असे मत साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक प्रा. कृष्णात खोत यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ वी जयंती बारामतीत उत्साहात साजरी करण्यात आली, त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. गाडेकर होते. बारामती शहर व तालुक्यातील सर्व विद्यालये व महाविद्यालयांच्या वतीने गेली ४९ वर्षे संयुक्त कर्मवीर जयंती उत्सव साजरा करण्यात येतो. याअंतर्गत बारामती येथील श्री छत्रपती शाहू हायस्कूल येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन संयुक्त कर्मवीर जयंती समितीचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर व सदस्य सदाशिव सातव, दिलीप ढव्हाण, प्रा. संजय शेंडे यांच्या हस्ते झाले. यानंतर प्रभात फेरी काढण्यात आली. या फेरीत अनेक विद्यार्थी विविध महापुरुषांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या लेझीम व झांज पथकांनी प्रात्यक्षिके सादर केली.

**प्रा. कृष्णात खोत यांचे प्रतिपादन**

या वेळी माजी नगरसेवक सूरज सातव, अमर धुमाळ, प्रा. आनंदा गांगुर्डे, डॉ. सीमा नाईक, डॉ. अशोक काळगे, प्रा. गोरखनाथ मोरे, डॉ. निरंजन शहा, कार्यवाह प्रा. संजय शेंडे, प्रा. रमेश मोरे, पर्यवेक्षक बाळकृष्ण सुतार आदी उपस्थित होते. यानिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. डॉ. गाडेकर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याचा माहिती दिली. प्राचार्य कल्याण देवडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन विकास जाधव, शुभदा खटके यांनी केले. प्राचार्य गणपत तावरे यांनी आभार मानले.

# फार्मसी संस्थांना हवी पाच वर्षातून एकदाच मान्यता!

- फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाकडून मोकळीक मिळण्याची अपेक्षा
- सीईटी सेल, विद्यापीठे आणि पीसीआय यांच्यात प्रवेश प्रक्रियेदरम्यान समन्वयाची आवश्यकता

**फार्मसी दिन विशेष**



**पुढारी लक्षवेधी**

गणेश खळदकर, पुढारी प्रतिनिधी

**पुणे :** कोरोनानंतर आरोग्याशी संबधित फार्मसी अभ्यासक्रमांना कधी नव्हे एवढी डिमांड वाढली आहे. परंतु, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया अर्थात पीसीआय, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेल आणि विद्यापीठे यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे दरवर्षी फार्मसीची प्रवेश प्रक्रिया संथगतीने सुरू असते. त्यामुळे अनेक विद्यार्थी इच्छा असूनही प्रवेशापासून वंचित राहतात. त्यामुळे पीसीआयने फार्मसी संस्थांना दरवर्षी मान्यता देण्यापेक्षा पाच वर्षातून एकदाच द्यावी आणि सीईटी सेल आणि विद्यापीठे यांनी समन्वयाने प्रवेश प्रक्रिया पार पाडावी, असे स्पष्ट मत फार्मसीतज्ज्ञांनी मांडले आहे.

तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, पीसीआयकडून फार्मसी संस्थांना दरवर्षी प्रवेशप्रक्रियेसाठी मान्यता घ्यावी लागते. त्यामुळे प्रवेशाला प्रमाणापेक्षा जास्त उशीर होतो. यंदादेखील सप्टेंबर महिना संपत आला तरी अद्याप कॅपचे वेळापत्रकदेखील जाहीर करण्यात आलेले नाही. त्यामुळे यापुढे कधी प्रवेश व्हायचे आणि संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष कधी सुरू होणार याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सीईटी सेलदेखील फार्मसी प्रवेशासाठी आवश्यक सीईटी घेण्यास उशीर करते. तसेच विद्यापीठेदेखील शैक्षणिक संस्थांना आवश्यक संलग्नता वेळेवर देत नाही. याचा एकत्रित परिणाम म्हणजे दरवर्षी फार्मसी प्रवेशाला उशीर झालेला दिसून येतो. पीसीआयकडून देण्यात येणाऱ्या मान्यतेसंदर्भात काही संस्था उच्च न्यायालयात गेल्यानंतर न्यायालयानेदेखील एकदा मान्यता घेतल्यानंतर ती कायमस्वरूपी असेल असे स्पष्ट केले होते. परंतु यासंदर्भात पीसीआयने स्थगिती आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात प्रयत्न सुरू केले आहेत. संस्थाचालकांनी देखील आम्हाला कायमस्वरूपी मान्यता नको परंतु किमान पाच वर्षे मान्यता देण्याची मागणी केली आहे.

